
एप्रिल १९८८ किंमत [illegible] रु

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



एप्रिल १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

सपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चैंदवणकर**

---

६७ वे अंक १ला

किंमत २ रुपये

दूरध्वनी:- ४१२ २५ ६१

---

- कार्यालय -

ईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

४५

करले गुरु अपना गुरु अपना ।
तब मीटे आना जाना ॥धृ. ॥
माया माइनें रच दिया है
दुनियेका बाजार ।
मेरा मेरा मत करना रे ।
सब झूठा संसार ॥ करले. ॥
जनन मरन यह क्या चीज है
नहीं कोइ जान सकता ॥
गुरुचरन की सेवा कर तू ।
वोहीं बतावे रस्ता ॥ करले. ॥
सद्‌गुरु तारे सद्‌गुरु मारे ।
भरोंसे का सौदा ॥
दासि कहत है तारक सांई ।
सुन रे बाबा दादा ॥ करले. ॥

४६

पहावें श्रीपुढें अगत्य भक्तांचें ।
न ये आळसाचें वारें तेथें ॥
चाले बाबा बाबा मुखावाटे नाम ।
आनंदाचें धाम शिर्डीपूर ॥
येतां वाड्यावर घेती श्रीदर्शन ।
समूह मिळून भक्तांचे ते ॥
स्नान झाल्यावरी कटी पितांबर ।
दिसे रमावर बाबा सांई ॥
बैसल्या एकांती किती आठवावें ।
प्रेमें गुण गावे दासानेंया ॥

४७

नको हा संसार नको घरदार ।
नको व्यवहार चालवाया ॥
निघाले उद्‌गार हे अनुभवून ।
नको पुन्हा जन्म आतां पुढें ॥
तुझी सारी लीला तुझाची हा खेळ
होते तळमळ फार जीवा ॥
देवा आतां तरी देई मज शांती ।
झाली ही विपत्ती पुरे दासा ॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील**
**मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**


# श्री साईलीला – एप्रिल १९८८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | – | ४ |
| २ | साईसतचरित्रातील अकरावा अध्याय | – श्री. म. वि. सामंत | ६ |
| ३ | रामफळ-सीताफळ दोन रुपके | – सौ. भावना जेऊरकर | ८ |
| ४ | साईनाथांचे भक्तांशी हितगुज | – श्री. रा. ना. घोडखादे | १० |
| ५ | शेजारती नंतर श्रीबाबा निद्राधीन होतात तेंव्हा | – श्री. सदानंद चेंदवणकर | १३ |
| ६ | श्री साईबाबांबद्दलचे विचार | – सौ. सरोजिनी मुळये | १४ |
| ७ | मी ऐकलेले व प्रत्यक्ष पाहिलेले साईबाबा | – डॉ. रा. सी. कापडी | १६ |
| ८ | श्री बाबांची परमभक्त श्री राधाकृष्णामाई | – साईनंद | २४ |
| ९ | साईनाम– कलीयुगातील नामावतार | – श्री. आंतोन फर्नांडीस | २६ |
| १० | श्री साईनाथांनी द्वारकामाईत विशिष्ट वस्तूच का ठेवल्या? | – डॉ. सुमन खानविलकर | २९ |
| ११ | नामाचा महिमा | – कु. शोभा आळवे | ३२ |
| १२ | इति श्री साई उवाच | – श्री. डी. जी. देशपांडे | ३३ |
| १३ | प्रार्थना | – श्री. विलास कुलकर्णी | ३८ |
| १४ | अंत:स्फूर्ति आणि दिव्य दृष्टी | – श्री. दि. रे. बाबरेकर | ३९ |
| १५ | गुरु ब्रह्म नव्हेत दोन झाले जया हे अभेद ज्ञान | – श्री. गिरीश जोशी | ४१ |
| १६ | साई–नाम | – श्री. विलास कुलकर्णी | ४६ |
| १७ | अलौकिक निष्काम भक्ती | – सौ. उषा अधिकारी | ४७ |
| १८ | श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | ५१ |
| १९ | अर्चना | – श्री. बा. ना. तळवाडकर | ५२ |
| २० | श्री साईसहस्रनामावली | – श्री. संजीव चंदने | ५३ |
| २१ | श्री बाबांचे सिंहासन | – श्री. कृ. भा. देशमुख | ५६ |
| २२ | जे जे देखिजे भूत । ते ते जाणिजे भगवन्त ॥ | – श्री. बी. व्ही. सावंत | ५७ |
| २३ | ग्रंथ परीक्षण | – सौ. वासंती नांदेडकर | ५९ |
| २४ | तुमचे श्री साईबाबांविषयक सामान्य ज्ञान किती आहे? | – श्री. सदानंद चेंदवणकर | ६१ |
| २५ | शिरडी वृत्त | – | ६२ |

## संपादकीय

# साईलीलाचे ६७व्या वर्षात पदार्पण



साईभक्त मंडळींनो, तुम्हाला प्रिय असलेल्या श्री साईलीलाने आपल्या प्रकाशन कार्याची सहासष्टी पूर्ण केली आहे. ६७व्या वर्षात मासिकाने पदार्पण केले आहे. साठी बुद्धी नाठी असे म्हणतात. पासष्टीनंतर थकवा येतो, असे म्हणतात. पण साईलीलास ६७व्या वर्षी चांगलेच बाळसे आले आहे. ही सारी श्रींची कृपा आहे, असेच म्हणावयास हवे.

गेल्या साडेतीन वर्षापासून तर या मासिकाचे सारेच स्वरुप बदललेले आहे. चित्ताकर्षक मुखपृष्ठात व अत्याधुनिक छपाईत हे मासिक प्रकाशित होऊन भाविकांच्या हाती पडत आहे. यामुळे भक्त तर इतके खूष आहेत कीं, अंक हातात पडताच तो चोखंदळपणे वाचून मगच तो ते हातावेगळा करतात. एकदा वाचला तरी पुन्हा पुन्हा तो चाळतात. गेल्या काही महिन्यांपासून इतका काही विविध स्वरुपी मजकूर देशाच्या कोनाकोपऱ्यातून येऊ लागला आहे की, आम्हालाच पुढील अंकात काय काय द्यायचे आणि किती म्हणून द्यायचे, असा प्रश्न पडू लागलेला आहे. या मासिकाचा आकार लहान असल्याने मजकूराच्या मर्यादा सांभाळाव्या व पाळाव्या लागतात. नवनवीन भक्त तर आता आपापल्या लेखण्या सरसावून श्रींवर लेखन करण्यास उत्साहाने मजकूर पाठवू लागले आहेत व त्या नव्या लेखकांचे आगत-स्वागतही हे मासिक करीत आहे. एकाच लेखकाचे त्याच त्याच विषयावरचे साहित्य छापण्याऐवजी काही जुन्या तर काही नवीन लेखकभक्तांच्या साहित्याने नटलेली श्रीसाईलीला अलिकडे अलिकडे वाचकांच्या हाती पडू लागली आहे. हा आमूलाग्र बदल झालेला आहे, हे कुणाही वाचकाला कबूल करावे लागेल. साईलीलात आता एवढी वैशिष्ट्यपूर्ण सदरे सुरू झालेली आहेत की, प्रत्येक अंक संग्राह्य असतो, अशी पावती पत्रे वाचक लिहीत असतात. माझ्या आठवणीतून मी पाहिलेले साईनाथ महाराज, ही साईंचे चक्षुर्वैदर्शन घेतलेल्या भाग्यवंतांनी लिहिलेली लेखमाला, साई दरबारातील माणिक–मोती ही साईकालीन भक्तांची भरपूर माहिती देणारी मालिका खरोखरच रंजक आहेत. अमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांनी लिहिलेली साईकालीन आंग्ल रोजनिशितील मजकूराचे मराठीत रुपांतर सध्या चालूच आहे. 'इति श्री साई उवाच' हे एक नवे सदर गेल्या महिन्यापासून आपल्या समोर ठेवीत आहे. त्यात वैशिष्ट्यपूर्ण वचने भक्तांनी पाठवावीत. पुन्हा नवी भर म्हणून की काय एक नवे सदर केवळ तुमच्यासाठी म्हणून सुरु करीत आहोत व ते म्हणजे **श्री साईलीला– ६६**

**वर्षापूर्वी.** सहासष्ट वर्षापूर्वी पासूनचे पहिल्या अंकापासूनच्या अंकात काय काय मजकूर येत गेला, त्याचा तपशील व थोडक्यात गोषवारा यामुळे सहासष्ट वर्षापूर्वीचेही अंक तुमच्यासंग्रही आले असेच तुम्हाला वाटेल की नाही! पण हा मजकूर पानभर असेल.

श्री साईलीलाचा वाचकवर्ग प्रामुख्याने सामान्य दर्जाचा असल्याने, गूढ गुंजनात्मक, वाचकांच्या डोक्यावरून जाणारे अशा लेखांचे किंवा जास्तीत जास्त लांबीच्या मजकूराचे स्वागत करण्यास आम्ही तितकेसे उत्सुक नसतो. तेव्हा श्री साईलीलासाठी छोटेखानी, आटोपशीर, व्यवस्थित, स्वच्छ अक्षरात व मुख्य म्हणजे विषयास धरून, असा मजकूर जर आला, तर अशा मजकूराचे स्वागत नेहमीच येथे होत असते व त्यांची प्रसिद्धी पण विनाविलंब केली जाते.

श्री साईलीलाच्या ६७व्या वर्धापनदिनी भगवान श्रीसाईनाथांचे सर्व वाचकांना, लेखक-कवींना, हितचिंतकांना शुभाशीर्वाद.

## लेखक - कवींस निवेदन

**'श्री साईलीला' मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक - कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

*** अंतर्देशीय पत्रावर, पोस्टकार्डवर लेखन करू नये.**

***आमच्याकडे आलेल्या कवितांचे प्रमाण खूपच असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत, कृपया, कविता पाठवू नयेत.**

*** सुवाच्य अक्षरात, कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरेशी मोकळी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे, लेखनासाठी वापरात येणारा कागद जीर्ण-विजीर्ण, टाकाऊ असू नये.**

*** हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

*** अभ्यासपूर्ण, तर्कशुध्द, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**— का. सं.**



# साईसत्चरित्रातील अकरावा अध्याय अर्थात रुद्राध्याय महिमा


– श्री. म. वि. सामंत (तेरावळेकर)
मराठी साहित्य प्राज्ञ
मु. पो. - म्हापण, कुडाळ,
जि. - सिंधुदुर्ग.


आमच्या घरात फार पूर्वी पासून देव देवतार्चन चालू आहे. अगदी लहान मुले सुद्धा सायंकाळी दिवा लावल्यावर ॐ नमः साईनाथाय अगर श्री स्वामी समर्थ असा १५ मिनिटे शांतपणे जप करतात, मानसिक समाधान लाभते आणि सांसारिक अडचणी आपोआप दूर होतात. मुले थोडीशी आंग्ल विद्या विभूषित झाली आहेत. परंतु त्यांच्यावर नास्तिकपणाचा पगडा अद्याप बसलेला नाही, हे आमचे भाग्य आणि बाबांची कृपा!

मी आतापर्यंत गाणगापूर, गोकर्ण, पंढरपूर, नृसिंहवाडी, शिर्डी इत्यादि तीर्थक्षेत्रावर अनेकवार गेलो. प्रत्येक ठिकाणी ४/४ दिवस राहिलो. होईल ती सेवा, अगदी मनोमन पण निष्काम भावनेने केली.

देवाजवळ मला काही मागायचे नसते, फक्त हवे ते दर्शन. कोण्या एका संताने म्हटले आहे, "शोधूनि पाहे खऱ्या देवा" पोथ्या पुराणांत जसे वर्णन आहे, देवघरातील तसबिरीत जसा दिसतो, तसा साक्षात् देव दिसावा, ही इच्छा!

अलिकडे काही आध्यात्मिक ग्रंथ, परमेश्वर लीला विषयीची मासिके उदा. साईलीला, कल्याण, अक्कलकोट स्वामी दर्शन वाचून देव म्हणजे निराळी चीज अथवा बाब नाही, तो आपल्यातच आहे, त्याला ओळखणे जरुर आहे, अशी मनाची धारणा आणि खात्री झाली.

इस्लाम धर्म संस्थापक हजरत पैगंबराच्या चरित्रातली एक गोष्ट आठवली. एकदा पैगंबराचे पाठीमागे शत्रू लागले. पैगंबर व त्यांचा एक शिष्य असे दोघेच होते. शत्रू जास्त असल्याने त्यांनी शत्रूशी दोन हात करण्यापेक्षा पळून जाण्याचे ठरविले. पळता पळता ते एका गुहेत शिरले व लपून राहिले. हजरतांच्या शिष्याने हजरतांना विचारले, "हजरत, शत्रूचा जमाव फार मोठा व आपण फक्त दोघेच. काय करणार?"

पैगंबरांनी अगदी ताबडतोब उत्तर दिले, "अरे वेड्या आपण दोघे नाहीत, आपण तिघे आहोत."

शिष्य डोळे विस्फारुन पाहू लागला. तेव्हा ते म्हणाले, "पाहतोस काय? तू मी आणि आपला देव! श्रध्दा ठेव व निश्चिंत रहा."

शत्रूंना भुरळ पडली. ते दुसऱ्याच मार्गाने निघून गेले. पर्यायाने पैगंबराचे अनायासे संरक्षण झाले. या ठिकाणी परमेश्वराच्या अस्तित्वाचे त्यांना दर्शनच झाले, असे म्हणावे लागेल.

बाबांची शिकवण अशीच आहे. देवाला ओळखा, श्रद्धा ठेवा, तो तुमच्या पाठीशी सदैव आहे.

संसारात नेहमी अडचणी येतात, किंबहुना या अडचणी साईबाबाच निर्माण करतात आणि आपल्या भक्तांची परीक्षा पाहतात. अर्थात अडचणींमधून सुटण्याचा मार्ग पण तेच दाखवतात. आपण त्यांच्यावर निष्ठा आणि श्रद्धा ठेवली, तर आलेल्या संकटामधून पार कसे पडलो, हे समजत सुद्धा नाही. इतक्या सुगमतेने सहीसलामत संकटातून पार होतो.

माझे एक स्नेही खरेखुरे साईभक्त आहेत. त्यांच्यावर बेतण्याइतपत आपत्ती येतात पण त्यांचा ते विचारच करीत नाहीत. प्रत्येक अडचणीच्या वेळी ते बाबांची इच्छा अगर बाबांची मर्जी असे म्हणतात. कोणत्याही संकटाच्या वेळी त्यांच्यावर मानसिक दडपण नसते.

गेल्या पाच वर्षापूर्वी घरगुती आणि सांसारिक कटकटींनी मी पुरता गांगरुन गेलो. माझी परिस्थिती त्राही भगवन् अशी झाली. इतकेच काय, तर 'ना इह ना पर' अशा स्थितीत उदास, बेचैन होऊन निरीश्वरवादी बनत गेलो.

दासगणू महाराज देवाला आळवताना असे म्हणतात की, हे रमावरा, माझ्या सारख्या पामरावर तुझी कृपा झाली नाही, तर संतांनी तुझी चरित्रे उगाच रंगविली आहेत आणि कृपेचा करुणा सागर म्हणून डांगोरा पिटला आहे, असे नाईलाजाने म्हणावे लागेल. तेच त्या महापुरुषाचे वाक्य माझ्या मनात एक सारखे येत होते.

इतक्यात आमचे साईभक्तमित्र एक दिवस एका देवळात भेटले. बाबांची सुमारे दीड फूट उंचीची सुंदर मूर्ती दर्शनी भागातच बसवली होती. मी नेलेल्या उदबत्त्या पेटवून ठेवल्या आणि नमस्कार केला.

साईभक्तांनी मला काही औपचारिक प्रश्न विचारले आणि शांतपणाने म्हणाले, 'हे पहा सामंत, जगात ईश्वर आहे, तो ओळखता आला पाहिजे. परमेश्वराच्या अस्तित्वावर निष्ठा असली पाहिजे. बाबांचे श्रध्दा आणि सबुरी हे दोन शब्द लक्षात ठेवले पाहिजेत व त्यांचे चिंतन केले पाहिजे.

''जोगाई जाखाई मरि आई शनि शंकर अंबाबाई मारुती खंडोबा म्हाळसाई ठाई ठाई शिरडीत परि अवघड प्रसंग येता कामी पडेना| एकही ग्रामस्था. तयाचा तो चालता बोलता धावता संकटी पावता एक साई.''

श्री साई सत्‌चरित्रामध्ये अकरावा अध्याय म्हणजे रुद्राध्याय होय. त्याच्या पठणाने, पारायणाने सगळी संकटे सौम्य होतात, दूर होतात. शत्रूंचा लय होतो. असे म्हणत त्यांनी आपल्या समोरच्या श्री साईबाबांच्या पुतळ्याकडे पाहिले आणि आश्चर्यवत् घटना म्हणजे बाबांच्या मस्तकावरचे एक फूल आपोआप खाली पडले.

आमचे साईभक्त, मी त्यांना अण्णा म्हणतो,ते म्हणाले, हाच तुम्हाला खरा प्रसाद आहे. आज पासून नियम करा,साईसत्‌चरितातला ११ वा अध्याय नियमाने, दररोज, श्रध्दापूर्वक वाचा आणि गुरुवारी तोच,म्हणजे रुद्राध्याय ११ वेळा वाचा, बाबा तुमच्या मागे पुढे उभे आहेत.

त्यांच्या उपदेशाप्रमाणे मी काही दिवस रुद्राध्यायाचे वाचन केले आणि आमच्या घरात त्याचे सदैव वाचन व्हावे, या अपेक्षेने मराठी पाचव्या इयत्तेत शिकणाऱ्या आमच्या मुलीला अध्याय वाचनाची कामगिरी लावली. तिही आवडीने, नेहमी पद्धतशीर पाटावर बसून मोठ्या माणसाप्रमाणे हा अध्याय वाचते.

साधारणत: दोन वर्षे आमचा हा उपक्रम चालू आहे किंबहुना आमच्या कुटुंबियांचा हा अध्याय पाठच झाला आहे, असे म्हणायला प्रत्यवाय नाही.

आम्हाला येणाऱ्या आगामी संकटाची सूचना, आलेल्या आपत्तीतून सुटण्याचे मार्गदर्शन बाबा जणू करीतच असतात, अशी मनोमन खात्री आहे.

# रामफळ - सीताफळ दोन रुपके

**- सौ. भावना जेऊरकर**
गोपी टॉकीजसमोर, डोंबिवली

प्रासादिक पवित्र ग्रंथ ''साईसत्चरित''मधील अध्याय क्रमांक १९ मध्ये ओव्या २५ ते ३२ यामधून हेमाडपंतांनी रामफळ व सीताफळ ही रुपके साधून ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग यांचे महिमान सांगितले आहे.

बाबांच्या दरबारात हौशे, नवशे, गवशे सर्व तऱ्हेचे व सर्व थरातील लोक येत असत. प्रत्येक भक्ताची आकलन शक्ती, श्रध्दा व मानसिक स्थैर्य पाहून बाबा प्रत्येकास त्याच्या कुवतीप्रमाणे मार्गदर्शन करत.

सर्वात श्रेष्ठ ज्ञानमार्ग. तो मार्ग सांसारिक लोकांना अवलंबण्यास कठीण म्हणून आपल्या भक्तांना सर्वात सोप्या अशा भक्तीमार्गाचे अवलंबन करण्यास बाबा रात्रंदिवस सांगत. ते सर्वांना सांगत–

**वदत ज्ञानमार्गाचे महिमान। मार्ग तो रामफळासमान।**
**भक्तीमार्ग सीताफळ सेवन। स्वल्प साधन रसमधुर ॥२६॥**

सर्वसामान्य भक्तांना आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी भक्तीमार्गाचा अवलंब करणेच योग्य आहे. ज्ञानमार्ग हा रामफळासारखा आहे, तर भक्तीमार्ग हा सीताफळासमान आहे. दोन्ही फळे असंख्य बिया असलेली असली तरी मधुर गराची सोज्वळ असतात.

ज्ञानमार्ग अंगिकारताना मार्गात अनंत अडचणी येत असतात. त्या अडचणी पार करताना आपली मानवी शक्ती बऱ्याच वेळा कमी पडते. अशा वेळी सद्‌गुरुच्या चरणी लीन झाल्यावर तोच आपल्याला भक्तीमार्गाकडून ज्ञानमार्गाकडे जाण्याची वाट दाखवितो. हेमाडपंत भक्ती व ज्ञान मार्गाचे विश्लेषण किती सुंदर उपमा देऊन करतात–

**भक्ती ही सोज्ज्वळ सीताफळ। ज्ञान हे परिपक्व रामफळ।**
**एकाहूनी एक रसाळ। मधुर परिमळ तैसाच॥**

निरपेक्ष भोळा भक्तीभाव म्हणजेच जणू सीताफळ होय. आन्तरिक शुध्द भाव साईंना नेहमीच प्रिय. सीताफळ हे सहजासहजी बी पेरुन उगवणारे झाड. त्याच्यासाठी मनापासून थोडेफार परिश्रम घेतले, तर त्याला मधुर, रसाळ गोमटी सीताफळे धरु लागतात. अन् बघता बघता फळातील गर बी ला घट्ट धरुन ठेवतो. कालांतराने तो गर मधुर होऊन परिपक्व होतो. श्रध्दा ठेवून भक्ती करा, मग सीताफळासारखे मधुर अनुभव तुम्हास येतील.

ज्ञानमार्ग हा अधिक फलदायी व श्रेष्ठ. परंतु त्याचे नियम काटेकोरपणे, कसोशीने पाळणे आवश्यक. सर्वसामान्यपणे संसारी माणूस ज्ञानमार्गाचा अवलंब करु धजत नाही. पण ज्ञानमार्गाने जर का आपण वाटचाल केली, तर अतिमधुर असे गरदार रामफळ आपल्या पदरी नक्कीच पडणार.

भक्तीमार्ग अन् ज्ञानमार्ग यातून अंतिम प्राप्ती एकच. ती म्हणजे, आध्यात्मिक प्रगती होऊन परमेश्वरी लीलेचे अगाध ज्ञान भक्तास होणे. गुरुकृपेची मधुर रसाळ फळे चाखावयास मिळतात. रामफळ हे वजनदार, गरदार असे फळ. ते फळ झाडावरच पिकू देऊन परिपक्व झाल्यावर काढले, तर त्याची गोडी अवर्णनीय. परंतु त्यासाठी धीर धरणे आवश्यक. शिवाय रामफळाचा देठ फळात अगदी थेटपर्यंत असतो. म्हणजेच सबुरी धरली तर मधुर फळ मिळणारच, अन् ते सुद्धा परिपूर्ण असलेले. अर्धवट वाढ झालेले रामफळ जमिनीवर पाडून पिकविले, तर त्याची गोडी कमी होते, दाट गर कमी होतो. अर्थात् ज्ञानमार्गाचा अवलंबन करणाऱ्याने पायरी पायरीने पाऊल उचलावे, सबुरी धरुन सातत्याने ध्येयपूर्ती होईपर्यंत आपले कर्तव्य करत राहिले पाहिजे.

सीताफळास रामफळासारखी परिस्थिती नाही. पूर्ण वाढ झालेली सीताफळे झाडावरुन काढून पिकत ठेवली तरी त्याची गोडी कमी होत नाही. अल्प काळात पिकून ती तेवढीच मधुर होतात, जेवढी झाडावर होतील. सीताफळाला झाडापासून पडायचे भय नसते. तात्पर्य, भक्तीमार्गाने जाणारा भक्तही परमेश्वर लीलेचे अगाध ज्ञान प्राप्त करु शकतो, शिवाय गर्व किंवा अहंकाराने त्याचे पतन होण्याचे भय नसते. परमेश्वरी कृपेने तो मधुर गोमटी फळेही प्राप्त करु शकतो.

रामफळाला झाडापासून पडायचे भय असते. याचा अर्थ ज्ञान प्राप्त झाल्यावर कदाचित् अधोगती होण्याची शक्यता असते. कारण अशा व्यक्ती गर्वाने, अहंकाराने स्वत:स श्रेष्ठ मानू लागतात. ज्ञानीजनांनी ज्ञानाच्या जोरावर अष्टसिद्धिवर ताबा मिळवावा, निर्भय व्हावे व दुसऱ्यांचे अज्ञान दूर करावे. त्यांच्या हातून थोडीसुद्धा हेळसांड होता नये.

म्हणूनच दयाघन साईराम आपल्या भक्तांना भक्तीमार्गाचा स्वीकार करण्यास लावतो व नामस्मरणाचे महत्त्व पटवून देतो.

# साईनाथांचे भक्तांशी हितगुज

**– श्री. रा. ना. घोडखांदे**
४२० सी, हनुमान नगर,
नागपूर - ४४० ००९.

सुगंधी फुलांचा आसमंत सुवासाने दरवळतो, तसा शिरडीचा आसमंत साईनाथांच्या वास्तव्याने पुनित झालेला आहे, पावन झाला आहे. आज ते तीर्थस्थान बनले आहे. यात्रेकरुंची तेथे सारखी रीघ लागलेली असते. भक्तांच्या हाकेला 'ओ' देणाऱ्या ह्या संताचे-साईनाथांचे दर्शनास जनसमूह उतावीळ झालेला असतो. शेकडो भक्तांच्या आशांचे, श्रद्धांचे साईबाबा आधारस्तंभ बनले आहेत.

'दया हे भांडवल संता' ह्या उक्तीप्रमाणे ह्या दयेच्या सागराने उदी (अंगारा) देऊन शरणांगतांचे आजार दूर सारत त्यांच्या हयातीत अनेक निपुत्रिक भक्तांना पुत्र प्राप्ति करुन दिली. अनेक भक्तांची संकटांतून सुटका केली. त्यांच्या चरित्रात ह्या गोष्टींचा उल्लेख आहेच.

भक्तांशी त्यांचे नेहमी वार्तालाप चालत, हितगुज होत. त्यात अनेक आध्यात्मिक प्रश्नांची उकल होई. त्यांच्या ह्या गोष्टीत त्यांनी उल्लेखिलेल्या दोन गोष्टी समाजाला, तसेच व्यक्ति विकासाला सहाय्यक आहेत, असे वाटल्यावरुन त्या येथे नमूद करीत आहे. पहिली गोष्ट, 'सबका मालिक एक है' आणि दुसरी गोष्ट 'तुम मेरा नाम लो, मै तुम्हारी याद करुंगा' ह्या दोन गोष्टींचाच सांगोपांग विचार करावा, ह्या हेतूने हा लेख श्रीसाईंच्या चरणी सादर करीत आहे.

**'सबका मालिक एक है'**

श्रीसाईनाथांच्या भक्तमंडळीत हिंदु, मुस्लिम, ईसाई, पारशी, जैन इत्यादि विविध धर्मांचे व भिन्न जातींचे लोक असत. विविध रंगांची फुले एका सूत्रात गोवली म्हणजे जशी सुंदर दिसतात, अगदी तसाच आनंद ह्या विविध धर्मजातींच्या लोकांच्या सम्मेलनात दिसून येई. साईनाथांच्या सहवासात ते धर्मजातीचे भेदाभेद विसरत. लहान-मोठा, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत सारे भेद येथे समाप्त होत. त्यांचा निवास, त्यांचे भोजन, त्यांचे परस्परांशी होणारे संवाद एका कुटुंबातील माणसांसारखे सलोख्याचे अन् जिव्हाळ्याचे असत. त्यांच्यात भावनात्मक ऐक्य निर्माण होई. एकाच देवाच्या कृपाप्रसादाची लालसा असलेले सारे भक्त एका अभिनव भावनेने भारलेले दिसत.

असाच आनंद भारतात निर्माण व्हावा, भावनिक ऐक्य साधावे, असे भारतीय समाज धुरंधरांना वाटते. त्यांना मला असे सांगावेसे वाटते की, तुम्ही आमच्या देवाला, सामर्थ्यशाली श्रीसाईनाथांना शरण जा, म्हणजे तुमचे इप्सित साध्य होईल. श्री सद्गुरु साईनाथांचा भक्तांना उपदेश असे की, तुम्ही सगळे एकाच देवाची लेकरे आहात, देवाच्या दुनियेत जाती धर्माला वाव नाही. भक्तांना जातच नसते. वस्तुतः

तुम्ही परस्परांचे बंधु आहात. तुमच्यात प्रेम, सहिष्णुता, सहकार्य व परस्परांविषयी आदर असला पाहिजे. हे जेथे नांदते ना, तेथेच भगवंत वास करतो. माणसामाणसांत भेद पाहाणं म्हणजे देवापासून दूर जाणे आहे. सर्वभूतांवर प्रेम करणे, हेच भगवंताचे पूजन आहे.

**गाढवास पाजूनि गंगाजल ।**
**एकनाथे पूजिले चैतन्यास ॥**

ह्या काव्य ओळीत हाच भाव व्यक्त केलेला दिसून येतो.

प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी आत्मा आहे. सर्व आत्मे एकत्र आले की, परमात्मा बनतो, असे महात्मा गांधी म्हणत. सर्वांनी भेदाभेद टाळून एकत्र यावे, ऐक्य साधावे, असा ह्यात हेतू आहे. असे झाले म्हणजे द्वेष, हेवेदावे, मत्सर, राग-लोभ ह्या भावनांना फाटा मिळतो. मानवाला सौजन्य लाभते. सद्‌गुणांची वाढ होते. संतांच्या उपासनेला अशाच गुणांची जरुरी आहे, ह्या महात्मा गांधींच्या उपदेशात 'सबका मालिक एक है' ह्या साईनाथांच्या मंत्राचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

भारतीय राज्य घटना धर्मातीत (Secular) आहे. यात मानवाचा विचार डोळ्यासमोर ठेवून ही भूमिका राष्ट्राने स्वीकारलेली दिसते भारत सर्वांचा देश आहे. 'सबका मालिक एक है' हा साईनाथांचा उपदेश समोर ठेवूनच जणू काही भारतीय घटनेला उदात्त स्वरुप देण्यात आले आहे, असे वाटू लागते.

जात, धर्म, पंथरहित निरपेक्ष समाजवादी समाज रचना घडविणे, हे शिक्षणाचे उद्दिष्ट मानले जाते. पण अजून ते प्रत्यक्षात उतरलेले दिसत नाही. शिरडीला साईबाबांच्या आसमंतात ही निरपेक्षता निर्माण होते. साईंच्या कृपेने तिचे विशाल स्वरुपात रुपांतर होईल, अशी आशा करु या.

शिकागोला विश्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी सर्व धर्म समान आहेत, कोणताही धर्म दुसऱ्या धर्मापेक्षा लहान किंवा मोठा नाही, असे सांगून सर्वधर्मसमभावाची अभिनव कल्पना जगापुढे ठेवली. निरनिराळे धर्म एकाच भगवंताकडे जाणाऱ्या वाटा आहेत, ईश्वर प्राप्तींचे मार्ग आहेत, असे प्रतिपादिले. साईनाथांच्या उपदेशाचे सार ह्यात प्रतीत होते.

**'तुम मेरा नाम लो, मैं तुम्हारी याद करुंगा'**

यात साईनाथांची याद करायची म्हणजे, श्रद्धापूर्वक त्यांची भक्ती करायची, असा भाव अभिप्रेत आहे. साईनाथांचे एकदा नाव घेतले की, लगेच साईनाथ प्रसन्न होतात, असा याचा अर्थ होतं नाही. श्रद्धापूर्वक साईनाथांच्या नावाचा जप केला. तळमळीने त्यांना हाक मारली. सातत्याने त्यांच्या चिंतनात राहिलं, तरच साईबाबा त्यांच्यासाठी हजर आहेत, असा बोध घेणे बरोबर होईल.

रामकृष्ण परमहंस म्हणतात, संतकृपेसाठी साधक (भक्त) व्याकूळ व्हायला पाहिजे. पुढे उदाहरण देऊन ते सांगतात, प्रेयसीकडे जायला प्रियकराला जशी तळमळ लागते ना, तशीच तळमळ भक्ताला-साधकाला लागायला पाहिजे. अंगी रोमांच उभे राहायला पाहिजेत. तरच काही साध्य होण्याची आशा आहे.

जनसामान्याला जवळचा आणि वारकऱ्यांनी, भागवत धर्मियांनी परंपरेने चालविलेला नामसंकीर्तनाचा - नामजपाचा भक्तीमार्ग साईनाथांनी 'तुम मेरा नाम लो' म्हणून सुचविला आहे. मराठी मुलखातील साऱ्या संतांनी हाच मार्ग स्वीकारलेला दिसतो.

विठ्ठल, विठ्ठल करीत संत तुकाराम नामस्मरणात इतके तल्लीन होतात की, शेताची राखण करायचे भान त्यांना राहत नाही. सारं शेत गुरं खाऊन टाकतात.

संत जनाबाई बसता-उठता, दळता-कांडता विठ्ठलाचेच गाणे गाई. अगदी भान विसरुन गाई. विठ्ठल तिचे काम करु लागत. हा नामस्मरणाचाच प्रभाव आहे.

संत गाडगे महाराजांचा नामस्मरणावरच भर असायचा. 'गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला' हे त्यांचे घोष वाक्य असे, कीर्तनात नेहमी त्याचा उच्चार होई. त्यांच्या कीर्तनाची सुरुवात व्हायची ती अशी– जिभले तुला धंदा, घडि घडि म्हण गे हरि गोविंदा। साऱ्या महाराष्ट्रातील संतांना नामसंकीर्तनाचे वेड असे. भक्तीमार्ग सहज सोपा म्हणून 'साई साई' म्हणा, असा साईबाबांनी देखील भक्तांना उपदेश केलेला आहे, हे आपल्या ध्यानात येईल.


नामजपाचे महत्व सांगणारे खालील काव्य वाचू या–

**ज्ञानदेव म्हणे हरि हरि जपा ।**
**वाल्मिकी उद्धरला राम जपे ॥**
**प्रल्हादे धरिला नारायण मनी ।**
**तुका वेडा होई विठ्ठल गजरी ॥१॥**
**नामजप हा यज्ञ आहे सोपा ।**
**न लगे काळ वेळ तया आचराया ॥**
**यज्ञ, याग, व्रत लौकिकाचे धन ।**
**अहंकार वाढवी भक्तीचे विडंबन ॥२॥**
**नामाशी एकरुप व्हावे विसरुनि भान ।**
**ज्ञानदेव म्हणे संतसंगे मिळते हे दान ॥**
**इतिहास भुलण्या मनिचा नाम हे साधन ।**
**आत्मज्ञानासाठी संत देती हा संदेश ॥३॥**

'तुम मेरा नाम लो, मैं तुम्हारी याद करुंगा' ह्यात नामस्मरणाचा सोपा मार्ग श्री साईनाथांनी आपल्या भक्तांस सुचविला आहे, असे समजू या. आपण हा मार्ग स्वीकारला की, आपल्यावर साईकृपेचा वर्षाव व्हायला वेळ लागायचा नाही. आता साई, साई असा जप करीत, ह्या लेखाची इतिश्री करु या.

# शेजारतीनंतर श्रीबाबा निद्राधीन होतात तेव्हा –

सदानंद चेंदवणकर.



संत चूडामणी भगवान श्रीसाईनाथांची दिवसभरातील चौथी, शेवटची आरती रात्री १० वाजता सुरु होते व ती १०-२० ला संपते. आरतीनंतर भक्तगण श्रींना वंदन करतात व या भक्ताला उद्या पहाटेला दर्शन द्या, असे आवर्जून सांगतात व शेजारतीचा प्रसाद घेऊन निवासस्थानी परततात. रात्रीचे साडे दहा वाजलेले असतात व भर्रकन भक्त समाधीमंदिरातून निघून गेल्यावर सामसूम होते व मग बाबांच्या निजण्याच्या तयारीस समाधीमंदिरातील कर्मचारी वर्ग लागतो.

संपूर्ण समाधीमंदिरातील कचरा काढला जातो. ते स्वच्छ केले जाते. नंतर श्रींच्या अंगावरील सर्व वस्त्रे, पोषाख, मुकुट इ. उतरविले जातात. नंतर एक तांबड्या-भगव्या रंगाची एक उबदार शाल त्यांच्या पाठीवरुन घेऊन ती सर्वांगाभोवती लपेटली जाते. त्यांच्या खाली उघड्या राहिलेल्या एका पायावर ही दुसरी एक लहानशी शाल घातली जाते. शाल लपेटल्यावर त्यांच्या गळ्यात एक हार घातला जातो. नंतर समाधी चौथराही स्वच्छ केला जातो. प्रत्यक्ष समाधीवरील संगमरवरी लादी ही स्वच्छ पुसली जाते. हळद-कुंकू-तांदूळ, फुले, उदबत्या, कापूर इ. वस्तू काढल्या जातात. दक्षिणा म्हणून भक्तांनी चुकून काही नाणी टाकलेली असतात, ती जवळच्याच पेटीत टाकली जातात. नंतर समाधी फरशीवर भगवी-नारंगी अशी चादर अंथरली जाते. त्या चादरीवर तशीच आणखी एक चादर ओढली जाते. नंतर पांढरी स्वच्छ मच्छरदाणी काढली जाते व ती श्रीसाई पुतळ्यावरुन घेऊन ती समाधीवरही घेतली जाते. म्हणजे पुतळा व समाधी दोन्ही मच्छरदाणीत असतात. मच्छरदाणीची चार टोके विशिष्ट

जागी बांधली जातात. नंतर एका तांब्यात थंड पाणी भरले जाते. त्यावर एक फुलपात्र उपडे ठेवले जाते. रात्री श्रींना पिण्यासाठीचे पाणी म्हणून ते त्यांच्या उशाशी ठेवले जाते. प्रत्यक्ष समाधीत श्रींचे चरणकमल पुरुष भक्त मंडळी आरतीचे वेळी जमतात त्या बाजूस व मस्तक महिला भक्त मंडळी जिथे जमतात तिथे आहे.

जलपात्र ठेवल्यानंतर एक कंदिल पेटविला जातो व तो मंदपणे रात्रभर तेवत राहील, अशा व्यवस्थेने श्रींच्या मच्छरदाणीच्या बाहेर समाधी स्थानी तो ठेवला जातो. तो ठेवताना भरपूर सुरक्षितता पण घेतली जाते.

श्रीबाबांची निजण्याची अशी तयारी करण्यात पुजारी वर्ग गुंतलेला असतो, तर दुसरीकडे इतर कर्मचारी-सेवेकरी दिवसभरासाठी श्रींच्या पूजेअर्चेसाठी काढलेली चांदीची भांडी व इतर वस्तू समाधी मंदिराखालील तळघरात व्यवस्थित जागच्या जागी योग्य ती मोजदाद करून ठेवण्यात गुंतलेले असतात. श्रीबाबांच्या समाधी मंदिरातील सर्व ती दारे-खिडक्या बंद केली जातात. कडी-कुलूपे त्यांना लावली जातात. विजेचे सर्व दिवे हळूहळू काढले जातात. तळघराच्या व इतर सर्व त्या चाव्या मंदिर व्यवस्थापकांच्या हाती काळजीपूर्वक दिल्या जातात. सर्व कर्मचारी सेवेकरी श्रींना वंदन करतात व समाधीमंदिराचे मुख्य प्रवेशद्वार बंद करुन बाहेरुन कुलूप लावले जाते.

हा सारा कार्यक्रम संपेस्तोवर रात्रीचे ११ वाजलेले असतात. मंदिर बंद होते व कोणत्याही परिस्थितीत ते पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजेतोपर्यंत ते मुळीच पुन्हा उघडले जात नाही. कुणीही येवो, कितीही उच्च पदस्थ व्यक्ती येवो, मंदिर अपरात्री पुन्हा उघडणे नाही, असा दंडक आहे व तो तंतोतंत आचरणात आणला जातो. समाधी मंदिरात दिवसभरातल्या असंख्य भक्तांना दिलेल्या दर्शनामुळे श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराज अक्षरशः शिणलेले असतात. त्यांची मुळीच झोप मोड होऊ नये, अशीच या पाठीमागची भूमिका आहे व ती आजवर कसोशीने पाळली जात आहे.

# श्री साईबाबांबद्दलचे विचार

— सौ. सरोजिनी मुळ्ये
सरस्वती सदन,
नाथमंदिर कॉलनी, इंदूर.

श्री साईबाबा हे एक अंतर्ज्ञानी, ईश्वरी, अवतारी पुरुष होते, यात शंकाच नाही. ते कोण होते? हिंदु की मुसलमान? त्यांचा जन्म केठे झाला? त्यांचे आई वडील कोण होते? हे पाहण्याची आपणास काही गरज नाही. गंगेचे मूळ आणि ऋषीचे कूळ कधी पाहू नये, शोधू नये म्हणतात, ते खरे आहे. त्यांचे अवतार कार्य काय होते, हेच आपण पहावयाचे. त्यांचे खरे अवतार कार्य म्हणजे माणसांमाणसांत एकी घडवून आणण्याचे व त्यांना साक्षात्कार घडविण्याचे.

साईचे शरीर गेले, त्यांचा आत्मा विश्वचैतन्यात विलीन झाला, त्यांचे दिव्यत्व मात्र मागे राहिले. तेच दिव्यत्व, तीच दैवी शक्ती आजही भक्तांच्या हाकेला धावून जात आहे, त्यांना दिलासा-देत आहे, आणि साक्षात्कार घडवीत आहे. मानवता हे जीवन मूल्य त्यांनी शिकविले. साईबाबांशी कोणीही जरी दुष्ट पणाने वागले, तरी ते त्याला समजावून सांगत असत. त्यांच्यात सूड बुद्धी नव्हती. पंचमहाभूते त्यांच्या आधीन होती. केवढे हे अफाट सामर्थ्य! मानवाला सन्मार्गाला लावण्याचा खेळ खेळणाऱ्या देवाला, त्याचे अपराध अनेकदा पोटात घालावेच लागतात. हेच साईबाबा करीत असत.

दिक्षितांना बाबांनी सांगितले होते की, माझे शरीर गेले, तरी माझे हे स्थान मरणार नाही. माझ्या अखंड धुनीची राख, तुम्हाला संरक्षण दिल्याशिवाय राहणार नाही. असे म्हणतात की, लहानपणी त्यांना जंगलात एकटेच सोडले होते. त्याना तेथे एक मुसलमान भेटला व त्याने बाबांना आपल्या घरी नेऊन वाढविले, म्हणून त्यांना 'अल्ला भला करेगा,' वगैरे बोलण्याची सवय लागली व मुसलमानी संस्कारांत ते वाढल्यामुळे ते तसे झाले.

आपल्या सच्चिदानंद दयाघन प्रभूची मनोभावे आराधना कराल, तर तोच तुमच्यासाठी धांवून येईल. आम्ही निमित्त मात्र परमेश्वराचे गुलाम आहोत. कोणत्याही धर्मातील परमेश्वराचे ध्यान एकदा निश्चित करून एकाग्रतेने आणि आपल्या परमभक्तीने आपण इष्ट देवतेची आराधना करा, म्हणजे माझे ठिकाणी दुजाभाव आढळणार नाही. ही मनाची एकाग्रता आणि समाधीची पूर्वस्थिती प्राप्त करुन घेण्याकरिता आपले मन नेहमी चांगल्या गोष्टीकडे वळविले पाहिजे. दुष्ट, घाणेरडे विचार काढून टाका आणि सदाचरणाने नित्य वागणाऱ्या मित्रांची संगत ठेवा. बाबांचा हा किती बहुमोल उपदेश आहे! दया हा बाबांच्या उपदेश वाणीतील प्रमुख घटक होता. आपली मन:स्थिती अचल व स्थिर ठेवून परमेश्वर भक्तीकडे एकाग्रता ठेवा. आपल्या ऋणानुबंधाने आपण जवळ आलो आहोत, तेव्हा सर्वांबरोबर शांततेने आणि प्रेमाने वागणे, हेच सर्व धर्मांचे सार आहे. किती उदात्त शिकवण ही!

बाबांना इतकी वर्षे समाधिस्थ होवून झाली पण आजही आपल्या देशात, परदेशात कित्येक लोकांना त्यांचे अनुभव येत आहेत. मला भजा म्हणून कोणी भजणार नाही. पण ज्याला साक्षात्कार होईल, तोच खरा भक्त बनेल. आज त्यांचे लाखो भक्त निरनिराळ्या ठिकाणी असतील, पण त्यांच्या अचाट शक्तीने सर्व लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले आहेत. ते अगदी निर्लोभी होते. स्वत:करिता कोणाही जवळ, काहीही मागत नसत. ते म्हणत, गरीबांना अन्न, वस्त्र, निवारा द्या. बाबांचे खाणे साधे होते. झुणका-भाकर, अंगात कफनी व डोक्याला रुमाल असे, डामडौल नव्हता.

अशा संताची भेट होणे व त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभणे, ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. अशा विभूती जगाच्या कल्याणाकरिता पृथ्वीवर अवतार घेतात व अवतार कार्य संपले की समाधिस्थ होतात.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' हे खरे आहे.

माझ्या आठवणीतून–

# मी ऐकलेले व प्रत्यक्ष पाहिलेले श्रीसाईबाबा – ४

## डॉ. राजाराम सीताराम उर्फ भाऊसाहेब कापडी

– डॉ. रा. सी. कापडी, एम.बी.बी.एस.
वसुंधरा, राजारामपुरी, १३वी गल्ली,
कोल्हापूर.



**डॉ. कापडी तेंव्हा**

(कोल्हापूरचे प्रख्यात डॉ. रा. सी. कापडी यांचे वय आज ९४ वर्षाचे आहे. या वयातही ते भरपूर प्रवास करतात. गोरे गोरे पान व लालबुंद चेहऱ्याचे,सुटबुटात वावरणाऱ्या या प्रसिद्ध धन्वंतरीवर बाबांची कृपाच खरोखरी आहे, यात प्रत्यवाय नाही.)

**सर्वज्ञानी साईबाबा**

**ऐकेन ज्ञातेन सर्वदा विज्ञानं भवति** श्री संत चूडामणी शिर्डीचे साईबाबा हे उपजतच सर्वज्ञानी होते. – 'सूचितां श्रीमतां गैह योग भ्रष्टो ऽभिजाय ते' सदाचरणी भाग्यवंताच्या घराण्यात ते जन्माला आलेले होते. त्यांच्या कानाच्या पाळी टोचलेल्या होत्या. हिंदु धर्माशिवाय कोणत्याही धर्मांत कानाच्या पाळी टोचत नाहीत.-

पण पुढे लहानपणीच ते अविंधाच्या घराण्यात वाढलेले असल्यामुळे त्यांच्यावर मुस्लिम धर्माचे संस्कार झाले. त्यांचा जन्म, नव्हे अवतार हिंदु-मुस्लिमांची दुही मिटविण्याकरिता होता. म्हणून देह पडेपर्यंत त्यानी बाह्यात्कारी पत्करलेला फकीर वेष अट्टाहासाने शेवटपर्यंत बदलला नाही.

त्यांची पूजा, आरती करताना सुद्धा ते कपाळाला गंध लावून घेत नसत. त्यांचे एक भक्त म्हाळसापतीचे गंध गळ्याला लावून घेत.

**गंधाचा पहिला टिळा–** परंतु एकदा धोपेश्वराचे संत काका पुराणिक यांचे एक पट्ट शिष्य डॉ. पंडीत हे बाबांच्या दर्शनाला आले. त्यांना थोडावेळ बसू दिले आणि बाबा म्हणाले, "जा असाच जा. दादा पुजाऱ्यांच्या घरी जा." डॉ. पंडीत ताबडतोब उठले आणि पुजाऱ्यांच्या घरी गेले. त्यावेळी दोन प्रहरच्या आरतीची वेळ होती. पुजारी आरतीचे सामान घेऊन निघाले. "आपण येता कां?" असे पुजाऱ्याने त्यांना विचारले. डॉ. पंडीत त्यांच्या बरोबर आरतीला गेले.

नित्याप्रमाणे गंध, पुष्प वगैरे यथोचित पूजा झाली. पाहुणे डॉ. पंडीत यांनी बाबांचे मस्तक धरुन पुजाऱ्याच्या तबकडीतील तांबड्या गंधाचा त्रिपुंड्र कपाळावर रेखाटला. हाच बाबांच्या कपाळावर गंधाचा रेखाटलेला पहिला टिळा.

दादा पुजाऱ्यांना हा प्रकार पाहून थरकाप भरला. बाबा क्रोधावतार घेतात की काय, हे ते बाबांच्या तोंडाकडे निरखून पाहू लागले, पण तसे काही घडले नाही. उलट बाबा फारच प्रसन्न दिसले. संध्याकाळी पुन्हा जेव्हा ते बाबांकडे गेले, तेव्हा त्यांनी कुरबुर सुरु केली. ते म्हणाले, "बाबा इतके दिवस आम्ही इवलासा गंधाचा टिळा कपाळाला लावण्यास पुढे गेलो, त्यावेळी तुम्ही झिडकारले आणि आजच त्या डॉ. पंडीतांच्या भल्या भक्कम त्रिपुंड्राची हौस कशी काय आली?" बाबा हसून म्हणाले, "त्याने भावभक्तीने फसविले. माझा नाईलाज झाला."

**हिंदु-मुस्लिम एकी–** डॉ. पंडीतांजवळ खुलासा विचारला असता, ते म्हणाले, "बाबा मला माझे गुरू पुराणिककाकाच दिसले." पण एवढे मात्र खरे की, बाबांनी यापुढे कोणालाही कपाळाला गंध लावण्यास मनाई केली नाही. डॉ. पंडीतांना "जा आत्ताच्या आता, असाच जा" एवढे जे निक्षून सांगितले, त्याचाच अर्थ साईबाबांना मुस्लिम बंधुंप्रमाणे गंध न लावून घेण्याची प्रथा मोडावयाची होती. म्हणून त्यांनी ही संधी साधली. असो. बाबांचा जन्मच हिंदु मुस्लिमांची एकी घडवून आणण्यासाठी होता. रामनवमीच्या दिवशी, सकाळी दोन प्रहरी राम जन्माचा सोहळा व रात्रौ ताबूत काढण्यास मुस्लिम बंधुंना दिलेली परवानगी, हे सुद्धा तेच दर्शविते.

यापुढे दररोज त्रिपुंड्र लावण्याची प्रथा, पूजा, आरती आजपर्यंत परंपरेने चालू आहे. त्या प्रथेला हिंदु बांधवांची मनें प्रसन्न ठेवण्याचाच हेतू आहे. बाबा आशीर्वाद देताना, "अल्ला तेरा भला करेगा" असे म्हणत. त्यांनी शेवटपर्यंत फकीर वेष परिधान केला. याचा अर्थ, मुस्लिम बांधवांना दुखवायचे नव्हते, हा आहे.

आपल्या हयाती पर्यंत त्यांनी आपल्या कार्यक्रमांत बदल केला नाही.

एक मुस्लिम बंधु कुराणातील फाके मोठमोठ्याने ओरडत रात्रंदिवस सर्वांना त्रास देत होता. गावातील लोकांनी बाबांकडे गाऱ्हाणे नेले असता, त्याला बंदी केली नाही. उलट मला त्यामुळे आनंदच होतो, असे बाबांनी त्यांना सांगितले. ओरडू द्या त्याला, अशी गाऱ्हाणे देणाऱ्यांची समजूत काढली.

बाबांनी देह ठेवला, तेव्हा त्यांना वाड्यात ठेवण्यात आले. श्रीमंत बुट्टी यांचा वाडा बांधला जात असता, आपण ह्या वाड्यात हसू, खेळू, बागडू असे त्यांनी सांगितले होते. एवढे सांगूनही काही लोकांच्या आडमुठेपणामुळे बाबांचा देह तासन्तास चर्चेखाली पडून राहिला. परंतु रामचंद्र पंत कोते हे गावचे पाटील असल्यामुळे त्यांच्या दबावाखाली तडजोड झाली. मला वाटते, समाधीवर हल्ली जो गलोल वापरला जातो, तो वापरण्यास सर्रास मुभा असल्यामुळे कोठलीही अडचण आली नसावी. हिंदुधर्माच्या सहिष्णुतेमुळे मुस्लिम धर्माप्रमाणे कबरीवर सर्वांना गलोल घालण्यास मुभा आहेच.

शिर्डीचे साईबाबा हे एकट्या मुस्लिम धर्माचे किंवा एकट्या हिंदुधर्माचे उपास्य दैवत नसून, सर्व जाती धर्माचे उपास्य दैवत आहे. म्हणून हल्ली भारताच्या मोठमोठ्या शहरांतून, खेड्यांतून नव्हे कानाकोपऱ्यांतून ठिकठिकाणी साईबाबांची मंदिरे उभारली जात आहेत. परदेशातसुद्धा अलिकडे साईबाबांना सर्व लोक कलीयुगाचा अवतार मानतात. बाबांच्या भक्तगणांची वाढ एवढी बेसुमार झाली आहे की, तिरुपतीच्या बालाजी संस्थानच्या खालोखाल आज साईबाबांच्या संस्थानची भरभराट झालेली दिसते.

**नित्य मी जीवंत, जाणा हेची सत्य ।**
**नित्य घ्या प्रचिती अनुभवे**
**माझा जो जहाला काया वाचा मनी ।**
**तयाचा मी ऋणी सर्व काळ ।**
**तुमचा मी भार वाहीन सर्वथा ।**
**नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥**

बाबांच्या या वचनाप्रमाणे जो अध्यात्मिक मार्गाची वाटचाल करतो व सत्याचे पालन करतो, त्याचे मागे मी उभा आहे, असे साईबाबा सांगतात.

**सबका मालिक एक है**

साईबाबांना सर्व परमेश्वर मानतात. पण बाबा म्हणतात, "अल्ला मालिक है, मैं यादे हक्क हूँ" मी परमेश्वराचा दासोनुदास आहे. परमेश्वराचा हक्क बाबांनी आपणाकडे घेतलेला नाही. बाबांनी देह ठेवल्यावर ईश्वराचे प्रकाशीपण भक्तांना व्यापकपणे दिसू लागले. म्हणून आज शिर्डीला पंढरपूरचे रुप प्राप्त झाले आहे. आणि दिवसेंदिवस शिर्डी ही पंढरीच काय, काशी–गया होणार आहे.

**साईबाबा हे सर्वांगत होते**

शिर्डीला स्थायिक झाल्यापासून शेजारच्या दोन तीन खेड्यांशिवाय दुसरे कोठे ते

गेले नसताना सुद्धा एकाच वेळी शंभर दोनशे मैल भक्तांच्या घरचे आमंत्रण स्वीकारुन, जेऊन, दक्षिणा घेऊन सुद्धा आले.

**व्रताचे उद्यापन:** एकदा डहाणूचे देव मामलेदार यांनी आपल्या आईच्या आग्रहावरुन आईच्या व्रताच्या उद्यापना दिवशी आमंत्रण दिले. बाबांनी ते स्वीकारले. पण एक मेख मारुन ठेवली की, मी एकटा येणार नाही, माझ्याबरोबर दोन शिष्य येतील.

बाबा व्रताच्या उद्यापना दिवशी खात्रीने येतील, ही खात्री वाटली. उद्यापनाची सर्व तयारी झाली. जेवणाच्या दोनशे ब्राह्मणांच्या पंक्ती बसण्यापूर्वी दोन तास अगोदर एक गोरक्षक बंगाली संन्याशी व दोन सोबती त्यांच्या दारापुढे टांग्यातून उतरले. देव मामलेदार यांना चीड आली. हा गृहस्थ पंधरा दिवसांपूर्वी गोरक्षकणाची वर्गणी जमविण्या करता आला असताना, बजावून सांगितले होते की, आम्ही नरोत्तम रोड नगराध्यांची वर्गणी जमविण्याचे चालविले आहे, दोन महिन्याने या आणि हा गृहस्थ कोडग्याप्रमाणे आज आला आहे. पण देव मामलेदार बोलण्यापूर्वीच तो म्हणाला, मी आज वर्गणी मागण्याकरता आलो नसून जेवणाकरिता आलो आहे. हे ऐकून देव मामलेदार म्हणाले, "वहावा, वहावा! आपलेच घर आहे. अतिथींचे स्वागत असो!"

आज मोठी पर्वणीच आली आहे. देव मामलेदारांना मोठा आनंद झाला. साईबाबा येणार आहेत, त्यांच्याबरोबर हे अतिथी जेवून जातील. परंतु बाबा काही आले नाहीत. त्यांची मोठी निराशा झाली. दुसऱ्या दिवशी त्यांनी बाबांना पत्र लिहिले, तुम्ही न आल्यामुळे आमचा हिरमोड झाला. बाबांचे उत्तर आले, मी प्राण देईन पण बोललेला शब्द खोटा करणार नाही. मी तुझ्याकडे दोन सोबत्यांसह येईन, असे सांगितले होते. त्याप्रमाणे तुझ्याकडे येऊन, जेवून दक्षिणा घेऊन सुद्धा आलो. तू ओळखले नाहीस त्याला मी काय करु?

देव मामलेदार आपल्या कपाळावर हात मारुन स्वस्थ बसले.

साईबाबा कोणत्या वेषाने जाऊन आपल्या भक्ताचे लाड पुरवतील, हे सांगता येणार नाही.

साईबाबांनी आपला लाडका भक्त नानासाहेब चांदोरकरांची मुलगी प्रसूतीच्या वेळी अडली असताना टांगेवाल्याचा वेष घेऊन उदी कशी पोहचती केली आणि उदी पाण्यात घालून प्राशन करताच तात्काळ कशी सोडवणूक केली, हे मशहूर आहे. त्यावेळी नानासाहेब चांदोरकर जामनेरला प्रांताच्या हुद्यावर होते.

शिर्डीच्या साईबाबांची भक्तांच्या हितासाठी चौफेर नजर होती. कोठेलेही संकट, कसलेही असो, भक्ताच्या भावभक्तीची आर्त हाक बाबांना ताबडतोब ऐकू जात असे. पण ही आर्त हाक इ.स. १९१० पर्यंत घाटाखालील कोकणपट्टी, मुंबई वगैरे ठिकाणी जाऊन पोहचली नव्हती.

साईबाबा इ.स. १९१० पर्यंत वरील परिसरात माहीत सुद्धा नव्हते. दासगणू महाराजांची साईबाबांच्या कथेवर स्वरचित विनामूल्य कीर्तने रसाळ वाणीने गायलेली

सर्व आम जनतेने ऐकली, तेव्हा साईबाबांबद्दल उत्सुकता दिवसेंदिवस वाढत चालली.

माझे वडील बंधु कै. सहाराम सिताराम उर्फ आण्णा व त्यांचे जिवश्च कंठस्थ मित्र कै रामभाऊ देशपांडे यानी दासगणूंची कीर्तने मुंबईत ऐकली व बाबांचे दर्शन घेण्याची त्यांना उत्सुकता लागली. रामभाऊची पत्नी क्षयाने आजारी होती. एका कीर्तनात जुन्नरचे पाटील भिमाजी यांना बाबांनी नुसत्या दृष्टीक्षेपाने कसे बरे कले, ही कथा ऐकली.



**डॉ. कापडी आता**

त्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीला आजारी स्थितीत सुद्धा बरोबर घेतले. पत्नीची आयुष्य रेषा बळकट असेल, तर तिला सुद्धा साईबाबा का बरी करणार नाहीत? शिर्डीस गेल्यावर रामभाऊ देशपांडे यांनी आपली मनीषा व्यक्त केली. परंतु तिच्या पूर्व पुण्याईच्या डबक्यात पूर्वपुण्याईच्या पाण्याचा जर संचय नसेल, तर ते पोहऱ्यांत कसे येणार? साईबाबा स्तब्ध राहिले. चार दिवस ते शिर्डीला राहिले. नंतर ३ मैलावर असलेल्या उपासनी बाबांच्या साकोरीला गेले. तेथे सुद्धा रामभाऊने आपल्या पत्नीच्या आजारपणाचे गाऱ्हाणे गायले. साकोरीचे उपासनी महाराज म्हणाले, "शिर्डीच्या हायकोर्टाचा निकाल ऐकल्यावर तूं लवकरात लवकर परत मुंबईस जाणे श्रेयस्कर!" आणि तसेच घडले. मुंबईला पोहचल्यावर देशपांड्यांची पत्नी निवर्तली.

या सगळ्या प्रवासाचा मात्र माझ्या बंधुवर विलक्षण परिणाम झाला. ते साईबाबांचे परमश्रेष्ठ भक्त बनले. शिर्डीच्या साईबाबांचे गुणगान ते गावू लागले.

मला शिर्डीला जाण्याची संधी अण्णांमुळे मिळाली. मी कोणाला न विचारता वडिलांकडून थोडे पैसे घेऊन रामभाऊ देशपांडे यांचा शाळेत जाणारा भाचा मोरेश्वराला घेऊन शिर्डीला गेलो. त्यावेळी शिर्डी हे अगदी लहानसे खेडे होते. कोपरगावाहून शिर्डीला जाण्यास खटाऱ्यातून जावे लागे. आम्ही शिर्डीला पोहचलो त्यावेळी साईबाबा आपल्या लवाजम्यानिशी लेंडी बागेला निघाले होते. दिवसांतून दररोज २ वेळा लेंडी बागेत जाण्याचा बाबांचा क्रम होता. त्यावेळी ठिकठिकाणी बाबा उभे राहून आलेल्या यात्रेकरुला व शिर्डीच्या गावकऱ्यांना धुळीत सुद्धा दर्शन देत

असत. आम्ही सुद्धा गर्दीत शिरुन पहिले दर्शन घेतले. बाबांच्या मऊ मऊ पायावर पडलेले रजकण कपाळाला लावले. बाबांच्या पहिल्याच खेपेला माझ्यावर त्यांची छाप पडली. तो गुरुवारचा दिवस होता. एक दिवसाआड बाबा रात्रौ झोपण्यास चावडीत जात असत.

**चावडीचा सोहळा**

या सोहळ्याची तयारी सकाळपासून चालू होती. पालखी अंगणात ठेवलेली असून ती फुलामाळांनी सजविण्यात भक्तगण गर्क होते. पुढच्या बाजूला भजनाचा फड टाळ मृदुंगाच्या तालावर जोरजोराने चालला होता. बाबा लेंडीबागेतून आल्यावर मशिदीत कठड्यावर हात टेकून बसल्याबरोबर दर्शनाची झुंबड लागली.

**पहिला दरबार–**

इतक्यात आम्हीसुद्धा स्नान वगैरे उरकून बाबांच्या दरबाराला हजर झालो. रांगेने प्रत्येकजण दर्शन घेऊन दक्षिणा देऊन बाजूला सरकत होता. आम्ही त्यांचे अनुकरण केले. आम्ही प्रत्येकाने एक एक रुपया दक्षिणा म्हणून बाबांच्या हातावर ठेवला. न बोलता बाबांनी तो खिशात ठेवला. हा पहिला दरबार! संध्याकाळी दुसरा दरबार भरला. यावेळीसुद्धा आम्ही बाबांच्या हातावर, त्यांनी न मागता एक रुपया ठेवला

रात्रौ चावडीला जाण्याचा भव्य सोहळा निघाला. अगदी पुढे बाबांचा शामकर्ण घोडा एका भक्ताने लगाम धरलेला, थयथय नाचत होता. काही भक्त फटाऱ्या, चकासबाण वगैरे दारु सामान जाळण्याच्या कामात निमग्न होते. सकाळच्याच भजनाचा फड दिंडीच्या रुपात नाचत बागडत होता. दिंडीच्या पाठीमागे फुलामाळांनी सजविलेली पालखी मोठ्या थाटात चालली होती. अत्तर गुलाल उधळीत पालखी चालली होती. बाबांना दोघा भक्तांनी अलगत फुलासारखे उचलून धरले होते.

ठिकठिकाणी पालखीचा सोहळा थांबत होता. त्यावेळी बाबांचे पद रजकण मस्तकाला लागावे म्हणून यात्रेकरु गर्दी करीत होते. आम्हीसुद्धा गर्दीत शिरलो. अरे, एकदा झालेना दर्शन! पुनः पुनः कशाला घ्यायला पाहिजे, असे कुणी म्हणाले सुद्धा.

मी व माझा मित्र मोरेश्वर या सोहळ्यात अगदी मोकळ्या भक्तीभावाने भाग घेतला होता.

असा अपूर्व सोहळा मी उभ्या हयातीत पुनः कधी पाहिला नाही. चावडीतील एका कोपऱ्याची जागा फळ्या, हंड्या, झुंबरे, आरसे लावून श्रृंगारलेली होती. चावडीतील बाबांची झोपण्याची जागा सजविलेली होती. चावडी जवळ आल्यावर सोहळा संपला. साईबाबांना त्यांच्या ठराविक स्थानावर बसविण्यात आले.

**बाबांच्या चिलमीचा सोहळा!**

मी माझ्या मित्राला झोपण्याच्या जागी जाण्यास सांगितले. स्वतः मी एका कोपऱ्यात उभा राहून चिलमीचा सोहळा अगदी निरखून पाहिला. बाबा स्थानावर बसल्यावर त्यांची पुनः पाय पूजा, आरती वगैरे झाल्यावर बाबांनी चिलीम तयार करण्यास सांगितले. बाबांनी प्रथम स्वतः चिलीम पिवून, तात्या कोते वगैरे भक्तांना पिण्यास

दिली. ही चिलीम संपेपर्यंत भक्तमंडळी वर्तुळाकार फिरत होती. शेवटी सर्व लोक निघून गेल्यावर बाबांनी ३०-४० स्वच्छ पांढऱ्या शुभ्र धोतराच्या घड्या एकावर एक रचून त्यावर ते झोपी गेले. अशारितीने बाबांचा दैनंदिन सर्व कारभार एका दिवसात पहाण्यास मिळाला, हे सुद्धा माझे भाग्यच नव्हे, पूर्व पुण्यच होय!

दुसऱ्या दिवशी आगगाडीची परतीची तिकीटे काढल्यामुळे आम्हाला शिर्डी सोडणे भाग होते. सकाळच्या दरबारात मी एकदाच बाबांचे दर्शन घेतले आणि विचारले, "बाबा, माझे मन दोलायमान झाले असून कात्रीत सापडल्याप्रमाणे झाले आहे. मी शिक्षण पुरे करावे की वडील सांगतात त्याप्रमाणे व्यवसायात पडावे. बाबांनी विचारले, "तुला कोण व्हायचे आहे?" "मला डॉक्टरीचा अभ्यास करावयाचा आहे," मी उत्तरलो. बाबा म्हणाले, "जा, होशील डॉक्टर".

हे बाबांचे शब्द ऐकून मी हर्षभरीत झालो. पुन्हा लोटांगण घालून बाबांचे हे शब्द मी हृदयात कोरुन ठेवले.

हाच प्रश्न मी पूर्वी हुबळीच्या सिद्धारुढांना विचारला होता. त्यांचे उत्तर मला समाधानकारक वाटले नाही. माझे मेहुणे कै. डॉ. शांताराम शेट्ये यांची दांडेलीस सरकारी डॉक्टर म्हणून बदली झाली होती. तिथे जाण्याची मला एकदा संधी मिळाली होती. जवळच हुबळीला सिद्धारुढांचा मठ होता. मला माझ्या पूर्वपुण्याईमुळे अनेक संतांचे दर्शन घडले होते. त्यावेळची ही गोष्ट आहे–

साईबाबांचे हे शब्द ऐकून मी नाचायला लागलो. दोन प्रहरी जेवण आटोपून आमची परतीची तिकीटे असल्यामुळे आम्हाला मुंबईची पहिली गाडी पकडून नाशिकला उतरून दुसऱ्या गाडीने मुंबईला जायचे होते. या गडबडीत आम्हाला बाबांचा शेवटचा निरोप द्यायचा राहिला.

कोपरगावाला आल्यावर मुंबईच्या गाडीला तासभर अवकाश होता. आता मात्र भुकेचे कावळे पोटात कांव कांव करु लागले. परंतु खाण्यास काही नव्हते. माझ्या मित्राने एका चवली पावलीचे चुरमुरे आणले. त्याच चुरमुऱ्याच्या फक्या मारीत आम्ही दुसऱ्या दिवशी दोनप्रहरी बोरीबंदरला (व्हिक्टोरिया टरमिन्स) उतरलो.

शिर्डीच्या साईबाबांची शिर्डी सोडताना आज्ञा घेतल्या शिवाय जो निघतो, त्याच्यावर अनेक संकटे तरी येतात किंवा चुरमुऱ्याच्या फक्या मारीत जावे लागते, असे साईसत्चरित ग्रंथात लिहिले आहे, ते खरे ठरले.

कान व डोळे यामध्ये चार बोटांचे अंतर असते. म्हणून साईबाबा कसे होते, हे माझ्यासारख्या ९२-९३ वर्षाच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या शिर्डीच्या साईबाबांच्या भक्ताकडे लोक गर्दी करतात. हा अनुभव मी गेल्या महिन्यात ऑक्टोबर, ता. ११-१२ ला जेव्हा बडोद्याला गेलो होतो, त्यावेळी मला आला.

बाबांना भूत भविष्य आणि वर्तमान काळाची त्रिकाल दृष्टी होती. त्या दृष्टीने बाबांनी जे अद्‌भूत चमत्कार दाखविले, ते सांगण्याचा मी निरनिराळी उदाहरणे दाखवून प्रयत्न केला.

साईबाबा सत्तर वर्षाचे वृद्ध असले तरी तेजःपुंज होते. कांती तांबस वर्णाची निमगोरी होती. बाबा अजान बाहू होते. डोळे भेदक होते. पण मायाळू दृष्टी होती. शांती, क्षमा, दया हे तीन गुण बाबांच्या निर्मळ प्रसन्न वृत्तीमध्ये दिसत होते. कधी कधी बाबा क्रोधावतार घेतात, असे ऐकले होते, तो मला पाहायला मिळाला नाही. अंतःकरण लोण्याहून मऊ होते. हातापायाचो बोटे लांबलचक होती. त्यामुळे मी त्यांना अजानबाहू होते, असे म्हणतो. पण कोणत्याही फोटोत आपण अजानबाहू आहोत, हे दाखविण्याचे त्यांनी टाळले आहे. हाता-पायाच्या लांबलचक बोटावरून ते अजानबाहू होते, हे ठरवता येते. फक्त परमेश्वराची विभूती अजानबाहूची असते.

बाबा बाह्यात्कारी फकीर होते, पण त्यांना कसलीही फिकीर नव्हती. ना घर ना दार, दररोज माधुकरी मागून प्रथमच्या काळात त्यांची त्यावर उपजिविका चाले. काखेला झोळी व हातात टमरेल, अशा वेषात ते इ.स. १९१० पर्यंत वागले. पण नंतर भक्तांची निरनिराळ्या पक्वान्नांची ताटे येऊ लागली. ती बसून आपल्या हाताने गोपाळ काला करुन जमलेल्या भक्तांना वाटून टाकीत. हा सोहळा सुद्धा आम्हाला पाहायला मिळाला नाही.

श्री संत चूडामणी श्री समर्थ साईबाबा की जय!

115

## श्री साईलीलाच्या सभासदांस निवेदन

'श्री साईलीला' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई–४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनीऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास, तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थान' आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
* श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

# साईदरबारातील माणिक आणि मोती - ६
# श्रीबाबांची परमभक्त श्री राधाकृष्णामाई

– साईनंद

बाबांच्या परमभक्त श्री राधाकृष्णामाईंचे मूळ नाव सुंदराबाई क्षीरसागर. अहमदनगरचे प्रसिद्ध वकील श्री.बाबासाहेब गणेश यांच्या ह्या नात. त्यांना पंढरपूरचे क्षीरसागर कुटुंबात दिले होते. त्या वयाच्या १८-२० वर्षांच्या असताना त्यांचे पती वारले. तेव्हापासून त्या सकेशा बालविधवा होत्या. त्या तरुण, देखण्या, सशक्त व काळ्या-सावळ्या वर्णाच्या होत्या. श्रीबाबांची कीर्ती ऐकून इतर भक्त जसे शिरडीस येत, तशा त्यापण पंढरपूराहून कै. नानासाहेब चांदोरकर यांच्या बरोबर इ. स. १९०५-१९०६ च्या सुमारास शिरडीस आल्या. त्यांना कुणीही पत्र पाठवून शिरडीस बोलावले नाही. त्या स्वयंस्फूर्तीने शिरडीस आल्या. त्यांची बाबांवर अत्यंत प्रेमळ भक्ती असून त्यांनी आपले तन व मन त्यांना सर्वस्वी अर्पण केले होते. शिरडीस त्या आल्यापासून बाबांनी त्यांना मशिदीची पायरी कधीही चढू दिली नाही; व आपण कधीही मशिदीत आल्या नाहीत, किंवा मशिदीत येण्याचा त्यांनी कधीही हट्ट किंवा आग्रह धरला नाही. बाबा हे आपल्या पूर्वजन्मीचे पती होत, असे समजून त्या बाबांची सेवा करीत,व आपला चेहरा विनयपूर्वक लज्जेने झाकून घेत. तो कधीही बाबांना दाखवित नसत. बाबाही ही पूर्वजन्मी आपल्या जवळ होती, पण आपण तिला कधी शिवलो नाही, असे म्हणत, असे बाबांचे निकटवर्ती भक्त माधवराव देशपांडे ऊर्फ श्यामा म्हणत. बाबा त्यांना योग्य मान देत व मशिदीसमोर थोड्या अंतरावर असलेल्या एका लहानशा घरात त्यांची राहण्याची व्यवस्था त्यांनी केली होती. बाबा त्यांना दररोज एकदा दुपारी आलेल्या भिक्षेपैकी काही भाग व नैवेद्यापैकी एक भाकरी व थोडीशी भाजी माधवरावांच्या बरोबर पाठवीत असत. बाबांकडून जी भाजी-भाकर येई, तोच प्रसाद मानून त्या त्यावरच राहात; आणि बाबांच्या चरणांचे तीर्थ मिळवून त्याचा पाण्याऐवजी उपयोग करीत. ह्या शिरडीस आल्यापासून बाबांना नित्यनेमाने पाच गोविंद विडे व कुटलेले विडे पाठवीत व त्यापैकी एक कुटलेला विडा बाबा रोज दुपारच्या भोजनानंतर खात व पाणी पीत. त्यांच्याजवळ एक लहानशी धातूची गोपाळकृष्णाची मूर्ती होती. त्या मूर्तीस त्या अहोरात्र जवळ बाळगीत. त्यांच्या मुखात राधाकृष्ण हे नाव निरंतर असे व त्यामुळेच त्यांना राधाकृष्णी हे नाव पडले. बाबासुद्धा त्याचा उल्लेख रामकृष्णी किंवा राधाकृष्णी असाच करीत.

राधाकृष्णामाई शिरडीस आल्यापासून बाबांची पूजा व आरती होऊ लागली, व आरतीच्यावेळी अबदागीर, चवऱ्या, छत्रचामरे बाबांवर ढाळू लागली. बाबा एक दिवसाआड चावडीत झोपावयास जाऊ लागले. ते चावडीत जाताना वाजतगाजत घोडा श्यामकर्ण, पालखी, चोपदार, भजनमंडळी, गरुडटके, पताका वगैरे इतमामानिशी जात असत. बाबांची शेजारती व काकडआरती माई आल्यापासून सुरु

झाली व ती सारी व्यवस्था राधाकृष्णामाईकडेच असे. चावडीची मिरवणूक निघाल्यावर त्या स्नान करुन पाच दिवे कंदिलात ठेवून स्वत: पांढरे पातळ नेसून तोंडावर बुरखा घेऊन तो कंदिल मशिदीच्या पायरीवर ठेवून नमस्कार करुन परत जात असत.

बाबा चावडीत झोपावयास जाऊ लागल्यामुळे चावडी आरसे, हंड्या, झुंबरे व तसबिरीं इत्यादींनी सजली गेली. पूजेच्या आरतीच्या व चावडीच्या मिरवणुकीचे कामासाठी तसेच गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी, रामनवमी इ. उत्सवासाठी चांदीची भांडी, मौल्यवान वस्त्र-भूषणे, गॅसचे सुंदर लहानमोठे दिवे आणविण्याची व सर्व करुन घेण्याची सर्व कामगिरी माई श्रीमानभक्तांकडून करवून घेत. पण बाबांना या सर्व इतमामाची मनापासून इच्छा किंवा अपेक्षा नसे. ते हे सर्व नको नको म्हणत व शिव्याशाप देत, राग वत. श्री. नानासाहेब चांदोरकरांना ते नेहमी सांगत, 'आपली खरी इस्टेट किंवा ऐश्वर्य म्हणजे फाटके तरट, माथ्यावरील पांढरे फडके, पायघोळ कफनी, एक खापर, चिलीम, तंबाखू, टमरेल, सटका, (लहान सोटा) इतकेच काय ते. पण भक्तलोक अनेक अनावश्यक व निरुपयोगी वस्तू, बहुमोल आभूषणे आणून आपणाला त्रास देतात. त्यांची मुख्य शिकवण अशी असे, की गरीबी अव्वल बादशाही अमीरीसे लाख सवाई ॥ गरिबोंका अल्ला भाई । अक्षयी साई वतन की ॥

बाबा भक्त राधाकृष्णामाईंची रोजची मुख्य कामगिरी म्हणजे मशिदीपासून लेंडीस शौचास जाण्याचा बाबांचा रस्ता साफ करणे ही होती. आपल्या अखेरपर्यंत त्यांनी ही सेवा स्वखुशीने व मोठ्या आनंदाने केली. त्या शिरडीस नऊ दहा वर्षे राहिल्या व १९१६ साली आपल्या वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांनी आपला अवतार शिरडीसच संपविला. त्या प्रेमळ व मनमिळाऊ होत्या.

त्यांच्या नंतर माईंच्याकडील बाबांची कामगिरी बाबांचे एक निस्सीम भक्त अब्दुलभाई करु लागले. बाबा रोज मशिदीतून साठे-नवलकर यांच्या वाड्यापर्यंत फिरावयास व हातवारे करावयास जात, त्यावेळी त्यांना ऊन लागू नये म्हणून व पूजेसाठी फुले सहज मिळावी म्हणून तितक्या रस्त्यावर लोखंडी कमान बांधून तीवर सुवासिक पुष्पवेली लावण्याची कामगिरी बाबा नको नको म्हणत असता व शिव्याशाप देऊन रागे भरत असता साईभक्त श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे यांच्या साहाय्याने त्यांनी करुन घेतली. तसेच मशिदीची दुरुस्ती, पाया बांधणे इ. जरुरीची कामे पण त्यांनीच करुन घेतली.

राधाकृष्णामाई या बाबांच्या उदार, प्रेमळ, उत्कट, निस्सीम व अनन्य भक्त होत्या. त्यांनी बाबांची व त्यांच्या संस्थानची मनोभावे सेवा केली व इतर अनेक भक्तांकडून करुन घेतली. त्यामुळे त्यांचा परमार्थातील अधिकार फार मोठा व उच्च दर्जाचा झाला होता. भक्त या नात्याने त्यांचा बाबांचा काय संबंध होता, हे स्वत: बाबांनाच काय ते माहीत? त्या उत्कृष्ट गायिका होत्या व त्यांचा कंठही गोड, दिव्य, मधुर असा होता. त्यांना संगीताचे ज्ञान होते. त्यांना सतारपण वाजविता येत असे.



# साईनाम – कलीयुगांतील नामावतार

– श्री. आंतोन शायेर फर्नांडीस
मुक्काम – उभादांडा, चमणकरवाडी,
ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग-४१६५१६.

**"नाम संकीर्तन साधन पै सोपे।"**

भगवंत प्राप्तीसाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे– १) शुद्ध आचरण २) शुद्ध अंतःकरण ३) भगवंताचे नामस्मरण. शुद्ध आचरण म्हणजे प्रामाणिकपणा, धार्मिक आचार आणि नीतीचे वर्तन. शुद्ध अंतःकरण म्हणजे अभिमान नसणे, द्वेष, मत्सर नसणे. आणि सर्वजण सुखी असावेत, अशी भगवंताची प्रार्थना करणे. भगवंताचे नामस्मरण म्हणजे भगवंताचा केव्हांही विसर न पडणें.

या सर्व साधनांपैकी नामभक्तीचे साधन अतिशय सोपे आहे. यापेक्षा सोपे साधन दुसरे नाही.

**"न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळीचे धर्म ।**
**आणिक न करावे श्रम । एक पुरे नाम श्रीसाईंचे ॥"**

या साधनासाठी गृहस्थाश्रम सोडावा लागत नाही. देवाच्या नामस्मरणाशिवाय दुसरे कठीण श्रम करावे लागत नाहीत.

**"गोड गोमटे हे अमृतासी वाड ॥"**

नाम हे अमृतापेक्षाही गोड आहे.

**"मुक्तीवरील भक्ति जाण । अखंड मुखी नारायण ॥"**

मुखाने अखंड नामस्मरण करणे, ही नामभक्ती मुक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे.
ज्ञानदेवांनी म्हटले आहे– **"नामामृत गोडी वैष्णवीं लाधली। योगियां साधली जीवन कळा॥"** **"ॐ तत् सत्"** या मंत्राने असे सुचविले आहे की, "ॐ म्हणजे परमात्मा. परमात्म्याची अनंत नामे आहेत. म्हणून व्यासांनी केलेले विष्णू नाम सदोदित स्मरावे. विष्णू म्हणजेच श्री साई. साई म्हणजेच विश्वव्यापक तेज, असा अर्थ आहे. विश्वीं विश्वंभर, जनी जनार्दन भरलेला आहे.

**"नाही आकार विकार । चराचर भरलेसे ॥**

या ईश्वराला आकार-विकार नाही. सर्व जगामध्ये ईश्वर भरलेला आहे. या विश्वव्यापक ईश्वराची भक्ती म्हणजेच सर्व प्राणमात्रांची सेवा आहे.

**"सोडूनियां लाख चतुराई । स्मरा निरंतर "साई साई"।"**
**"बेडा पार होईल पाहीं । संदेह कांही न धरावा ॥"**

**श्रीसाईसतचरित्र, अध्याय १०, ओवी १३५.**

आपण निरंतर श्री साईंचे नामस्मरण केल्याने आपला बेडा पार होईल. याबद्दल आपण मुळीच संदेह (संशय) धरू नये. आपण नामस्मरण का करावे?
१) श्रीसाईबाबांचे नामस्मरण करण्यास कोणत्याही जातीचे बंधन नाही. श्रीसाईबाबांचे नाम हे कोणालाही घेता येते. त्यासाठी विशिष्ट जात किंवा धर्म पाहिजे असे नाही.

**"नरनारी याती हो कोणी भलती।**
**भावे एका प्रीती नारायणा॥"**

स्त्री असो किंवा पुरुष असो किंवा कोणत्याही जाती-धर्माचा असो,तो साईभक्ती करु शकतो. नामस्मरण करणारा कोणत्याही वर्णाचा किंवा वयाचा असो, त्याचा उद्धार होतो. **"ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र। चांडाळाही अधिकार।**
**बाळे नारीनर। आदिकरोनी वेश्याही ॥"**

देवाचे नामस्मरण करण्यास ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळ, लहान मुले तसेच पुरुषांप्रमाणे स्त्रिया, इतकेच नव्हे तर वेश्या देखील अधिकारी आहेत.

**तुका म्हणे नाही जाती सवे काम ।**
**ज्याचे मुखी नाम तोचि धन्य ॥**

नामस्मरण करणारा कोणत्याही जातीचा असला तरी तो धन्य आहे.

२) नाम हे स्थिर आहे. रुप हे सारखे बदलणारे आहे.

जो नाम घेतो, तो खरा स्मरणात राहतो आणि त्यालाच खरे दर्शन होते. ते रोज सतेज होत असते. देहाचे दर्शन हे विसरणारे असते. भगवंताची सगुण मूर्ति नेहमीच आपल्याजवळ राहणे शक्य नसते. पण तिची खूण भगवंताच्या नामांत आहे. भगवंत सगुणामध्ये असताना रावणाची किंवा दुर्योधनाची बुद्धि पालटू शकले नाहीत. सगुण अवताराने वासना किंवा बुद्धि पालटण्याचे कार्य होऊ शकत नाही. सद्बुद्धि उत्पन्न करण्याचे सामर्थ्य फक्त भगवंताच्या नामातच आहे. व्यवहारामध्ये सुद्धा आपण पाहातो की, रुप गेले तरी नाम शिल्लक राहते. म्हणूनच राम, कृष्ण इत्यादी सर्वजण नाहीसे होऊन केवळ त्यांचे नाम तेवढे शिल्लक राहिले.

३) परावलंबित्व नाही— (नाम घेण्यास दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागत नाही.)

नाम साधनाची सामुग्री माणसाजवळ जन्मल्यापासूनच असते. नाम साधनेत आपल्याजवळ असलेल्या जीभेचा आपण उपयोग केला म्हणजे काम भागते. उदा. ज्ञान हे साधन जर आपण निवडले तर ते ज्ञान सांगणाऱ्या गुरुची आवश्यकता असते. ज्ञान ग्रहण करण्यासाठी कुशाग्र बुद्धिची आवश्यकता असते. तसेच योग साधनासाठी जागेची सुचिता, ब्रह्मचर्य, प्रकृतीचे स्वास्थ्य ह्या गोष्टी आवश्यक आहेत. श्रवणशक्ती करावयाची असेल तर कोणी तरी सांगणारा पाहिजे. कीर्तन भक्ती करावयाची असेल तर टाळ, मृदंग, टाळकरी, श्रोते यांची आवश्यकता आहे. अर्चन करावयाचे असेल तर देवाची मूर्ति, गंध, फुले, अक्षता इत्यादींची आवश्यकता आहे. नाम साधनेत असे परावलंबित्व नाहीं. आपल्याजवळ असलेल्या जीभेचा आपण उपयोग केला म्हणजे काम झाले.

४) रामनाम किवा साईनाम हा नुसता मंत्रच आहे, असे नव्हे, तर तो सिद्धमंत्र आहे. हा मंत्र आपणास भगवंतापर्यंत नेतो, नव्हे; तो भगवंताला आपल्याकडे खेचूनच आणतो. रामनाम हा देहबुद्धि जाळणारा अग्नि आहे. रामनाम हे ओंकाराचेच स्वरुप आहे. ते सर्व कर्मांचा आणि साधनांचा प्राण आहे. श्री शंकरापासून तो श्री समर्थांच्यापर्यंत जे जे महासिद्ध होऊन गेले, त्या सर्वांनी रामनाम कंठी धारण केले.

५) नाम पावन आहे.

**"नाम पावन पावन । त्याहुन पवित्र आहे कोण ॥"**

नाम हे अतिशय पवित्र आहे. त्यापेक्षा पवित्र वस्तू जगात दुसरी कोणतीच नाही.

६) नामभक्ती सोपी आहे.

**"नाम घेता न लगे मोल । नाममंत्र नाही खोल ।**
**दोन अक्षराचे काम । उच्चारावे राम राम ॥"**

नाम घेण्यासाठी पैसे खर्च करावे लागत नाहीत. नाम उच्चारावयास काही कठीण नाही राम या दोन अक्षरांचेच काम आहे.

"राम राम" म्हणण्याचा परिणाम स्थुलातून सूक्ष्माच्या पलिकडे जाणे, म्हणजे अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. म्हणून "राम राम" म्हणून राम कसा भेटेल, अशी शंका न घेता "राम राम" जपावा.

नामस्मरण केल्याने काय होते?

१) **"साई साईति नामस्मरण । करील सकल कलिमल दहन ।"**

"साई साई" नामस्मरण केल्याने आपल्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या दुष्ट वासना नष्ट होतात. वासना ही दुसऱ्या कोणत्याही उपायांनी तृप्त होणारी नसून आपण जर भगवंताजवळ "वास" ठेवला, तरच ती नष्ट होते. वासना नष्ट झाली की, बुद्धि भगवंत स्वरुप होते व आपणास भगवंताची प्राप्ती होते.

२) पाप क्षालन - नाम घेतल्याने जन्म जन्मांतरीची पापे जळून जातात.

**"नाम संकीर्तन साधन पै सोपे ।**
**जळतील पापे जन्मांतरीची ॥"**

३) विघ्नांचा नाश–

**"नामाच्या चिंतने । बारा वाटा पळती विघ्ने ॥"**

नामाचे चिंतन केले असता विघ्ने बारा वाटांनी पळून जातात.

४) **"कृतयुगी जें प्राप्त "ध्याने"। त्रेतीं "यजने" द्वापारी "अर्चने"।**
**ते प्राप्त सर्व "नाम संकीर्तने"। गुरुभजने कलियुगी ॥**

श्रीसाईसतचरित, अध्याय ३रा, ओवी २७

कृतयुगामध्ये जे पुण्य ध्यानाने मिळत होते, त्रेतायुगामध्ये यजनाने प्राप्त होते, द्वापारयुगामध्ये अर्चनाने जे पुण्य होते, तेच पुण्य फल कलीयुगामध्ये नामस्मरण केल्याने तसेच गुरुभजन केल्याने प्राप्त होते.

कलीयुगात सगुण अवतार नसला तरी "नामावतार" आहे आणि तोच खरा तारक आहे.

५) नामस्मरण केल्याने देह पवित्र होतो.

**पवित्र तो देह आणि पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥**

नामस्मरण केल्याने देह पवित्र व वाणी पुण्यवंत होते.

६) भवसिंधु तारक - नामस्मरण केल्याने हा संसाररुपी भवसिंधु तरुन जाता येतो.

**७) नाम घेता कंठी शीतळ शरीर। इंद्रिया व्यापार नाठवती ॥**

त्रिविध तापापासून मुक्ती मिळते. इंद्रियांना व्यापार आठवत नाहीत.

**८) राम नाम गर्जेवाचा काळ। आज्ञाधारक त्याचा ॥**

नामस्मरण केल्याने काळदेखील आज्ञाधारक होतो.

९) नामस्मरणाने जन्ममरणाचा फेरा चुकतो.

**१०) राम म्हणे भोगी त्यागी । कर्म न लिंपे त्या अंगी ।**

भोग भोगताना किंवा त्याग करताना नामस्मरण केल्यास कर्माचा दोष लागत नाही.

११) मुखी नाम हाती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतांची ॥

नामस्मरण केल्याने मोक्षप्राप्ती होते.

१२) नामस्मरण केल्याने समाधी सुखाची प्राप्ती होते.

१३) नामस्मरण केल्याने कली आणि काळ हे ही आपणास,म्हणजे साधकास शरण येतील. मायेचा पाश तुटेल व सर्व रिद्धिसिद्धि दासी होतील.

# श्री साईनाथांनी द्वारकामाईत विशिष्ट वस्तूच का ठेवल्या बरे?

**— डॉ. सुमन खानविलकर**
सीताकुंज, मुंबई-पुणे मार्ग,
लोणावळा (पश्चिम).

माणूस आपले संसारातून विटलेले मन शांत करण्यासाठी नाना तऱ्हेने मन रमविण्याचा प्रयत्न करतो. पण मनाची अशांतता अधिक वाढते.

त्यामुळे माणसाने काय करावे, असा प्रश्न प्रत्येकापुढे पडतो. मला वाटते, हे जे साधु-संत होऊन गेले, त्यांनी जे जे सांगितलेले तसेच आचरणात आणलेले असे जे काही, ते आपण त्यातला मतितार्थ जाणून घेतला व त्याप्रमाणे वागायचे ठरवले तर बराचसा फायदा होईल.

हेच पहा ना !आपले साईबाबा, त्यांनी त्यांच्या हयातीत द्वारकामाईत ठेवलेल्या वस्तू त्याच का? याचा विचार करु व त्यापासून आपण काय घ्यावे, असे बाबांना वाटत होते, याचा विचार करु या.

**पाणी पिण्याचे मडके:—** पाणी पिण्यासाठी ठेवलेले मातीचे मडके. मडकं नि मनुष्य यांच्यातील साम्याचा विचार करु या. मनुष्य प्राणी हा पंचतत्त्वानेच बनतो, हे सर्वांना माहीत आहेच. मडकं सुद्धा पृथ्वी (माती). ती मळण्यास पाणी, सुकण्यासाठी वायू व भाजण्यासाठी अग्नी व पोकळीमध्ये आकाश आहेच.

जसे माणसाचे भाग्य ठरलेले,तसेच याचेही भाग्य ठरलेले. एखादे मडके संताच्या

सहवासात किंवा गूळ भरण्यासाठी, दही ताक करण्यासाठी वगैरेला उपयोगात येते, तर एखादे जागीच फुटते, काही भिकाऱ्यांच्या हातात, काही संतांच्या हातात, कोणी अग्नी घेऊन स्मशानात, तर कोणी गोकुळ अष्टमीच्या सोहोळ्यातली हंडी बनते. हे त्याचे रुप तर अगदी वेगळेच हो !कारण त्यात लाह्या-बत्तासे भरलेले, वरती फुलांच्या माळांनी सजवलेले, उंच बांधलेले, साऱ्यांचे लक्ष त्याच्याकडे वेधलेले. शेवटी कृष्णजन्म होतो. कीर्तनातील कृष्ण स्तुतीच्या गजरात ते फोडले जाते. त्याच्या तुकड्या तुकड्याला किंमत येते. ही बुद्धिवादी माणसे ते तुकडे तिजोरीत, पेटीत, दुधदुभत्याच्या कपाटात ठेवतात. इतका मान असतो या निर्जीव मातीच्या मडक्याचा, फुटल्यानंतर सुद्धा. परंतु माणूस श्रेष्ठ कलाकृती परमेश्वराची, पण मेल्यावर कोणताच उपयोग नाही. तेव्हा प्रत्येक माणसाने हयातीत स्वतः भक्तीरसाचा स्वाद घ्यावा व दुसऱ्यांना द्यावा. सत्कर्माने जगा नि दुसऱ्याला जगवा. प्रत्येक अवयवाचा सदुपयोग करा. बुद्धीने परमेश्वर ओळखण्याचा प्रयत्न करा. पुढील जन्माचे भाग्य बनवा.

**कोळंबाः–** मातीचे भांडे हे फार जपून वापरावे लागते, कारण ते एकदा का पडले की फुटले. मग ते सांधता येत नाही. त्याचा उपयोग पण नाही. तसेच हे शरीर चालते-बोलते आहे तोपर्यंत ठीक. माणसाचे जीवन म्हणजे खापराचे भांडे. कारण आपण पहातोच, निरनिराळे आजार, अपघात, वृद्धावस्था, मरण. त्यामुळे यांच्यावर जास्त माया करण्यात अर्थ नाही. तेव्हा माझ्या बाळांनो, या गोष्टी डोळ्यासमोर ठेवा. परमेश्वराचे अस्तित्व सत्य आहे. बाकी सारे अशाश्वत आहे. तेव्हा त्याचा लोभ धरु नका. माया, ममता तुमचा नाश करणारी आहेत. तेव्हा या नश्वर देहाला हाताशी धरुन परमेश्वरी कृपा संपादन करा. या देहरुपी कोळंब्यात सत्कर्माचे खाद्य व नामस्मरणाचे पाणी ओतून त्याला शाश्वताकडे न्या. दुष्ट वासनांचा जरासुद्धा या देहाला तडा जाऊ देऊ नका. हे भांडे निकामी करु नका. या देहाने तुम्हाला आतापर्यंत खूप मदत केली आहे. तेव्हा त्याला सुद्धा सद्गती मिळेल, असाच त्याचा वापर करा. अर्थात त्याला षड्रिपु पासून जपा, हीच सद्गुरु साईनाथांची इच्छा असावी.

**जातेः–** अरे माझ्या लेकरांनो, तुम्ही सुद्धा संसार रुपी चक्रात कर्तव्य करुन करुन थकलात की, आपोआप तुम्हाला आलेल्या अनुभवाने संसाराचा व इतर गोष्टींचा कंटाळा येतो. आणि तुम्ही भगवंताकडे वळाल तेव्हा या जात्याचे उदाहरण लक्षात ठेवा. जात्याच्या मधल्या खुट्याप्रमाणे भगवंत स्थिर आहे व वरच्या खुंट्याप्रमाणे तुमची कर्मगती आहे. तो जसा फिरविला जातो, तसे आतल्या दाण्याचे पीठ भरडा होणे चालू असते. तुमच्या कर्माचा खुंटा जसा फिरवाल, त्याच्यावर तुमचे आत्ताचे व पुढील जन्माचे जीवन अवलंबून राहील. तुम्ही निष्काम कर्मयोगाने त्या परमेश्वराला जिंकू शकाल.

तसेच जात्यात घातलेल्या दाण्याचे उदाहरण. जे दाणे मधल्या खुंट्याला धरुन राहतात, ते तसेच अखंड राहतात. जे त्या घर्षणात सापडतात ते भरडून जातात. तेव्हा तुम्ही भगवंत नामाच्या खुंट्याला धरुन रहा, म्हणजे भीती नाही, तरुन जाल. मग वरचा खुंटा कोणीही कसाही फिरवू दे, तुम्ही भगवंताला भक्तीभावाने घट्ट पकडून

ठेवा. दुसरे असे, सुपातले दाणे जात्यात पडणाऱ्यांना हसत असतात, कशी झाली फजिती. पण या कालचक्रातून कोणी सुटत नसते. तेव्हा अहंकाराला, मीपणाला थारा देऊ नको, बुद्धीप्रदान माणसा !

**धुनी:—** माझ्या लाडक्या, अरे तुला हा जो तुझ्या पूर्व सुकृताने गोजिरवाणा देह मिळाला आहे ना, हा पंचतत्वाचा बनलेला आहे. त्यात असणारी आत्मारुपी ज्योत एकदा का मावळली की, त्याची राख होते. बघ, तेव्हा त्याआधी तुझे अवयव ठिकाणावर असताना, शुद्ध बुद्ध हरपली नाही तोपर्यंत, ज्या परमेश्वराने तुला बनवले, त्याचे नामस्मरण कर, भक्ती कर. हाताने, पायाने, मनाने, धनाने सत्कर्म कर रे बाबा ! आणि परमेश्वर प्राप्ती करुन घे. एकदा का हा देह पंचतत्वात मिसळला की, काही उपयोग नाही. आलेली संधी वाया घालवू नको. इतरांच्या मृत्यूनंतर त्यांची होणारी राख पाहून तरी शहाणा हो. मृत्यू जन्मापासून आपली साथ करत आहे. कधी झडप घालून अशीच आपल्या देहाची अवस्था होणार, हे सतत स्मरणात ठेवलेस, तर तुला पटेल की, परमेश्वराशिवाय या जगात अमर कोणीच नाही. म्हणून त्या परमेश्वर रुपी ज्योतीला भेटायचे, मिलन करायचे असेल, तर नामस्मरणाशिवाय या कलियुगात उपाय नाही, हे त्रिवार सत्य असताना, सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट असताना आपण वृद्धापकाळाची वाट पहात बसतो. वृद्धापकाळात ध्यानात येऊन बेटा काही उपयोग नाही. कारण सारेच अवयव न ना चा पाढा म्हणू लागलेले असतात.तेव्हा आताच सुरु कर, श्रध्दायुक्त भक्तीला. नि तुझा तूच उद्धार करुन घे.

**समई:—** गोड्या तेलाचे दिवे. दिवा म्हटला की, प्रकाश एवढेच डोळ्यासमोर येते. प्रकाश म्हणजे आनंद, हा ज्योती पासून मिळतो. भगवंत हा निराकार स्वरुपाचा आहे. त्याचे वर्णन ज्योती स्वरुप, तेजोमय, आनंददायी, प्रकाशमय असे केले आहे व ते सर्वांना मान्य आहे. त्यामुळे येथे ही ज्योत तेवत ठेवली आहे.

भक्तांनी त्या गोड्या तेलाच्या ज्योतीचे उदाहरण घेऊन वागावे. जशी ही ज्योत संथ व शांतपणे जळत असते, तिचा प्रकाश मनाला, डोळ्यांना आल्हाद देणारा नि शांत असतो, तसेच ज्ञान मिळविणाऱ्या माणसाने अज्ञानाचा नाश करण्याकरिता, ज्ञानाचा प्रकाश मिळविला पाहिजे. अर्थात त्याने शांततेचे धोरण स्वीकारुन मनाला स्थिर केले पाहिजे. त्याच्या मनाची चलबिचल होता उपयोगाची नाही. मन, वृत्ती यांत संथपणा आला पाहिजे.

तसेच भगवंताचे नामस्मरण, भक्ती, ध्यान करताना चित्त एकाग्र असावे लागते. अर्थात मन शांत नसेल तर एकाग्रता होणार नाही. तेव्हा मनाची शांती ढळवणारे इतर विचार मनात येऊ द्यायचे नाहीत, सतत संथपणे व शांततेने मन केंद्रित करा. हेच हा गोड्या तेलाचा दिवा आपणास सांगत असावा, हे भक्तांच्या लक्षात येऊन अज्ञानरुपी अंधःकार संपून ज्ञानाची ज्योत तेवत रहावी, हीच बाबांची इच्छा असणार.

**धान्य भरलेले पोते:—** या पोत्यापासून पुढील विचार घ्यावेत, असेच वाटत असावे बाबांना.

मी पोते आहे. माझ्यात धान्य भरा की शेणी भरा, मी आपला तटस्थ. माझ्यात खांडवा गहू भरा, जोंधळा भरा, तांदूळ भरा, माल किडका असो, चांगला असो. दाभणाने टोचून टोचून शिवण काम करा अगर दोरीने करकचून बांधा. मी आपला स्थितप्रज्ञासारखा क्षमाशील वृत्तीने राहणार. असे का, म्हणून कोणाला दोष देणार नाही की वाईट म्हणणार नाही. मला कोणते काम दिले आहे? सामावून घेणे. बस! तसाच माणसानी विचार करावा. पूर्व प्रारब्धानुसार वाट्याला आलेली कर्मे कुणालाही दोष न देता कर्तव्य बुद्धीने, निष्काम वृत्तीने करून, क्षमाशील वृत्ती ठेवा, अर्थात् आपापल्या प्रारब्धानुसार सोपवलेली कर्तव्य कर्मे आनंदाने करा.

मागील जन्मजन्मांतरीच्या कर्मानुसार तुम्हाला सुख अगर दु:ख भोगावे लागते. मान-अपमान पूर्व सुकृतानेच मिळत असतो. तरी मनाची चलबिचल होऊ देऊ नका. सुखात परमेश्वराला विसरु नका. दु:खात त्यालाच नव्हे, माणसांना सुद्धा दोष देऊ नका. पोत्यासारखे तोंड बंद ठेवा. आत नामाची रास भरा, सदा नामाशी एक रहा.

ॐ ॐ

## नामाचा महिमा

साईनामाचा महिमा। वर्णावा किती  
वर्णनासाठी शब्द। अपुरे पडती  
मुखी घेता साई। साई नाम  
तपात स्वत:ला। विसरुन जाई मानव  
बाबा बाबा म्हणूनी। हाक मारी भवती  
स्वरुप दर्शन देती। गुरुदत्त  
दुजा सहाय्यी। जो पुढे करी हात  
सुखाला ना अंत। साईकृपे  
अशी थोर आहे। माझी जगजेठी  
कृपेची ना तुटी। आजवरी  
साईच्या स्मरणे। होई मन चूर  
आनंदाचा पूर। त्रिभुवनी

**— कु. शोभा आळवे**  
७०/९, दत्तधाम,  
डहाणूकर वाडी, दत्तमंदिर रोड,  
मु. पो. कांदिवली, मुंबई - ६७.

# इति श्री साई उवाच

**संकलन – श्री. डी. जी. देशपांडे**
'खुइ-सिल-नाझ', कोहिनूर रोड,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

(मागील अंकावरुन क्रमश:)

३४

अरे जरी मी झालों फकीर। घर ना दार बेफिकीर।
बसलों एका ठायीं स्थिर। सारी किरकिर त्यागुनी॥
तरी ती माया अनिवार। मलाही गांजी वरचेवर।
मी विसरें परी तिजला न विसर। मजही निरंतर कवटाळी॥
आदिमायाच ती हरीची। त्रेधा उडविते ब्रह्मादिकांची।
तेथ मज दुबळ्या फकीराची। वार्ता कैंची तिजपुढें॥
हरीच होईल जेव्हां प्रसन्न। तेव्हांच होईल ते विच्छिन्न।
विना अविच्छिन्न हरिभजन। माया निरसन नोहे पां॥

– अ. १३ वा

३५

पाप जयांचें विलया गेलें। ऐसे जे पुण्यात्मे वहिले।
तेच्च माझे भजनीं लागले। खूण लाधले ते माझी॥
'साईं साई' नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्यहाळ।
या बोला विश्वास ठेवाल। पावाल कल्याण निश्चयें॥
नलगे मज पूजा संभार। षोडश वा अष्टोपचार।
जेथें भाव अपरंपार। मजला थार ते ठायीं॥

– अ. १३ वा

३६

शामा हे चोर आणून किती। घालिशी माझे अंगावरती।
काय हे कृति बरी का।
बैस आतां सोडीं खंत। खंत न करिसी विचारवंत।
झाला तुझीया भोक्तृत्वा अंत। पाय शिरडींत टाकितां॥
आकंठ संकटार्णवीं बुडाला। हो कां महादु:खगर्तेत गढला।
जो या मशीदमाईची पायरी चढला। सुखा आरुढला तो जाणा॥

३७

फकीर येथींचा मोठा दयाळु। करील व्यथेचें निर्मूळ।
प्रेमें करील प्रतिपाळु। तो कनवाळु सकळांचा॥
यालागी तूं स्वस्थ पाहीं। भीमा बाईच्या सदनीं राहीं।
आराम तो एका-दो दिसांही। जा कीं होईल तुज प्रति॥

— अ. १३ वा

३८

"माझी कथा मीच करीन"

— अ. १३ वा

३९

दहीं भाताचे कांहीं कवळ। लक्ष्मी आईचे देऊळाजवळ।
काळ्या कुत्र्यास खाऊं द्याल। बरा होशील तात्काळ।।

— अ. १३ वा

४०

खा दूध, बदाम द्याला। अक्रोड पिस्त्यांसह तयांला।
प्यावयाला द्या तरण। तेणें तयाची राहील तहान।
होईल सत्वर व्याधीहरण। सारांश ऐसें हें पाजिता तरण।
उपद्रव निरसन जाहलें।।

— अ. १३ वा

४१

"अल्ला अच्छा करेगा"

— अ. १३ वा

४२

जातों आम्ही लेंडीवर। लेंडीवरुन परतल्यावर।
करा आरंभ बरोबर। या फरशीचे कार्यास।।

— अ. १३ वा

४३

सवाई

जीस गमे पद अन्य गृहीं जरि ठेवियलें जणुं सर्पशिरीं।
वाक्य जिचे अति दुर्लभ ज्यापरि दुर्मिळ तें धन लोभि करीं।।
कांत समागम तेंच गमें सुखपर्व नसे जरि वित्त घरीं।
शांत मनें निजकांत मतें करि कृत्य 'सती' जनिं तीच खरी।।

— अ. १३ वा

४४

आणीक तयां भक्तां म्हणत। फिकीर न करीं जा यत्किंचित।
देईन तुजला रुपये मी मस्त। बैस तूं निश्चिंत मजपाशीं।।
दुनियेमें किसीका कोई है। और किसीका कोई है।
अपना तो यहां कोई नही है। अपना अल्लाही अल्ला है।।
करी जो मज जीव प्राण। ऐसियाचीच मज वाण।
तो देतां मज एक गुण। देतों मी शतगुण तयासी।।

— अ. १४ वा

४५

'मनाची मुराद पुरवील अल्ला'। आशीर्वाद दिधला शेटीस॥

— अ. १४ वा

४६

तीन रुपये चौदा आणे। त्वां मज दिले ते मी जाणें।

— अ. १४ वा

४७

एकदां गणुदासांची कथा। शिरडी ग्रामीं होणें असतां।
अंगरखा उपरणे फेटा माथां। पोषाखा समन्विता निघाले॥
शिष्टाचारानुसारता। आनंदें बाबांस वंदू जातां।
'वाहवा नवरदेव कीं सजलासि आतां।' बाबा वदता देखिले॥
'जातोस कोठें ऐसा सजूनी।' बाबा पुसती तयां लागुनी।
कीर्तन कराया जातों म्हणूनी। दासगणूंनी कथियेलें॥
पुढें बाबा वदती तयांस। अंगरखा उपरणे फेटा कशास।
किमर्थ केलास इतुका प्रयास। न लगती आपुल्यास तीं काहीं॥
काढ कीं तीं मजसमोर। कशास अंगावर यांचा भार।
तंव तीं तयांच्या अनुज्ञेनुसार। तेथेंच चरणावर ठेविलीं॥
तैपासून उघडे सोज्वळ। हाती चिपळी गळां माळ।
कीर्तनसमयी सर्वकाळ। गणुदास हा वेळपर्यंत॥

— अ. १५ वा

४८

पाजीं यास चहाचे प्याले। भले भरले साखरेचें।
कीं पावली वाचादत्त शर्करा। तुझा त्यागाचा नेमही पुरा।
चोळकरा झालासे॥ नवस-वेळचें तुझें चित्त।
दीर्घसूत्रतेचे प्रायश्चित्त। हें जरी तुझे ठेवणें गुप्त।
ते मज समस्त कळलेंगा। तुम्ही कोणी कुठेंही असां।
भावे मजपुढें पसरितां पसा। मी तुमचिया भावा सरिसा।
रात्रंदिसा उभाचा॥ माझा देह जरी इकडे।
तुम्ही सातांसमुद्रापलीकडे। तुम्ही कांहींही करा तिकडे।
जाणीव मज तात्काळ॥ कुठेंही जा दुनियेवर।
मी तों तुम्हांबरोबर। तुम्हां हृदयींच माझे घर।
अंतर्यामीं तुमचे मी॥ ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी।
तयासी नमा नित्य तुम्ही। भूतमात्राच्याही अंतर्यामीं।
तोच तो मी वर्ततों। यास्तव तुम्हांस जो जो भेटे।
घरीं दारीं अथवा वाटे। ते ते ठायीं मीच रहाटें।

मीच तिष्ठें त्यामाजीं। कीड मुंगी जलचर खेचर।
प्राणीमात्र श्वान शूकर। अवघ्या ठायीं मीच निरंतर।
भरलो साचार सर्वत्र॥ मजशी धरुं नका अंतर।
तुम्ही आम्ही निरंतर। ऐसें मज तो जाणील नर।
भाग्य थोर तयाचे॥

— अ. १५ वा

४९

वाचील जो हा अध्याय आदरीं। अथवा नेमानें आवर्तन करी।
तयाचे संकट गुरुराय निवारी। खूण अंतरी दृढ बांधा॥

— अ. १५ वा

५०

बाबा वदती न करी चिंता। ब्रह्म दावीन रोकडे आतां।
येथे न उधारीची वार्ता। तुजसम पुसताचि दुर्लभ॥
मागती बहुत धनसंपदा। निवारा म्हणती रोग आपदा।
मागती लौकिक मान राज्य पदा। सौख्य सदा मागती॥
केवळ ऐहिक सुखालागुनी। जन शिरडीस येती धांवुनी।
लागती मज फकिराचे भजनीं। ब्रह्म कोणीही न मागती॥
तैशियांचा मज सुकाळ। तुज सारिख्यांचाच दुकाळ।
ब्रह्मजिज्ञासूंचा मी भुकाळ। पर्वकाळच हा मजला॥
जया ब्रह्मवस्तु भेणें। रविशशीचें नियत चालणें।
नियमें उगवणे नियमें मावळणें। प्रकाश चांदणे नेमस्त॥
ग्रीष्म - वसंतादि - ऋतुकाळ। इंद्रादि देव लोकपाळ।
नेमें करिती जो प्रजा-प्रतिपाळ। त्या सर्वां मूळ हें ब्रह्म॥
म्हणून शरीर विस्त्रंसना आधीं। सुधी ब्रह्मपुरुषार्थ साधी।
त्यावीण पुनरावर्तन निरवधी। लागेल अबाधीत पाठीसी॥
तें हे ब्रह्म जाणल्यावीण। होईल जरी शरीरपतन।
पीच्छा पुरवील संसारबंधन। पुनर्जनन चुकेना॥
ब्रह्मची काय मी तुज सगळे। दावितों पहा ब्रह्म गुंडाळें।
जे तुज नखशिखांत वेटाळें तें मी आगळें उकलितों॥
बाबा म्हणती बसल्या ठायीं। ब्रह्म दावावें येच उपायीं।
केले येथवर उपाय काहीं। कळले नाहींच का तुम्हा?॥

— अ. १६ वा

५१

तुम्ही बसल्या बसल्या पहातां। खिशांत पन्नास पट रुपये असतां।
काढा पाहूं बाहेर आतां। ब्रह्म तो खिशांत तुमचेच॥

काढा म्हणतां हात घालिती। गृहस्थ पुडके खिशांतून काढिती।
दहादहांच्या पंचविंशती। नोटा मोजिता पुडक्यांत।।
गृहस्थ विरघळले मनींचे मनीं। केव्हढे महाराज अंतर्ज्ञानी।
मस्तक ठेविती तयांचे चरणीं। आशीर्वचनीं उत्कंठा।।
मग बाबा म्हणती ते वेळे। गुंडाळ आपले ब्रह्मगुंडाळें।
लोभाचे जाहल्यावीण वाटोळें। ब्रह्म न मिळे तुजलागीं।।
पुत्रपश्वादि-वित्तार्जन। आसक्त यांतचि जयाचे मन।
तयास कैचें ब्रह्मज्ञान। द्रव्यव्यवधान न सुटतां।।
महाकठिण वित्त मोह। तृष्णावर्त दुःखगाह।
मद मत्सर मकर दुःसह। एक निस्पृह तरेल।।
लोभाशीं ब्रह्माचें अखंड वैर। तेथें ध्याना नाहीं अवसर।
कैचि मुक्ति विरक्ती साचार। आचारभ्रष्ट लोभिष्ट।।
लोभा ठायीं नसे शांति। ना समाधान ना निश्चिंती।
एक लोभ वसतां चित्तीं। जाती मातींत साधनें।।
श्रुतिस्मृतीस अविहित। ऐसें निषिद्ध जे दुश्चरित।
त्यांतचि सदैव जो आसक्त। असमाहित चित्त तो।।
तया नांव विक्षिप्तचित्तं। सदैव दुष्कर्मी व्यावृत्तं।
अखंड विषयकर्दमीं लोळत। हिताहीत देखेना ।।
हो कां ब्रह्मविज्ञान संपन्न। नाहीं जो फळेच्छेसी निर्विण्ण।
तोंवरी वाव तें ब्रह्मविज्ञान। आत्मसंपन्न नाहीं तो ।।
कोण काही मागूं येतां। अधिकार पाहती संत प्रथमता ।।
जैसी जयाची योग्यायोग्यता। तैसेंच त्यातें देती ते ।।
जया मनी रात्रंदिन। देहाभिमान विषयचिंतन।
तया गुरुपदेशाच्या शीण। व्यर्थ नागवण उभायार्थां ।।
चित्तशुद्धि जाहल्यावीण। परमार्थी रिघुं पाहे जो आपण।
ज्ञानवर्गाची ती मिरवण। केवळ शीण तो खरा ।।
यास्तव रुचेल तेचं बोलावे। पचेल तितुकेंच अन्न खावे।
नातरी व्यर्थ अजीर्ण व्हावें। हें तों ठावे सकळिकां ।।
माझा भांडार भरपूर आहे। देईन जो जो जें जें चाहे।
परी ग्राहकाची शक्ति पाहें। देतों मी साहे तेचं की ।।
ऐकाल जरी हे लक्ष देऊन। पावाल तुम्ही कृतकल्याण।
या पवित्र मशिदींत बैसून। असत्य भाषण न करीं मीं ।।

— अ. १७ वा

५२

पिकीर न करावी यत्किंचित। सदा असावें आनंदभरित।
चिंता न करावी आमरणांत। उपदेश नित्य बाबांचा ।।

— अ. १७ वा

# प्रार्थना

प्रार्थना हा शब्द आम्हास वेदकालापासून माहीत आहे. वेदात इंद्र, अग्नी, वरुण, मरुत, सोम, आदित्य, रुद्र इत्यादि. वैदिक देवतांच्या प्रार्थना आहेत. वेदांत ऐहिक उन्नती संबंधी प्रार्थना आहेत, तशाच आध्यात्मिक उन्नती संबंधीही आहेत. ऐहिक आणि आध्यात्मिक उभय प्रकाराचा विकास साधणे, हा वैदिक संस्कृतीचा विशेष होता.

प्रार्थनेबद्दल गांधीजींनी म्हटले आहे–

**A heartful prayer is not recitation with the lips. It is yearning from within, which express it self in every act may every thought of man** अर्थात् "अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना म्हणजे हृदयातील तळमळ, जी प्रत्येक शब्दातून, प्रत्येक कृतीतून एवढेच नव्हे, तर माणसाच्या प्रत्येक विचारातून व्यक्त होते." स्वामी चिन्मयानंद म्हणतात, प्रार्थना मानवाच्या जीवनातील पूर्व पापे धुवून काढते, असे सर्व धर्माचे विख्यात प्रतिपादन आहे. प्रार्थना म्हणजे भीक मागणे नव्हे, ती म्हणजे भक्ताला अनाकलनीय अशा भाषेत असलेले अज्ञात अशा 'ईश्वर' म्हटल्या गेलेल्या व्यक्तिभावाचे यांत्रिकपणे पुनः पुन्हा उच्चारले जाणारे अतिरंजित स्तवनही नव्हे! प्रार्थना म्हणजे 'आवाहन' होय. उच्चतर ध्येयाशी एकरूप होणे आणि त्यायोगे मनाला त्याच्या सध्याच्या अपूर्णतेच्या अवस्थेतून काढून महान शांतीच्या आणि शुचितेच्या अवस्थेप्रत नेणे म्हणजे 'प्रार्थना' होय!

सुप्रसिद्ध लेखक गॉल्सवर्दी यांनी प्रार्थना केली आहे–

**Oh Lord make firm in me a heart too brave to ask thee anything.** अर्थात हे प्रभो, मला असे काही शूर अंतःकरण (आध्यात्मिक बल) दे की, ज्यामुळे तुझ्याकडे काही मागण्याची जरूरी पडू नये. बर्नार्ड शॉ ने म्हटले आहे– **"Common people do not pray they only beg"** "अर्थात सामान्य लोक प्रार्थना अशी करीत नाहीत, तर ते निव्वळ भीक मागत असतात" शॉचे शब्द कडक आहेत पण त्यात तथ्य आहे. इतिहास प्रसिद्ध फ्रेंच लेखक रुसो याने म्हटले आहे–

**The most perfect prayer is the entire resignation to the decisions of God Not What I will but what thou will. They will be done.**

अर्थात "ईश्वरी इच्छेपुढे संपूर्ण शरणांगती म्हणजेच उत्कृष्ट प्रार्थना होय! प्रभो, माझी इच्छा नव्हे तर तुझीच इच्छाच प्रमाण. तुझ्याच इच्छेचा अंमल होवो. ही प्रार्थना एकदा आपण स्वीकारली, तर आपल्यासाठी जगाच्या पाठीवर दुसरी कोणतीच प्रार्थना

शिल्लक राहत नाही. आपली निराळी अशी इच्छाच राहत नाही, तर मग कोणत्या इच्छेच्या पूर्ततेसाठी आम्ही प्रार्थना करावयाची?

"नवा करार" छाती ठोकपणे सांगतो,

**What thing so ever ye desire, when ye pray believe that ye receive them and shall receive them** अर्थात तू प्रार्थना करतोस, तेंव्हा ज्या ज्या गोष्टीची तू इच्छा करतोस, त्या त्या गोष्टी तुला मिळणारच आहेत, अशी तुझी श्रध्दा असेल, तर त्या त्या गोष्टी तुला मिळतीलच.

शेक्सपीअरने म्हटले आहे– **"My word fly up, my thoughts remain below words without thoughts never to heaven go"** माझे शब्द वर झेप घेतात, तर माझे विचार खालीच राहतात. विचाराविना (अर्थाविना) केवळ शब्द ईश्वराप्रत कधीच जात नाहीत. हाच विचार एकनाथांनी असा मांडला आहे– "नाम रुपा नाही मेळ। अवघा वाचेचा गोंधळ" अर्थ लक्षात न घेता केलेले पारायण म्हणजे निव्वळ "शाब्दिक कवायत" होय, असा अभिप्राय विनोबांनी करुन ठेवला आहे.

संकलन –**श्री. विलास श्रीधर कुलकर्णी**
१६ए/४, मीठानगर म्युन्सिपल कॉलनी,
महात्मा गांधी रोड, गोरेगाव (पश्चिम),
मुंबई – ४०० ०९०.

# अंतःस्फूर्ति आणि दिव्य दृष्टी

**– श्री. दि. रे. बाबरेकर**
बी.ए., एल.एल. बी. (हिन्दी साहित्य रत्न)
बी – ३३४/३, सरकारी कर्मचारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.

सध्याच्या काळात विज्ञान व तांत्रिक शिक्षणात बरीच प्रगती झाली आहे व त्यामुळे संशोधन व प्रयोगाद्वारे सुधारणा व नवनिर्मितीची अनेक विलक्षण कार्ये घडत आहेत. ही एक प्रशंसनीय बाब आहे. अशाच वेळी समाजात व देशात धार्मिक व आध्यात्मिक भावना व त्यासंबंधीच्या आचरणास दुर्लक्षित केले जात असल्याचे आढळून येते. मानव स्वतःलाच श्रेष्ठ समजू लागला आहे. स्वार्थ वृत्ती, मनाची अशुद्धता व

चारित्र्याच्या अधोगतीमुळे आत्मशांती व दैवीकृपा त्यास प्राप्त होणे दुर्लभ झाले आहे. गूढज्ञान, आत्मशांती व ईश्वर ज्ञान प्राप्त होण्यास चारित्र्याची शुद्धता हवी. तसेच मनाची शुद्धता व एकाग्रता हवी.

ज्याप्रमाणे चेहरा, माणसाच्या चारित्र्याचा तसेच मनाचा आरसा असून भाव भावनाचे प्रतिबिंब दर्शवितो, त्याचप्रमाणे अंत:करण, अंत:प्रेरणा, अंत:स्फूर्ति व दैवी चमत्कार दर्शविते. ज्याप्रमाणे कवी ठराविक वेळी ठराविक काव्य करण्यास असमर्थ असतो, त्याचप्रमाणे सिद्ध पुरुष इच्छिलेला चमत्कार करण्यास असमर्थ असतात. दैवी चमत्कार, अंत:स्फूर्ति व अंत:प्रेरणेतून जन्म घेतात. अंत:करणात अंत:स्फूर्ति व अंत:प्रेरणांची फुले फुलल्याशिवाय अतिंद्रिय शक्तीचा सुगंध पसरत नाही. ज्याप्रमाणे अंत:स्फूर्ति होणे, त्या व्यक्तीचे हाती नसते, त्याचप्रमाणे ती प्रगट करणेही त्या व्यक्तीच्या हाती नसते. अनेक वेळा तर असे आढळून येते की, ज्या व्यक्तीत ती शक्ती आहे, त्या व्यक्तीला देखील त्याबद्दल कल्पना नसते. अशी शक्ती प्राप्त हाण्यास एकाग्रतेची फार आवश्यकता असते.

जन्मकुंडलीत नेपच्यून उच्च अवस्थेत असेल किंवा तो जन्म लग्नी अथवा बाराव्या स्थानी असेल,,किंवा कर्क राशीत असेल अथवा चंद्र, हर्षल, शनी यांच्या शुभयोगात असेल तर अंत:स्फूर्ति, अंत:प्रेरणा व मनाच्या तरल अवस्थेची देणगी प्राप्त झालेली असते. अशांची मने गूढ गोष्टींची उकल करण्यात व नाविन्य निर्मितीत दंग असतात. "नाविन्य हा निसर्गाचा स्थायी भाव आहे " 'दिव्य' हा शब्द 'देवाचा' असे सुचवितो. नेहमीच्या साध्या डोळ्यांनी जे दिसू शकत नाही,ते बघण्याच्या शक्तीला दिव्य दृष्टी असे म्हणतात. दिव्य दृष्टी प्राप्त करण्यासाठी कुठलीच साधना नाही. ती ईश्वरीय देणगीच असते. ही देणगी फक्त चांगल्या कामाकरिताच उपयोगी आणणे आवश्यक असते, कारण त्यामुळे पुढील सिद्धी प्राप्त होत राहतात. जर ह्या शक्तींचा उपयोग स्वार्थाकरिता केला गेला तर ही शक्ती नष्ट होते.

दिव्य दृष्टी दोन प्रकारची असते. १) भिंतीपलीकडची किंवा परगावची दृश्ये दिसणे. २) भूतकाळातील किंवा भविष्यकाळातील दृश्ये दिसणे.

दिव्य दृष्टी तीन प्रकारांपैकी कोणत्याही एक प्रकाराने असू शकते.

१) स्वत:लाच ही दृष्टी प्राप्त होऊन दूरदूरची दृश्ये दिसणे.

२) आपल्या इष्ट देवतांनी स्वप्न व संकेत द्वारा दृश्ये दाखविणे.

३) आपण स्वत: मानसिक दृष्टीने दूरच्या स्थळापर्यंत जावून, दृश्य बघणे.

गुरु ब्रह्म नव्हेत दोन । झाले जया हे अभेद ज्ञान ।

# माऊली काशीबाई चव्हाण यांचा जीवन परिचय

– श्री. गिरीश जोशी
घाटकोपर.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

– भगवद्‌गीता अ. ४, श्लोक ७,८

जेव्हा जेव्हा पृथ्वीवर अधर्म बोकाळतो, तेव्हा तेव्हा सत् धर्माचे उत्थापन करण्यास, सज्जनांचे रक्षण करुन, दुर्जनांचा नाश करण्यास, धर्माची पुनर्स्थापना करण्यास युगायुगातून भगवंत स्वतः अवतार घेतात, असे साक्षात् श्रीकृष्णानीच सांगितले आहे. "संत माझ्या सचेतन मूर्ति।" ह्या भूमिकेतून ह्या वचनाची यथार्थता आजही आपल्याला जाणवते. फुलाला ज्याप्रमाणे आपला सुवास दशदिशांना पसरव, असे वाऱ्याला सांगावे लागत नाही, त्याचप्रमाणे संतांची कीर्ती असते. वस्तुतः ते प्रसिद्धी विन्मुखच असतात. मानापमान, कीर्ती, यश, संपत्तीची लालसा ह्या कोणत्याही वृत्ती त्यांच्यापाशी नसतात. त्यांच्या अंगभूत गुणांनी व तैजांनी ते आपोआपच जनसामान्यांना आपले वाटतात. सर्वसामान्यांबद्दल असलेल्या अफाट जिव्हाळ्याने व कारुण्याने आपल्या अलौकीक सामर्थ्याद्वारे ते त्यांची दुःखे दूर करण्यास धडपडतात. जनसामान्यांना हळूहळू जीवनातील श्रेयाची आणि प्रेमाची ओळख करुन देतात. आपल्या असीम त्यागाने, शान्तवृत्तीने, मैत्रभावाने सर्वांना सुपरिचित होतात. अशा ह्या पुरुषोत्तमांशी परिचय घडून त्यांच्या जवळचे होण्याचे भाग्य हे सरसकट सर्वांना मिळते, असे नाही. अनेकवेळेला आपल्या पूर्वसंचितामुळे आपण त्यांच्या दर्शनासही पारखे होतो.

ह्या मुंबानगरीतच आजही आपल्याला अशी कित्येक स्थाने आढळून येतात की, ज्या ठिकाणी ह्या पवित्र महात्म्यांनी प्रकट होऊन लोकोद्धाराचे महान कार्य केले व अजूनही करत आहेत. त्यापैकीच एक ठिकाण म्हणजे,दादर चौपाटी जवळ असलेले श्री. जांभेकर महाराज समाधिमंदिर. दादर स्मशानभूमीच्या बाजूलाच असलेल्या चांदणेवाडीत आपल्याला ह्या मंदिराचा एक आगळावेगळा अनुभव येतो.

श्री. रामकृष्ण महाराज जांभेकर व त्यांचे दोन शिष्योत्तम श्री. नामदेव महाराज केळकर आणि माऊली काशीबाई चव्हाण ह्या त्रयींच्या कृपाशीर्वादाने हे स्थान पुनीत झालेले आहे. आवळ्याची मोट ज्याप्रमाणे बांधता येत नाही, त्याप्रमाणेच संतचरित्र मापणे, जाणणे हे अवघड असते. तरीही त्याचे अवलोकन करता करता नकळतपणे

कदाचित आपल्यासारख्या सर्वसामान्यांना जीवनाचे एक वेगळेच रूप जाणवते, म्हणू हा प्रयत्न.

माऊली काशीबाई चव्हाण ह्या परमपूज्य श्री. जांभेकर महाराज ह्यांच्या शिष्य होत. माऊलींचे भाग्य खरोखरच आगळेवेगळे की, त्यांना आपल्या हयातीत आप गुरुवर्य आणि गुरुंच्या गादीवर परंपरेने आलेल्या गुरुबंधू नामदेवमहाराज ह्यांच्य सेवेचा लाभ घडला. आपल्या गुरुंच्या भक्तांना सांभाळणे, हेही माऊलीचे कार्य होते

माऊलीचा जन्म राजापूर तालुक्यातील भूतेरवण ह्या गावी इ. स. १९०१ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव धोंडू राघो अपंडकर आणि आईचे उमाबाई. माऊलींन एकूण चार भावंडे होती, हरिभाऊ, नर्मदा, भागू आणि धाले. लहानपणी काशीबा अयोग्य असे कुणाचेही ऐकून घेत नसत. त्यांना वावगे खपत नसे. आपल्या वाट्याल आलेले काम प्रयत्नपूर्वक व नीटनेटके करणे, हा त्यांचा स्थायीभाव होता. बालपण त्यांचा स्वभाव मानी व हट्टी होता. चुकून जरी कोणाकडूनही त्यांच्याविषयी वागतान जरा जरी चूक झाली, तरी त्या तासन्‌तास रडत बसत असत. त्यामुळे त्यांच्या कला इतर घेत. "काशी, तू आपली राजो। तुका बाये कोंण बोलूंचा?" अशी त्यांच्याबद्दल इतरांची भूमिका असे. पण माऊलींचा स्वभाव जरी ह्या प्रकारचा होता, तरी कामाल त्या वाघ होत्या. घरच्या गरीबीमुळे लहानपणापासूनच त्यांना कष्टांची सवय होती बालवयात रानात जाऊन लाकडे गोळा करणे, मोळ्या बांधणे इ. घरकामे त्या करत असत. त्यांच्या वाट्याला शालेय शिक्षण फारसे आले नाही.

मुंबईमध्ये राहणाऱ्या वडील भावाने त्यांचा विवाह केला. त्यांचे पती केशकर्तनालयात नोकरी करीत असत. माऊलीचे सासरचे नाव सौ. चंद्रभागा होते पण माऊली ह्या प्रामुख्याने काशीबाई ह्या नावानेच ओळखल्या जातात. त्यांची सासू मोठी खाष्ट होती. त्यांना सासूरवास भरपूर होता पण माऊलींनी त्याबद्दल कधीही तक्रार केली नाही वा कडवटपणा व्यक्त केला नाही. श्री. चव्हाण ह्यांची तब्येत अगदी नाजूक होती. ह्या सर्व सांसारिक आपदा सहन करण्याचे बळ मिळण्यास आपल्या भावामुळे परिचित झालेल्या गुरुवर्य श्री. जांभेकर महाराजांकडे त्या जाऊ येऊ लागल्या. पती आरोग्यासाठी महाराजांनी त्यांना २१ कडकडीत गुरुवार करायला सांगितले होते, पण एका गुरूवारी सांगितलेला नेम चुकला. अर्थात आयुष्यात जे घडावयाचे होते, त्यामुळेही कदाचित हे झाले की काय कोण जाणे ! इ. स. १९३७ साली त्यांच्या यजमानानांनी इहलोकाचा निरोप घेतला. तेव्हा 'मठ हेच तुझे घर' म्हणून महाराजांनी त्यांना मठातच रहावयास बोलावले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांचा एकुलता एक मुलगा आठ वर्षांचा होऊन मृत्युमुखी पडला. माऊलींची सर्व संसारबंधनं संपली. त्या सर्वार्थाने पाशविरहित झाल्या. पण केवळ लौकीक संसार हेच त्यांचे आयुष्य नव्हते. त्यांचा संसार 'वसुधैव कुटुम्बकम्' होता. हळूहळू हे त्यांचे पाश वाढत गेले. आता माऊली मठातच रहायला आल्या होत्या. महाराजांची बैठकीची व विश्रांतीची जागा झाडून सारवणे, महाराजांच्या नित्यपयोगी वस्तूंची निगा राखणे,

मठात झाडलोट करणे, भांडी घासणे अशी अनेक कामे माऊली निरपेक्षपणे अंग मोडून करत होत्या. गुरुमाऊली हेच आपले सर्वस्व समजून कुचराई न करता त्यांची सेवा करीत होत्या. गुरुमाऊली व गुरुबंधूच्या सेवेची एकही संधी त्या सोडत नव्हत्या. १९४० मध्ये श्री. जांभेकर महाराज व १९५८ मध्ये श्री. नामदेव महाराज ह्यांनी आपली जीवनयात्रा लौकीकदृष्ट्या संपविली. १९५८ ते १९७६ हा अठरा वर्षांचा काळ माऊलींनी अविरत जागृत राहून आपल्या गुरुदेवाची व गुरुबंधूची परंपरा पुढे चालविली.

आपल्या गुरुची व गुरुबंधूची एकनिष्ठ व निष्काम सेवा, हेच माऊलींच्या जीवनाचे ब्रीद होते व ते त्यांनी शेवटपर्यंत पाळले. महाराजांच्या दरबारात माऊलींचे स्थान हे अतिशय वरच्या दर्जाचे असूनही श्री. जांभेकर महाराज वा श्री. केळकर महाराज असेपर्यंत त्यांनी आपण होऊन कोणालाही,कोणत्याही प्रकारे उपदेश केला नाही वा मार्गदर्शन करण्याची इच्छाही धरली नाही. महाराजांची निष्काम आणि जास्तीत जास्त सेवा, हेच त्यांनी आपले जीवन सर्वस्व मानले होते. आपण केलेल्या सेवेचा त्यांनी कधी डांगोराही पिटला नाही वा कौतुकही केले नाही. आपले गुरु व गुरुबंधू ह्यांच्याप्रमाणे त्यांनीही आपल्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याचे कधीही प्रदर्शन केले नाही वा अभिमानही बाळगला नाही. पण परदु:खनिवारण हे ब्रीद मात्र चालूच ठेवले. कोणालाही आपल्याकडून जास्त त्रास होऊ द्यावयाचा नाही व दुसऱ्यांचे उपकारही आपल्या शिरावर घ्यावयाचे नाहीत, ही त्यांची वृत्ती होती.

**देवद्वारी मान व्हावा । देवापुढेचि पदर पसरावा । तयाचाच प्रसाद जोडावा**
**मान सोडावा लौकिकी ।**
**काय लोकी मान डोलविली । तितुक्याने का भरसी भुली । आराध्य मूर्ती चित्ती द्रवली ।**
**धर्मे डवडवली पाहिजे ।**
**हेचि ध्येय लागो गोड । सर्वेंद्रियी भक्तीचे वेड । इंद्रियविकारी भक्तीचे मोड ।**
**फुटोत कोड मग काय ॥**
**सदैव ऐसे भजन घडो । इतर काहीही नावडो । मन मन्नामस्मरणी जडो ।**
**विसर पडो अवघ्याचा ॥**
**नाही मग देह गेह वित्त । परमानंदी जडेल चित्त । मन समदर्शी आणि प्रशांत ।**
**परिपूर्ण निश्चित होईल ॥** **— श्री साईसतचरित अ. ६, ओवी ३६-३९.**

ह्याच जीवननिष्ठेने त्यांनी आपले आयुष्य घडविले. आपल्या श्रद्धास्थानाचे वैभव वाढीस लागावे म्हणून त्यांनी १९७५ साली समाधी जीर्णोद्धार कार्य नेटाने व धैर्याने अधिक वेगाने पुढे चालवून पूर्ण केले. समाधिस्थान ह्या जागी असू नये,म्हणून काही विघ्नसंतोषी मंडळींनी माऊलींना व केळकर महाराजांना त्या ठिकाणी पूजेला येऊ द्यावयाचे नाही, त्यांना त्याठिकाणी येण्याची बंदी करणे, पूजा चाललेली असताना ती उधळून लावणे, येण्याजाण्याच्या मार्गाला कुलूप लावून अडवणूक करणे, एवढेच काय पण जांभेकर महाराजांची समाधी उद्ध्वस्त करुन त्या पवित्र शरीराचे तुकडे करुन

इतस्त: फेकून देणे, असे नाना तऱ्हेचे छळवाद सुरु केले पण माऊली डगमगल्या नाहीत. दृढश्रद्धेने त्यांनी आपले सेवाव्रत चालूच ठेवले. काही वेळा प्रेतयात्रेत सामील होऊन, तर रक्षकाचा डोळा चुकवून, गुपचूप त्या स्थानात प्रवेश करुन, रक्षकाचे केव्हा थोडे दुर्लक्ष होईल ह्याची वाट पहात तासन्तास ताटकळत रहात. त्यानी पूजेचा आपला दिनक्रम कधीच चुकवला नाही. प्रसंगी त्यांच्यावर त्यासाठी कोर्टकज्जे लढण्याचीही वेळी आली, पण त्या डगमगल्या नाहीत. 'उपासनेला दृढ चालवावे' ह्या निर्धारानेच त्या वागल्या.

**"गुरु ब्रह्म नव्हेत दोन । झाले जया हे अभेद ज्ञान । हीच भक्ती घडता जाण मायातरण सुगम जे ॥**

**श्री साईसच्चरित अध्याय ८, पृ. ९५**

ही तत्त्वप्रणाली जोपासत माऊलींनी आपल्या साधनेची वाटचाल आरंभिली. 'श्रद्धा व सबूरीचाच महामंत्र त्यानी जपला.

'झाले बाई वेडी, झाले बाई वेडी
गुरुचा दरबार झाडी'

हे पद त्या सातत्याने गुणगुणत असंत. गुरुस्थानाचे पावित्र्य अभंग रहावे, ह्याच भावनेने त्या कायम वागत असत. ज्या तत्परतेने माऊली समाधीमंदिर व त्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची पराकाष्ठा करीत. तेवढ्याच तत्परतेने त्यांनी लोकांचेही मनोमालिन्य धुवून काढण्याचा चंग बांधला होता. अडीअडचणीत सापडलेल्या भक्तांना मार्गदर्शन करुन, त्यांना अडचणीतून बाहेर काढून सन्मार्गाला लावण्याचे कार्य त्यांनी स्वीकारले.

श्री. मोरेश्वर माहीमकर हे महाराजांचे एक भक्त. एके दिवशी अचानक त्यांच्या पोटातून असह्य कळा येऊ लागल्या. मठात माऊली एकाएकी जागृत होऊन ओरडू लागल्या. 'मोरेश्वर माहीमकर खलास झाले' हे स्वप्न त्यांना पडले होते. थोडे उजाडल्यावर ताबडतोब माऊली त्यांच्याकडे गेल्या. माहीमकराना टॅक्सीत घालून परळच्या डॉ. वामनराव नाईक ह्यांच्याकडे त्या गेल्या. डॉक्टरांनी "हा रोगी वाचण्याची शक्यता नाही, त्यांना हॉस्पिटलमध्ये हलवा", असे सांगितले. पण माऊली म्हणाल्या, "मी या रोग्यास तुमच्याकडे घेऊन आले. तुम्हीच औषध द्या. रोगी जगला तर डॉक्टरांचा. मेला तर माझा." माऊलींच्या आग्रहाखातर डॉक्टरांनी औषध दिले. त्यांना ते तीर्थाबरोबर देऊन माऊलींनी त्यांना घरी पोचवले. घरी गेल्यावर माहीमकरांना संपूर्ण आराम वाटू लागला.

बाळू शिंदे ह्या भक्ताला खार ते सांताक्रूझ ह्या स्टेशनांमध्ये सकाळी ९ ते १० वाजताच्या दरम्यान रेल्वेगाडीतून खाली पडून अपघात झाला. त्याला रुग्णालयात हलविण्यात आले. त्याच्या डोक्याला जबरदस्त मार बसला होता व शरीरातून रक्तस्त्राव होत होता. माऊलींना ही खबर मिळताच त्या लगोलग तेथे गेल्या. वैद्यकीय उपचार व माऊलींचे उपचार ह्यांनी तो अल्पावधित खडखडीत बरा झाला.

श्री. अरुण नारायण मंगलोरकर एकदा दादर स्टेशनावरून समाधीमंदिराकडे चालले असता वाटेत त्यांना दुधीहलवा खाण्याची तीव्र इच्छा झाली. ते पणशीकरांच्या दुकानात गेले. दुधीहलव्याचे दर दुप्पट झाल्याने त्यावेळी तरी दुधी हलव्याची तहान पियुषावर भागवावी लागली. पुढे ते मंदिरात आले. माऊलींशी भेट झाली. माऊलींनी त्यांना दोन्ही हात उघडे ठेवायला सांगितले व त्यांवर भरपूर दुधीहलवा ठेवला.

मंदिरात सभामंडप बांधण्यापूर्वी सर्व जागा मोकळीच होती. पण आषाढातील गुरुपौर्णिमेच्या उत्सवात महाप्रसाद म्हणून ज्या भोजनाच्या पंक्ती बसत, त्यात पावसाने कधीही अडथळा आणला नाही, वा प्रवचन, आरती ह्या कार्यक्रमात कधीही खंड पडला नाही. एकदा गुरुपौर्णिमेची आरती, प्रसाद झाल्यावर माऊली सर्वांना घरी जाण्याची घाई करु लागल्या. आकाश स्वच्छ व निरभ्र होते. कोणाला काही कळेना. पण माऊली म्हणतात म्हणून जो तो घरी गेला, पण सीताबाई रामभाऊ नागडे ह्या बाई थांबल्या. थोड्याच वेळात भयानक पावसाला सुरूवात झाली. रात्री ११-११॥ पर्यंत पाऊस भरपूर कोसळला. मंदिरात व आजूबाजूला पाणी तुंबले. सीताबाईंना सकाळपर्यंत अडकून बसावे लागले. पावसाळ्यात रोजची पूजा, आरती करतेवेळी सभामंडप होईपर्यंत कधीही पावसाचा त्रास होऊन पूजेत विघ्न उद्‌भवले नाही. 'काही काळजी करु नका' असे तेव्हा माऊली वारंवार म्हणत.

परमेश्वराविषयी माऊली म्हणत की, तो मोठा वाईट, लबाड आहे. भक्तांना आपल्या स्वरुपाची जाणीव होऊ नये, म्हणून तो बऱ्याच वेळेला त्यांच्या मार्गात मोहाचे गालीचे पसरतो. पैसा, कीर्ती, सिद्धी ह्या गोष्टी त्यांपैकीच. म्हणून त्या सातत्याने म्हणत की 'हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा.' क्लेश, संकट जी काय असतील, ती हे परमेश्वरा सातत्याने व तत्काळ दे. त्यासाठी पुनर्जन्म नको. दुःख सोसण्याचे बळ परमेश्वराच्या नामस्मरणानेच येते, त्यासाठी प्रभूचरण नित्य आठवावे. कर्माकर्माच्या वादात न शिरता, कर्मकांडाच्या आधीन न होता, निष्काम सेवाभावी भक्तीने मुक्ती मिळवावी, ही त्यांची धारणा होती. \ २८

**आधी बीज एकले । बीज अंकुरले । 'रुप' वाढले ।**

असे त्या म्हणत. ईश्वर नामाचे बीज हृदयात अंकुरल्यावर, वाढीस लागल्यावर बदलणाऱ्या मानवी मनाबद्दल त्या सांगतात की, आपोआपच एक तेजस्विता तेथे वस्तीस येते, दिव्यत्वाचे रुप सौम्यरुपातून प्रकट होते आणि मग

**'नकळे दिवस राती । अखंड लागलीसे ज्योती ।'**

हा अनुभव घेत, सर्वसामान्य रुढ जीवनाची बद्धता विलयाला जाते. विश्वात्मक अनुभूतीचा प्रत्यय येतो. मी तू पणाची बोळवण होते. निखळ अद्वैत साधते व जीवनाला परिपूर्णत्व येते, असे त्यांना वाटे.

आयुष्याच्या अखेरीस सर्व जनसंपर्क टाळून एकांतात जाऊन रहावे, असे त्यांना वाटे, पण दुर्दैवाने ती त्यांची इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. अखेरच्या काळात माऊलींचे जेवण्याखाण्याकडे लक्ष नसे. केवळ चहा किंवा मोसंबीचा रस ह्यावर त्या

८-१५ दिवस रहात असत. माऊलींची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत होती. भक्तमंडळींना नाना अशुभसूचक दृष्टान्त होत होते. डॉ. वसंतराव परांजपे ह्यांचे वैद्यकीय उपचार शर्थीने चालले होते. त्यांना आराम पडावा म्हणून गुरुलीलामृत ग्रंथाचे पारायणही काही भक्तमंडळींनी सुरु केले. पण शनिवार दिनांक २५ सप्टेंबर १९७६, आश्विन शुद्ध द्वितीया, सकाळी पाचच्या सुमारास लौकीकदृष्ट्या माऊली गुरुचरणी विलीन झाल्या. परंतु 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव' ही खूण समाधिस्थानी आजही अनुभवास येते, हे निश्चित. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

**'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचीत अनुभवे ।'**

## साई – नाम

आम्ही घेऊ साई नाम ।
तेच आमुचे प्रिय काम ॥
सर्व साधुसंतांचा हा मार्ग
तोच बहुजनांचा धर्म
येता जाता नाम घेऊ ।
साई चरणी लीन होऊ
दिन – दुबळ्यांचा हा मंत्र ।
कल्याणाचे होवो तंत्र ॥

**– श्री. विलास श्रीधर कुलकर्णी**
१६ए/४, मीठानगर म्यु. कॉलनी,
महात्मा गांधी रोड
गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०९०.

# अलौकिक निष्काम भक्ती

– सौ. उषा अधिकारी
बंदर रोड, रत्नागिरी.

श्रीबाबा आपल्या भक्तांवर खूप प्रेम करीत असत. त्यातल्या त्यात शुद्ध अंत:करणाच्या, सदाचरणी निस्पृह व आहे त्यात समाधान मानून राहाणाऱ्या, कोणाचाही हेवादावा न करणाऱ्या प्रेमळ स्वभावाच्या माणसांवर त्यांचे विशेष प्रेम असे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री. वासुदेव नारायण जोशी हे गृहस्थ. ते पूर्ण विरक्त होते. केवळ देह प्राक्तन भोगण्यासाठी त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. सदतीस वर्षे वयाला झाली. मूळातच परमार्थाची विलक्षण आवड असल्याने त्यामार्गाने जाण्यासाठी अनेक साधुसंतांच्या भेटीची त्यांना ओढ लागे. परमेश्वरी कृपेने त्यांचा अनेक साधुसंतांशी संबंध आला पण त्यातल्या त्यात विशेष पगडा पडून ज्यांच्या ठायी चित्त स्थिर व्हावे असे बध्द, मुमुक्षू साधक व सिद्ध अशा ४ प्रकारात सिद्धावस्थेत पोचलेले श्रीसाईबाबा हे त्यांना परम दैवत वाटले. श्रीबाबांच्या भेटीचा योग ही श्रीसाईबाबांचीच लीला व कृपा आहे, असे ते मानीत. घोडनदी येथील पेन्शनर मामलेदार श्री. चिदंबर केशव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांनी गाणगापूर येथे अन्नछत्र घातल्याने सोलापूर पेठेशी त्यांचा नेहमी संबंध येई. तेथील सत्यनारायण कंपनीशी श्री. गाडगीळांचा संबंध असल्याने त्या कंपनीचे मॅनेजर वासुदेव सदाशिव जोशी यांची त्यांच्याशी गाठ पडून त्यांच्यात आपुलकी निर्माण झाली. अण्णासाहेब गाडगीळ स्वत: मुमुक्षू अवस्थेत असल्याने पूर्ण विरक्त, सदाचरणी, कामसू व अत्यंत निष्ठावान अशा वासुदेवराव जोशांबद्दल त्यांना विलक्षण प्रेम वाटू लागले. दोघांनाही एकमेकांच्या सहवासाचा आनंद वाटू लागला. एका प्रसंगी अण्णासाहेब गाडगीळ शिरडीत असताना त्यांनी वासुदेवरावांना एक पत्र पाठविले की, ''मी सध्या शिरडीत मुक्काम करुन आहे. येथे नामसप्ताह सुरु आहे. त्यात मी अगदी रंगून गेलो आहे. नामसप्ताह समारंभात आपणही सामील व्हावे व आनंद उपभोगावा, असे मला मनापासून वाटते. तरी श्रीबाबांचे मंगलमय दर्शन घेऊन नामसप्ताहात भाग घ्यावा. इकडे येण्यासाठी १०० रुपये खर्च येईल. श्रीसत्यनारायण आपल्याला कोठेही, कसेही देईल तरी विचार करीत न बसता त्वरीत निघून यावे. ही सुवर्णसंधी दवडू नये. मी आपली वाट पहात आहे.'' हे पत्र वाचून वासुदेवरावांना फार आनंद झाला. पैशांची अडचण होती, तरीही ते शिरडीला गेले व अण्णासाहेब गाडगीळांचे स्नेही रावबहाद्दूर तात्यासाहेब साठे यांच्या वाड्यात गाडगीळ होते, तेथे दाखल झाले. नंतर त्यांनी स्नानसंध्या व इतर नित्यनैमित्तिक कार्ये आटपून श्री. गाडगीळांची भेट घेतली व पूजासाहित्यासह ते व अण्णासाहेब श्रीबाबांच्या दर्शनाला गेले. श्रीबाबा त्यावेळी द्वारकामाईत होते. तेथील एकंदर वातावरण पाहून व श्रीबाबांची उंचीपुरी, मनोहारी, गंभीर, प्रेममूर्ती पाहून आपल्या देहाचे आज खरोखरीच सार्थक झाले, असे त्यांना वाटले. द्वारकामाईतील तो दिव्य भाव व श्रीबाबांचे ते तेजस्वी रुपडे ते डोळे भरुन पहात राहिले.

त्याचदिवशी संध्याकाळी श्रीबाबांच्या फोटोची आरती भक्तमंडळीने मोठ्या भक्तीभावाने केली. त्यात वासुदेवरावही आनंदाने सामील झाले होते. आरती सुरु झाल्यापासून संपेपर्यंत श्रीबाबांचे मुखावर त्यांची दृष्टी एकाग्र झाली आणि श्रीबाबा त्यांना नरसिंह रुपात दिसू लागले. ते देहभान विसरले. इतके की, आरती केव्हा संपली, हे त्यांना कळलेच नाही. श्री. गाडगीळ त्यांना म्हणाले, "अहो जोशीबुवा, आरती संपली म्हटलं. चला पाहू वाड्यात." हे शब्द ऐकून जोशीबुवा भानावर आले. एकाग्र दृष्टी झालेली असताना दिसलेली छाया (नरसिंहरुप) अदृश्य होईना व पुन्हा पुन्हा हे काय आहे, ते समजेना. ते कळावे अशी तर तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. याप्रमाणे सतत तीन दिवस सकाळ व संध्याकाळ तोच तोच अनुभव आल्यावर ते गाडगीळांना म्हणाले, "अण्णासाहेब, हा काय प्रकार आहे? गेले तीन दिवस मला श्रीबाबांचे ठिकाणी नरसिंहरुप दिसत आहे. मी अगदी भांबावून गेलो आहे. हा काय प्रकार आहे?" श्री. गाडगीळ म्हणाले, "मी तरी काय सांगू? या श्रीबाबांच्या लीला आहेत, आपण उगी राहावे व नुसते पहात बसावे, म्हणजे झालं" यावर श्री. जोशी गप्प राहिले.

श्री. जोशी हे निरपेक्ष असल्याने त्यांना नावलौकिक वगैरे कशाचीच अपेक्षा नव्हती. देह प्रारब्धाने आलेले सुखदु:खाचे विवेचन न करता श्रीनारायणाचे चरणी आपण केलेली सर्व कर्मे व त्यांचे फळ अर्पण करुन मन मुक्त ठेवायचे, हा नित्य कार्यक्रम असून दृढ अभ्यासाने आपला देह हा मरेपर्यंत केवळ त्या परमेश्वर रुपी जगाचा दास व्हावा, हीच इच्छा असल्याने ते नेहमी परमानंदातचं असत.

एक दिवस ते तात्यासाहेब साठ्यांना म्हणाले, "तात्यासाहेब माझे इथले काम झाले. अण्णासाहेब गाडगीळांमुळे मला भगवंताचे दर्शन झाले. माझे नेत्र पूर्ण निवले, आता कसलीही इच्छा नाही. जे हवे होते ते लाभले. आता कशाला राहायचे?" श्री. साठे म्हणाले, "अहो, जायचे ठरवणारे आपण कोण? श्रीबाबांची आधी परवानगी घ्या, तेव्हाच जाणे होईल." इतर सेवेकरी तेथे होतेच, त्यांना वासुदेवरावांची एकंदर वागणूक पाहून हा गृहस्थ सामान्य नाही, हे पटले होते. त्यांचे विषयी मनात विलक्षण आपुलकी व आदर निर्माण झाल्याने ते म्हणाले, "अहो, एवढे आलात, दर्शन घेतलेत, आता आपण श्रीबाबांकडे काहीतरी मागून घ्या. तुम्ही काहीही मागा, ते द्यायला श्रीबाबा पूर्ण समर्थ आहेत. प्रत्यक्ष भगवंतच आहे तो! खरंच काहीतरी मागा." जोशी मनापासून हसले व म्हणाले, "श्रीबाबांचे सुखकारक, मंगलदायक दर्शन मला झाले. मी कृतार्थ झालो. मला जे हवे होते, ते सर्व इथे मिळाले. आता कोणतीही इच्छा राहिली नाही. आता मला काहीही मागायचे नाही. या माझ्या नश्वर देहाचे श्रीसाईदर्शनाने साफल्य झाले आहे." त्यांचे हे विनयशील बोलणे ऐकूनही लोकांनी खूप आग्रहच धरला, तेव्हा जोशीबुवा म्हणाले, "तुम्ही ऐकत नाही ना, मग श्रीबाबांना प्रार्थना करा की, सत्यनारायण कंपनी दुकानावर जो उदरनिर्वाह चालला आहे तसाच चालू द्या."

दोन प्रहरी सर्व मंडळी श्रीबाबांच्या दर्शनाला द्वारकामाईत आली असताना, त्यांनी जोशींची मागणी श्रीबाबांपुढे मांडली. ती मांडताना श्री. जोशी कोणत्या कंपनीत

कसले काम करतात याबद्दल कुणीही काहीही बोलले नव्हते. त्यावेळी श्रीबाबा हसून म्हणाले, "यांना नारायणाने चटणी-भाकरीला कमी ठेवलंय का? त्यांनाच विचारा. त्यांची इच्छा नसताना तुम्ही त्यांच्यावर बळजबरी का करता?" श्रीबाबांचे हे बोल ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. जोशी मात्र बाबांचे बोलणे ऐकून खूष झाले. श्रीबाबा किती अंतर्ज्ञानी आहेत! त्यांना काही सांगावे लागले नाही, माझ्यात व इतर मंडळीत झालेले संभाषण त्यांना दुरुनही कळले, हा विचार मनात येऊन त्यांनी मनातल्या मनात आपल्या देवाला वंदन केले. पुढे जोशींनी राहावे की जावे, अशी विचारणा केली. तेव्हा श्रीबाबा म्हणाले, "अशा निरपेक्ष जीवांना जाण्यायेण्याची परवानगी मागण्याची गरज नाही. त्यांनी मनाला येईल तेव्हा यावे आणि मनाला वाटेल तेव्हा जावे. तेवढी त्यांची पात्रता आहे." तो गुरुवारचा दिवस होता. तेव्हा गाडगीळ म्हणाले, "जोशीबुवा, येथला प्रसाद बरोबर घेऊन जा बरं." गाडगीळांच्या सांगण्याप्रमाणे जोशीबुवा बापूसाहेब जोगांकडे प्रसाद मागायला गेले तेव्हा तिघांना तीन बर्फीचे तुकडे मिळाले. मुक्कामाचे जागी हा प्रसाद घेऊन येताच गाडगीळांनी तो पाहिला आणि म्हणाले, "हा प्रसाद पुरणार नाही, आणखी आठ आणे घेऊन जा व बर्फी आणा. हे ऐकून ते जायला निघतायत तो एक इसम सबंध बर्फीचे ताट घेऊन आला व म्हणाला, "श्रीबाबांनी हा प्रसाद खास गाडगीळांच्या पाहुण्यांसाठी पाठवला आहे." हे ऐकून गाडगीळ व जोशी यांना बाबांना प्रसादाबद्दल कसे कळले, यांचे आश्चर्य वाटले व इच्छा पूर्ण झाली म्हणून आनंदही वाटला. तो दिवस शिरडीत बाजार भरण्याचा होता. कुणीतरी नमुन्यादाखल म्हणून ओल्या भुईमुगाच्या शेंगा श्रीबाबांपुढे आणून ठेवल्या. पण भक्तजनांनी त्या खाऊन संपवून टाकल्या तेव्हा गाडगीळांनी एक रुपया देऊन एका माणसाला शेंगा आणायला पाठवले. त्याला वाटेतच अडवून श्री. तात्यासाहेब साठे म्हणाले, "अरे, कुठे जातोयस?" तो म्हणाला, "गाडगीळांनी त्यांच्या पाहुण्यांना शेंगा आणण्यासाठी रुपया दिलाय, त्यांच्या शेंगा घेऊन येतो." साठे म्हणाले, "अरे, थांब, जाऊ नकोस. अरे, बाबांची आज्ञा झालीय की, प्रथम आलेल्या दोन पोती शेंगापैकी दोन टोपल्या शेंगा गाडगीळांना व त्यांच्या पाहुण्यांना इथेच खायला द्या व नंतर ते मागतील तितक्या त्यांना घरी न्यायला द्या व उरलेल्या शेंगा गोरगरीबांना वाटून टाका." साठेसाहेबांचे हे उद्‌गार ऐकून गाडगीळ व जोशी यांना आनंदाचा गहीवर आला. आपला साईश्वर काय काय लीला दाखवील, ते सांगता येणार नाही. तो खरोखरीच, सर्वांतर्यामी, भक्तवत्सल, प्रेमळ अशी आईच आहे, हा विचार मनात येऊन त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबून आले. त्यानंतर सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन मोठ्या आनंदित मनाने ते सोलापूरला परत आले. त्यांचा मुळातच प्रसन्न असलेला चेहरा शिरडी यात्रेहून आल्यावर आणखीनच प्रमुदित झाला आहे, असे त्यांच्या सत्यनारायण कंपनीत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वाटत होते.

पाच सहा दिवसांनी त्यांच्याच कंपनीत काम करणाऱ्या भक्तिपरायण गोविंद धोंडो पानसरे यांना बोलावून जोशीबुवा म्हणाले, "गोविंदराव, तुम्ही शिरडीत जाऊन

श्रीबाबांचे दर्शन घ्या. तुमचे जन्माचे कल्याण होईल. त्यांचे भक्तांवरचे प्रेम, त्यांचे अंतर्ज्ञान, त्यांची कृपादृष्टी याबद्दल मी काय बोलू! तो नुसता बोलून दाखविण्याचा विषय नव्हे. हृदयाच्या आतल्या गाभ्यात तो जतन करुन ठेवावयाचा. मला वाटते आजच तुम्ही शिरडीला जावे. हे घ्या १० रुपये. कसलीही काळजी न करता बाहेर पडा. तो शिरडीश्वर तुमची सर्व काळजी घेईल. श्रीबाबांचे मनसोक्त दर्शन घ्या. चार दिवस आनंदात राहा. तुम्हाला श्रीबाबांचा प्रत्यक्ष अनुभव येईलच. आणि हो, जमल्यास तेवढं फोटोचं पहा.''

श्री. गोविंदराव पानसऱ्यांना जोशीबुवांनी सांगितलेल्या गोष्टीवरुन श्रीबाबांना पहाण्याची उत्सुकता होतीच. जोशीबुवांनी दिलेले पत्र घेऊन ते निश्चिंत मनाने शिरडीत आले. श्री. गाडगीळ व साठे यांनी जोशीबुवांचे पत्र पाहून पानसऱ्यांची उत्तम व्यवस्था ठेवली. दुपारी विश्रांती घेऊन झाल्यावर त्यांना श्रीबाबांचे दर्शनही घडविले. जोशीबुवांनी वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच श्रीसाईबाबा प्रत्यक्ष परमेश्वर आहेत, हा विचार श्री. पानसऱ्यांच्या मनात येतोय,तोच श्रीबाबा म्हणाले, ''अरे, तुला सत्यनारायण कंपनीच्या जोशीबुवांनी फोटो काढायला पाठवलंय ना? मग बसलास काय? तुला पाहिजे तसा फोटो घे. आपण काहीही बोलायच्या आधीच श्रीबाबांना फोटोबद्दल कसे कळले. याचं आश्चर्य वाटून श्री. पानसरे श्रीबाबांचे मुखाकडे टक लावून पाहू लागले. तेव्हा बाबा परत म्हणाले, ''अरे, वाट कसली पहातोस? काढ, पाहिजे तसे फोटो काढ.'' आता मात्र भानावर येऊन श्री. पानसऱ्यांनी श्रीबाबांचा दगडावर बसलेला व उभा (खांबाला टेकून) असे फोटो काढून घेतले. सर्व मंडळी चकीत झाली. कारण यापूर्वी श्रीबाबांनी कुणालाही आपला फोटो काढू दिला नव्हता. फोटो काढल्यानंतर श्रीबाबांनी पानसऱ्यांना आपल्याजवळ ४ दिवस ठेऊन घेतले. अनेक शुभाशीर्वाद दिले.नंतर ते श्रीबाबांची आज्ञा घेऊन जायला निघाले, तेव्हा बाबा म्हणाले, ''अरे, फोटोची किंमत वाजवीपेक्षा जास्त घेऊ नकोस हो. बाकी तू सत्यनारायण कंपनीच्या जोशीबुवांचा पट्टशिष्य आहेस, तेव्हा ते तुला कधीही जास्त किंमत घेऊ देणार नाहीत. त्यांच्याच आशीर्वादाने तुझे कल्याण होणार आहे. बरे, ये आता. अशीच माझी आठवण ठेवा. तुम्हाला काही कमी पडणार नाही.''

अत्यंत समाधानी मनःस्थितीत पानसरे परत सोलापूरला आले. आल्यावर अतिशय आनंदाने, प्रफुल्ल अंतःकरणाने त्यांनी सगळ्या गोष्टी श्री. जोशीबुवांना सांगितल्या. तेव्हा जोशीबुवांना प्रेमाचा परम गहिवर येऊन, त्यांनी अनन्यभावाने आपल्या श्रीसाईपरमात्म्याला शिरडीच्या दिशेने हात जोडून पुन्हा पुन्हा अभिवादन केले.

('शिरडीचे साईबाबा' पुस्तकाच्या आधारे)

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**— साईनंद**

बुधवार, दि. २४ - १ - १९१२

आज तसे काही एक कारण नसताना मी बराच वेळ पर्यंत झोपून राहिलो. उठल्यावर प्रत्येक कामात उशीर होत गेला. त्यामुळे मला प्रत्येक दैनंदिन कार्यक्रमात काहीशी घाई करावी लागली. माझ्याप्रमाणे दिक्षित यांनीही उठावयास उशीर झाला. आणि त्यामुळे असे वाटले की, जवळजवळ प्रत्येकालाच काही ना काही तरी घाई करावी लागली. आम्ही साईबाबांचे, ते बाहेर पडत असतानाचे वेळी दर्शन घेतले आणि नंतर उपासनी, भीष्म व बापूसाहेब जोग यांचेबरोबर परमामृताचे वाचन केले. त्यानंतर मी साईबाबांच्या दर्शनासाठी मशिदीत गेलो. लक्ष्मीबाई कौजलगी, आम्ही परमामृत पाठाचे वाचन करीत असताना खोलीत आली व त्यामध्ये सामील झाली आणि मी मशिदीत पोचल्यानंतर ती मशिदीत आली. साईबाबांनी तिला आपली सासू आली, असे म्हटले आणि ती बाबांना ज्याप्रकारे वंदन करायची, त्यावर एक विनोद पण त्यांनी केला. यामुळे मी असा तर्क केला की, बाबांनी तिला जणू आपली शिष्याच म्हणून स्वीकार केला आहे. दुपारची आरती नेहमीप्रमाणे शांततेने पार पडली. आरतीहून परतल्यावर मी कोपरगावचे मामलेदार श्री. साने यांना व्हरांड्यामध्ये बसलेले पाहिले. ते कबरस्तान व स्मशान घाट हटवून गावठाणचे विस्तार कार्य व सारा वसुलीचे कार्य करीत होते. भोजनानंतर मी काही पत्रे लिहिण्याचा यत्न केला खरा, पण श्री. साने यांचेबरोबर गप्पागोष्टीच करीत बसलो. नंतर दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले आणि नंतर मी मशिदीत साईसाहेबांचे दर्शनार्थ गेलो. परंतु श्रींनी सर्वांनाच लौकर निरोप दिला होता म्हणून मी उदी घेतली आणि चावडी जवळ उभा राहिलो. तिथे मला एक मुसलमान कबीर पंथी सद्‌गृहस्थ भेटला. तो काही दिवसापूर्वी सथाचे व असनारे यांचेबरोबर अमरावतीस आला होता. सायंकाळी वाड्यात आरती झाली व रात्री चावडीत शेजारती झाली. मी नेहमीप्रमाणे मोरचेल धरला होता.

गुरुवार, दि. २५ - १ - १९१२

आज सकाळी माधवराव देशपांडे यांनी मला उठविले. मला उठविल्यानंतर ते म्हणाले की, मला जाग आणण्यासाठी आपणास अनेकदा हाका माराव्या लागल्या. मी प्रार्थना केली आणि काकड आरतीस गेलो. साईबाबा शांततेने मशिदीत गेले. परंतु आल्यावर आम्ही परमामृताचा वर्ग घेतला. त्यात उपासनी, बापूसाहेब जोग, भीष्म आणि श्रीमती कौजलगी पण सामील झाले होते. आम्ही महावाक्य विवेक हा अध्याय समाप्त केला. नंतर आम्ही साईसाहेबांना ते बाहेर जाताना व ते बाहेरून परत मशिदीत आल्याचेही दोन्ही वेळा पाहिले. दुपारची आरती नेहमीप्रमाणे झाली आणि साईसाहेबांनी आज अनेकदा मला चिलीम ओढावयास दिली. भोजनानंतर मी काही

वेळ झोपलो आणि मग उठल्यावर रामायणाचे आम्ही वाचन केले. दीक्षितांनी वाचन केले व त्यानंतर साईबाबांच्या दर्शनास आम्ही गेलो. ते प्रसन्न मुद्रेत होते. रात्री वाड्यात आरती झाली आणि त्यानंतर भीष्मांचे भजन व दीक्षितांचे रामायण वाचनही झाले. मी हे सत्य स्पष्ट करतो की, सायंकाळी रपेटीस जाताना साईबाबांनी मला श्रीमती लक्ष्मीबाई कौजलगी हिचा जवळजवळ सगळाच पूर्व इतिहास कथन केला. त्यात तथ्य असल्याने मी तो सत्य मानला आहे.

# अर्चना !

मनापासूनी साईंची भक्ती जो निशिदिनी करी
निःस्वार्थ वृत्ती ठेवूनी परमकल्याण जो करी
साईस मानी जो आई बाप तो करी चाकरी
सात्विक पिंड मग त्याचा जाहला जगतांतरी ॥१॥

आठवी साईला नित्य श्वासोच्छाश्वासी क्षणोक्षणीं
कायावाचामने जाई साईचरणी लीन होऊनी
विश्वास पूर्ण ठेवूनी साईचा दास म्हणवूनी
साई त्याची करी पूर्ण वांछिते भाव पाहूनी ॥२॥

आधार एक तो साई भार त्यावरी टाकूनी
भोग भोगीत प्रारब्धे साईचे नाम घेऊनी
भक्ती तैसी देई शक्ति साई पाठीशी राहूनी
चित्तांत साई साठवि तो जाहला दिव्य जीवनी ॥३॥

आनंदकंद साई सुखदायी खरोखरी
भाव ज्याचा जसा त्याला पावतो हृदयांतरी
भूतमात्रावरी माया सर्व जीवांवरी करी
परदुःखे निवारी जो त्याच्या राहे बरोबरी ॥४॥

कडूलिंबपर्णांनाही आणिली माधुरी खरी
वृक्षारक्षाषौधीयुक्त उदी मानसी संचरी
ईच्छाशक्तीन्य लाभोनी सिद्धीही लाभते खरी
तल्लीन साईरुपी झाला झाला तो धन्य भूवरी ॥५॥

म्हणा आतां मुखे साई साई आत्मा मनी आणा
बघा आतां जिथे तिथे साई विश्वी बहुगुणा
स्वतःस पूर्ण विसरा हो साई पूर्णास—अर्चना—
"सर्वांना सुखी ठेवी भो येऊं दे करुणा मनां ॥६॥

**– श्री. बा. ना. तळवाडकर**
रावळगांव.

# श्री साईसहस्र नामावली

— श्री. संजीव चंदने
कल्याण.


(मागील अंकावरुन क्रमशः)

१९५) श्री साई संदर्भ नमो नमः
१९६) श्री साई सुखकर मूर्ती नमो नमः
१९७) श्री साई दत्त देवाय नमो नमः
१९८) श्री साई दाता नमो नमः
१९९) श्री साई दत्त अवतार नमो नमः
२००) श्री साई दातृत्व नमो नमः
२०१) श्री साई दत्तात्रय नमो नमः
२०२) श्री साई दर्शन नमो नमः
२०३) श्री साई देवाय नमो नमः
२०४) श्री साई दान नमो नमः
२०५) श्री साई दास नमो नमः
२०६) श्री साई दामोदर देवाय नमः
२०७) श्री साई दक्ष नमो नमः
२०८) श्री साई दीप नमो नमः
२०९) श्री साई द्वारकेश्वराय नमो नमः
२१०) श्री साई देहधारी नमो नमः
२११) श्री साई दुर्गेश नमो नमः
२१२) श्री साई द्वारकामाई नमो नमः
२१३) श्री साई दिव्यतेज नमो नमः
२१४) श्री साई दीनानाथाय नमो नमः
२१५) श्री साई दशरथाय नमो नमः
२१६) श्री साई धाम नमो नमः
२१७) श्री साई दिव्यत्व नमो नमः
२१८) श्री साई देवरुपाय नमो नमः
२१९) श्री साई दयाधनि नमो नमः
२२०) श्री साई दिनकराय नमो नमः
२२१) श्री साई दिनबंधु — देवाय नमः
२२२) श्री साई देवदत्त नमो नमः
२२३) श्री साई दिनोद्धारक नमो नमः
२२४) श्री साई दिनदयाळा नमो नमः
२२५) श्री साई द्रव्यसमर्पण नमो नमः
२२६) श्री साई धरणीनंदनाय नमो नमः
२२७) श्री साई दिव्य कांती नमो नमः
२२८) श्री साई देवाधीदेव नमो नमः
२२९) श्री साई दुःख हर्ता नमो नमः
२३०) श्री साई द्वारकानाथ देवाय नमः
२३१) श्री साई दीपज्योती नमो नमः
२३२) श्री साई धर्माचरण नमो नमः
२३३) श्री साई दत्तगुरवे नमः
२३४) श्री साई धर्मवृत्ती नमो नमः
२३५) श्री साई दरबार नमो नमः
२३६) श्री साई ध्यास नमो नमः
२३७) श्री साई दयावंत नमो नमः
२३८) श्री साई दुरीत निवारी नमो नमः
२३९) श्री साई धूप नमो नमः
२४०) श्री साई दिवाकराय नमो नमः
२४१) श्री साई दासा विसावा नमो नमः
२४२) श्री साई देवर्षी नमो नमः
२४३) श्री साई दयासागर नमो नमः
२४४) श्री साई धन नमो नमः
२४५) श्री साई धूनी नमो नमः
२४६) श्री साई ध्यान मग्न नमो नमः
२४७) श्री साई निंबस्थानाय नमो नमः
२४८) श्री साई रामाश्रय नमो नमः
२४९) श्री साई विद्यासुख दाता नमो नमः
२५०) श्री साई ईश्वत्व नमो नमः
२५१) श्री साई अगम्य लीला नमो नमः
२५२) श्री साई एकनाथाय नमो नमः
२५३) श्री साई अलौकिकता नमो नमः
२५४) श्री साई अवतार देवाय नमः
२५५) श्री साई आविष्कार नमो नमः
२५६) श्री साई आधार नमो नमः
२५७) श्री साई अकार स्वरुप नमो नमः
२५८) श्री साई अमर नमो नमः
२५९) श्री साई अनसुया सुत नमो नमः
२६०) श्री साई अनीरुद्धाय नमो नमः

२६१) श्री साई आकाशानंदाय नमो नमः
२६२) श्री साई अभंग नमो नमः
२६३) श्री साई अनंताय नमो नमः
२६४) श्री साई आत्यानंद नमो नमः
२६५) श्री साई आशीर्वाद नमो नमः
२६६) श्री साई अरविंदाय नमो नमः
२६७) श्री साई अंतर्ज्ञानी नमो नमः
२६८) श्री साई अंतःकरण स्वरुप देवाय नमः
२६९) श्री साई आशिर्वचन नमो नमः
२७०) श्री साई अद्‌भुतलीला नमो नमः
२७१) श्री साई अनाथनाथ नमो नमः
२७२) श्री साई अहंकार नाशक देवाय नमः
२७३) श्री साई अल्ला मालिक नमो नमः
२७४) श्री साई आसन नमो नमः
२७५) श्री साई अपरंपार नमो नमः
२७६) श्री साई अविनाशी नमो नमः
२७७) श्री साई आसरा नमो नमः
२७८) श्री साई अमृतधारा वाणी नमो नमः
२७९) श्री साई अशरीर वाणी नमो नमः
२८०) श्री साई अनुभवानंदाय नमो नमः
२८१) श्री साई अंजनीसूत नमो नमः
२८२) श्री साई आदीनाथाय नमो नमः
२८३) श्री साई आश्रीत नमो नमः
२८४) श्री साई अगाधलीला नमो नमः
२८५) श्री साई औषध नमो नमः
२८६) श्री साई अनुभव नमो नमः
२८७) श्री साई आनंदाय नमो नमः
२८८) श्री साई ओंकाररुप नमो नमः
२८९) श्री साई अगाध शक्ती नमो नमः
२९०) श्री साई अमरपद नमो नमः
२९१) श्री साई अक्षरधाम नमो नमः
२९२) श्री साई अक्षता नमो नमः
२९३) श्री साई अर्चना नमो नमः
२९४) श्री साई अवधूत नमो नमः
२९५) श्री साई अच्युताय नमो नमः
२९६) श्री साई अनंत लिला नमो नमः
२९७) श्री साई अभयवद नमो नमः
२९८) श्री साई आदित्य नारायण नमो नमः
२९९) श्री साई ओंकारेश्वराय नमः
३००) श्री साई औदुंबर प्रसादाय नमो नमः
३०१) श्री साई अभिषेक नमो नमः
३०२) श्री साई आश्चर्य नमो नमः
३०३) श्री साई अक्षय स्वरुप नमो नमः
३०४) श्री साई आनंद यात्री नमो नमः
३०५) श्री साई आत्म संतोष नमो नमः
३०६) श्री साई आनंद-कुंदा नमो नमः
३०७) श्री साई आल्हाद नेत्र नमो नमः
३०८) श्री साई अन्नपूर्णा नमो नमः
३०९) श्री साई आनंद-धन नमो नमः
३१०) श्री साई अध्यात्मज्ञान नमो नमः
३११) श्री साई अखंड नाम नमो नमः
३१२) श्री साई अनुमान नमो नमः
३१३) श्री साई अरुणोदय नमो नमः
३१४) श्री साई अमरदिनाय नमो नमः
३१५) श्री साई एकात्मता नमो नमः
३१६) श्री साई अजरामर नमो नमः
३१७) श्री साई आनंदवृत्ती नमो नमः
३१८) श्री साई अंगारा-शक्ती नमो नम
३१९) श्री साई आनंदनाथाय नमो नमः
३२०) श्री साई आराध्य दैवत नमो नम
३२१) श्री साई आनंद सागर नमो नम
३२२) श्री साई विश्वरुपाय नमो नमः
३२३) श्री साई विष्णवे नमः
३२४) श्री साई विश्व देवाय नमः
३२५) श्री साई वाक् सुधा नमो नमः
३२६) श्री साई वत्सल रुप नमो नमः
३२७) श्री साई विश्वंभराय नमो नमः
३२८) श्री साई विलास नमो नमः
३२९) श्री साई विश्वनाथाय नमो न
३३०) श्री साई वासुदेवाय नमो नमः
३३१) श्री साई विनायकाय नमः
३३२) श्री साई विचार नमो नमः
३३३) श्री साई वाचक नमो नमः
३३४) श्री साई विजय ग्रंथ नमो नम
३३५) श्री साई विवेक नमो नमः
३३६) श्री साई विजय नमो नमः

३३७) श्री साई विश्वास नमो नमः
३३८) श्री साई विश्वानंदाय नमो नमः
३३९) श्री साई विद्यानंदाय नमो नमः
३४०) श्री साई वसंत नमो नमः
३४१) श्री साई वारकरी नमो नमः
३४२) श्री साई विद्याधर नमो नमः
३४३) श्री साई वैराग्य नमो नमः
३४४) श्री साई विरोध नमो नमः
३४५) श्री साई वेदांत नमो नमः
३४६) श्री साई विश्वास समर्थाय नमो नमः
३४७) श्री साई वचनामृत नमो नमः
३४८) श्री साई विसावा नमो नमः
३४९) श्री साई वंदन त्रिवार नमो नमः
३५०) श्री साई व्यक्त स्वरुपाय नमो नमः
३५१) श्री साई विश्वपालक नमो नमः
३५२) श्री साई विचारवत नमो नमः
३५३) श्री साई विश्वनायक नमो नमः
३५४) श्री साई विष्णुरुप नमो नमः
३५५) श्री साई वैभव नमो नमः
३५६) श्री साई वाचा सिद्धी नमो नमः
३५७) श्री साई विश्वात्मक नमो नमः
३५८) श्री साई वृत्ती नमो नमः
३५९) श्री साई विष्णुनाम देवाय नमो नमः
३६०) श्री साई विश्वेवर नमो नमः
३६१) श्री साई विद्यासागर नमो नमः
३६२) श्री साई विश्वाधार नमो नमः
३६३) श्री साई विकार-दमना नमो नमः
३६४) श्री साई विघ्न हर्ता नमो नमः
३६५) श्री साई वासुदेव नंदनाय नमो नमः
३६६) श्री साई व्यंकुशाय नमो नमः
३६७) श्री साई विधाता नमो नमः
३६८) श्री साई वेद स्मृती नमो नमः
३६९) श्री साई विपुलता नमो नमः
३७०) श्री साई वात्सल्य नमो नमः
३७१) श्री साई वसुंधरा स्वरुप नमो नमः
३७२) श्री साई विविध देवरुप नमो नमः
३७३) श्री साई विठ्ठल नमो नमः
३७४) श्री साई विभूती नमो नमः
३७५) श्री साई वरदहस्त नमो नमः
३७६) श्री साई विद्या दयासागर नमो नमः
३७७) श्री साई विकल्प नमो नमः
३७८) श्री साई वामनाय नमो नमः
३७९) श्री साई ज्ञानराज नमो नमः
३८०) श्री साई कृष्ण नमो नमः
३८१) श्री साई काव्य नमो नमः
३८२) श्री साई कुल दैवताय नमो नमः
३८३) श्री साई कलीयुग देवाय नमः
३८४) श्री साई केशवाय नमः
३८५) श्री साई किर्तन नमो नमः
३८६) श्री साई किशोर नमो नमः
३८७) श्री साई करुणामूर्ती नमो नमः
३८८) श्री साई कृपा सागर नमो नमः
३८९) श्री साई कमलाकांत नमो नमः
३९०) श्री साई कुबेर नमो नमः
३९१) श्री साई कृपावंत नमो नमः
३९२) श्री साई कल्याण नमो नमः
३९३) श्री साई किमया नमो नमः
३९४) श्री साई कल्पतरू नमो नमः
३९५) श्री साई किर्ती नमो नमः
३९६) श्री साई कृष्णनाथाय नमो नमः
३९७) श्री साई करुणासिंधु नमो नमः
३९८) श्री साई कुंकूम नमो नमः
३९९) श्री साई कोटी भास्कर नमो नमः
४००) श्री साई कृपालोभ नमो नमः

(क्रमशः)



# श्री बाबांचे सिंहासन

– श्री. कृ. भा. देशमुख
रामबाग कॉलनी,
तीर्थ को. हौ. सोसायटी, ब्लॉक नं. १,
श्रीमान हॉटेल समोर, पौंड रोड,
पुणे-४११ ०३८.

बायजाचा नवरा व मुलगा जेवून बाहेर पडले. भिक्षेची वेळही टळून गेली. बाबा अजून का बरे आले नाहीत म्हणून बायजा चिंतातूर झाली. तिच्या मातृ-हृदयाला रहावले नाही. तिने टोपलीत भाजी भाकरी व चटणी ठेवली. दुसऱ्या हातात पाण्याचा तांब्या घेऊन घाईघाईने ती मशिदीकडे निघाली. जाताना मनात भिती वाटत होती, कारण गेल्याच आठवड्यात बाबांनी तिच्या मनातील अभिमान घालविण्यासाठी तिच्या जेवणाचा अव्हेर केला होता. शिवाय गेले आठ दिवस ते तिच्या घराकडे फिरकले पण नव्हते. बाबांना भक्ताला झालेला अभिमान आवडत नसे. पोटच्या पोरापेक्षाही अधिक माया करणारा हा प्रेमळ जीव मात्र बेचैन झाला होता. ती मशिदीत पोहचली. बाबा मशिदीत नव्हते. अब्दुल एकटाच बसला होता. तिने अब्दुलला विचारले, "काय रे पोरा, बाबा कुठे गेला?" अब्दुल म्हणाला, "बायजामाय थोड्या वेळापूर्वीच बाबा मला सांगून रानात निघून गेले."

बायजा म्हणाली, "अरे, या वक्ताला? उपाशीच गेला असेल." कळवळून तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले," काय रे पोरा, तू जेवलास का?" बायजाने विचारले. "नाही माय, शिवाय आज बाबांनी भिक्षा पण आणली नाय. बाबांनी मला घरी जावयास सांगितले होते पण मशिदीत कुणी नाही म्हणून मीच घरी गेलो नाही," अब्दुल उत्तरला.

"अरे देवा, तू पण उपाशी हायेस व्हय? अरे हे घे, उपाशी नग राहूस" असे म्हणून बायजाने टोपलीतील शिदोरी त्याच्यापुढे ठेवली. अब्दुलने जेवायला सुरुवात केली. बायजा मात्र घरी गेली. तीन भाकऱ्या थापल्या. चटणी, भाकर, भाजी टोपलीत ठेवून ती बाबांच्या शोधाकरिता रानाकडे निघाली. अब्दुलला बायजाने जेवायला घातले, हे बरे केले कारण कुणीही उपाशी राहिले की, सर्वांतर्यामी वास करणाऱ्या या देवाला ते आवडत नसे. कडकडीत उन पडलं होतं. बायजा जंगलाची पायवाट तुडवीत निघाली होती. भाकरीचे टोपले घेऊन ती वणवण भटकत होती. थकली होती, तरीपण चालत होती. पोटात कावळे कोकलत होते पण बाबांचा शोध लागत नव्हता. शेवटी ती पायवाट सोडून आडरानात शिरली. पायात काटे बोचत होते. दगडही टोचत होते. पण आज बाबांचा शोध घ्यावयाचा याच निर्धाराने ती चालत होती. शेवटी तिला चालवेना. ती थकली व विश्रांतिसाठी एका झाडाखाली बसली. तिने सहज समोर पाहिले. गर्द गडीत एका पिंपळाच्या झाडाखाली शिळेवर बाबा डोळे मिटून ध्यान लावून बसले

होते. बायजा हातात भाकरीचं टोपले व दुसऱ्या हातात तांब्या घेवून हळूच बाबांच्या शेजारी जाऊन उभी राहिली. तिच्या थकलेल्या व भुकेल्या अवस्थेचं स्पंदन बाबांच्या हृदयात सुरू झाले. त्यांची समाधी उतरली. त्यांनी डोळे उघडून पाहिले. समोर बायजा उभी होती. बाबा म्हणाले, "अब्दुलला जेवायला घातलेस, लई बेस केलस बघ. पाहिलेस ना, पोराला घरी जायला सांगितले होते, पण नाही गेला, तिथेच बसून राहिला. बायजा माय, कशाला इतका त्रास घेतेस या फकिरासाठी? सारे रान तुडवलेस माझ्यासाठी, आण ती भाकरी," बाबा म्हणाले. "देवा तू जेवला नाहीस की, मला बी जेवण सुचत न्हाय," बायजा म्हणाली.

"पण माय, मी आता रोजच इथे येणार हाय," बाबा म्हणाले. "का रे बाबा, मशिदीत तुझे ध्यान लागत नाही व्हय, मग येवढ्या लांब काट्याकुट्यात कशाला येतोस?" बायजा म्हणाली. "बायजा माय, हा दगड मला लई आवडतो आणि त्यावर बसले की सहज समाधी लागते. बसल्या जागी जगाची दुःख कळतात आणि शरीर येथे ठेवून मला त्याची सेवा करता येते," बाबा म्हणाले.

बायजा म्हणाली, "मला यातलं काय बी कळत नाय, तुला हाच घोडा पाहिजे असेल तर मशिदीत नेवून ठेवते." "बायजा माय, घोडा लई जड हाय", बाबा म्हणाले. "असू दे. सारा गाव तुझा शब्द झेलायला तैयार है, आटप लौकर" बायजा म्हणाली. बाबांनी भाकर खाल्ली, पाणी प्याले. तिला देव जेवल्याचा आनंद झाला. बायजाने दुसऱ्याच दिवशी गावकऱ्यांच्या मदतीने ती शीळा मशिदीत बसविली. जगातला संतांचा राजा या दगडी सिंहासनावर आरूढ होऊ लागला. जणू कृष्णाचाच या द्वारकामायीतील या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. द्वारकामाई सतत तेवत राहणाऱ्या धुनीमुळे ही शोभा द्विगुणीत झाली. असा आहे इतिहास बाबांच्या सिंहासनाचा.

# जे जे देखिजे भूत । ते ते जाणिजे भगवन्त ॥

**— श्री. बी. व्ही. सावन्त**
बी. ए., एस. एच. एस. एस.
साहित्य-विशारद, अनु. पंडित,
रॉबर्ट मनी हायस्कूल कंपाऊंड,
स्टाफ क्वार्टर्स, खोली नं. १,
गँटरोड, मुंबई - ४०० ००७.

श्रीकृष्ण भगवंन्तानी भगवद्गीतेमध्ये अर्जुनाला सांगितले आहे की, ईश्वर फक्त तीर्थक्षेत्री, देवळात किंवा मशिदीमध्ये नाही, तर तो प्रत्येक प्राणीमात्रांच्या अंतःकरणात सदैव वास करीत असतो. पण सामान्य माणसे त्याला ओळखू शकत नाहीत. कै. मांडगूळकरांनी म्हटले आहे की, "नसे राऊळी वा नसे मंदिरी, ईश वसतसे तव हृदन्मंदिरी।" याच सूत्रानुसार पशू, पक्षी, कीडा, मुंगी या सर्वांच्या आत्म्यांमध्ये

ईश्वराचा अंश वास करीत असतो. सर्व प्राणीमात्रांचा आत्मा एकच असतो, हे प्राचीन साधु-संतांपासून तो आधुनिक कै. गाडगे महाराजांसारख्या समाजसुधारक संतांनी सोप्या भाषेत सामान्य अडाणी लोकांना समजावून सांगितले आहे.

श्री एकनाथ महाराजांनी देवाच्या अभिषेकासाठी दूरवरुन रामेश्वराहून आणलेले पवित्र नदीचे पाणी वाळवंटात तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला पाजून त्याचा प्राण वाचविला व सर्वांना दाखवून दिले की, मानवाचा व प्राण्याचा आत्मा एकच आहे. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे, देवाच्या अभिषेकापेक्षा मुक्या प्राण्याचे प्राण वाचविणे, हे देवपूजेपेक्षा श्रेष्ठ व पवित्र आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सुद्धा रेड्याच्या तोंडून वेद म्हणवून हेच दाखविले की, मानवाचा व प्राण्याचा आत्मा एकच आहे. म्हणूनच एका कवीने म्हटले आहे की, "कशास जाशी रामेश्वर तू कशास जाशी काशी? अरे,ईश असे तव हृदयासी।" तसेच खऱ्या संताचे लक्षण म्हणजे,"जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।।" याच उक्तीप्रमाणे 'श्री साईसत्‌चरितात' श्री साईबाबांच्या अलौकिक, चमत्कारिक व भूतदयेने ओतप्रोत भरलेली सत्य उदाहरणे प्रत्येक अध्यायातून वाचावयास मिळतात. सर्वच साईभक्तांना 'श्री साईसत्‌चरित' वाचावयास वेळ नसतो किंवा सर्वसामान्य लोकांना तो विकत घेऊन वाचणे शक्य नसते. म्हणून यातील निवडक, प्राण्यांच्या (भूताच्या) ठिकाणी भगवंताचे दर्शन घडविणारी दोन ठळक उदाहरणे मी खाली देत आहे.

१) एका संध्याकाळी 'साईबाबा' चावडीवर भिंतीस टेकून बसले असताना, 'लक्ष्मी' नावाची भक्तपरायण बाई तेथे आली. तिने आल्याबरोबर बाबांना नमस्कार केला. तेव्हा बाबा म्हणाले, "लक्ष्मी, मला फार भूक लागली आहे. त्वरीत जाऊन भाजी-भाकरी घेऊन ये." बाबांची आज्ञा ऐकून ती ताबडतोब गेली. व ताजी भाकरी भाजून, भाजी, चटणी वगैरे घेऊन आली व तिने ते सर्व बाबांच्या समोर ठेवले. बाबांनी ताबडतोब ताटातील सर्व वस्तू उचलून समोरच्या कुत्र्यासमोर जशाच्या तशा ठेवून दिल्या. त्यातील भाकरीचा एक तुकडा सुद्धा स्वत: खाल्ला नाही. ते अकल्पित दृश्य पाहून लक्ष्मी बाबांना लटक्या रागाने म्हणाली, "हे हो काय बाबा, मी खास तुमच्यासाठी ताबडतोब जाऊन हातोहात गरम, गरम भाकरी भाजून आणल्या व तुम्ही त्यातील एक तुकडा सुद्धा न खाता कुत्र्यांची धन केलीत, असं का? गावभर भटकणाऱ्या कुत्र्याचे इतके कौतुक का? हे ऐकताच बाबा समजावणीच्या स्वरात लक्ष्मीला म्हणाले, "हे बघ, मुक्या कुत्र्याची भूक शांत झाली. त्यामुळे माझे पोट सुद्धा आपोआप भरले. मी तृप्त झालो. लक्ष्मी, माझे एक वचन कायम लक्षात ठेव, "ज्या ज्या प्राणीमात्रांचे जीव (प्राण) भुकेने, तहानेने व्याकूळ झाले आहेत, त्यांना जे लोक अन्न व पाणी देऊन त्यांचा अंतरात्मा तृप्त करतात, ते अन्न मलाच प्राप्त होते. कारण सर्व प्राणीमात्रांचा आत्मा एकच आहे. सर्व ठिकाणी माझा निवास आहे."

वरील साध्या क्षुल्लक व्यावहारिक प्रसंगांतून श्री साईबाबांनी एक महान् त्रिकालाबाधित सत्य सर्वांना दाखवून दिले. ऐसी होती साईबाबांची अगाध लीला! ननाकलनीय कर्तृत्व ! !

ग्रंथपरीक्षण

# मानवतेचा महान पुजारी गाडगेबाबा

**— सौ. वासंती नांदेडकर**

'भक्तिसंगम प्रकाशन'ने ऑगस्ट १९८७ मध्ये संत गाडगेबाबांच्या जीवन-कार्यावर आधारीत असे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. पुस्तकाचे शिर्षक आहे 'मानवतेचा महान पुजारी - गाडगेबाबा'. या शिर्षकातच गाडगेबाबांनी मानवतेला अनुलक्षून केलेले अवघे कार्य कलात्मकरित्या गुंफले आहे. शीर्षकातील सूचकता लक्षणीय आहे. लक्षणीय अशासाठी की, जर अपवादाने महाराष्ट्रातील काही व्यक्ती संत गाडगेबाबांच्या कार्यासंबंधाने अनभिज्ञ असतील, अशा व्यक्तींनाही नुसत्या शिर्षकाकडे कटाक्ष टाकताच, गाडगेबाबांच्या कार्याची ओझरती ओळख व्हावी.

हे पुस्तक अवघ्या एकशे सोळा पृष्ठांचे आहे. पण पुस्तकात शब्दबद्ध केलेला आशय त्यात चितारलेल्या थोर विभूतीच्या जीवनकार्याला साजेसा महान आहे. या पुस्तकाचे स्वरुप 'चरित्र' या वाङमयप्रकारात मोडते.

महाराष्ट्रातील संत परंपरा थोर आणि अभिमानास्पद आहे. ज्ञानेश्वर - नामदेव - तुकाराम - एकनाथ - रामदास या प्राचीन संतांबरोबरच विनोबाजी भावे, बाबा आमटे, गाडगेबाबा यांनाही आपण संत व्यक्ती म्हणून संबोधतो. अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ किंवा शिरडीचे श्रीसाईनाथ यांनाही आपण विभूती मानतो. थेडक्यात कोणत्याही काळातील संतांप्रमाणे, गाडगेबाबांनीसुद्धा आपल्या भोवतालच्या समाजातील लोकांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला. ही वैचारीक जागृती त्यांनी नुसत्या शब्दांनी नाही केली तर प्रत्यक्ष कृतीने साधण्याचा प्रयत्न केला.

या त्यांच्या कार्याचे यथार्थ दर्शन श्री. सुधाकरजी सामंत यांनी आपल्या समर्थ शैलीने साकार केले आहे. खऱ्या अर्थाने गाडगेबाबांनी समाज प्रबोधन कसे केले, आदिवासी-मागासवर्गीय, लुळे-पांगळे, अपंग यांच्यासाठी ते कोणकोणत्या मार्गांनी झटले, स्वतःचा जीवनदीप इतरांच्या मार्गदर्शनासाठी कार्यरत करुन, खऱ्या अर्थाने प्रकाशाचा मार्ग समाजातील लोकांसाठी कसा दाखवून दिला, या सर्व गोष्टींचा आढावा या पुस्तकात घेतलेला आढळतो.

हे पुस्तक वाचताना आपल्या ध्यानात येते, श्री सामंत यांची लेखणी प्रासादीक, सहज-सोप्या, भाषामाधुर्याने सतत बहरत गेली आहे.

मानवतेवरील अपार प्रेम, माणुसकीबद्दलची कणव आणि माणसातील देव जागा करण्याची त्यांची वृत्ती ही संत गाडगेबाबांच्या जीवनातली ब्रीद त्रयी! श्री. सुधाकर सामंतांनी ती नेमकेपणाने मांडली आहे.

या पुस्तकाची उत्कृष्ट छपाई, मुखपृष्ठावरले बाबांचे बहुरंगीत बैठे फोटोचित्र व पुस्तकाच्या शेवटी दिलेले गाडगेबाबांचे सुविचार, पुस्तकाच्या अंतरंगात समावेश केलेली बाबांच्या जीवनातली फोटो-चित्रे या सर्वांमुळे पुस्तकाच्या रचना-सौंदर्यात भर पडून ते आकर्षक बनले आहे.

थोडक्यात परंतु सूक्ष्मरित्या संत गाडगेबाबांच्या जीवन-कार्याचा आढावा घेणा पुस्तक. प्रत्येकाच्या संग्रही असायला हवे.

**लेखक : सुधाकर सामंत**

प्रकाशन – भक्तिसंगम, मुखपृष्ठ – अशोक कुडाळकर, किंमत : १५ रु.

# गाडगेबाबांच्या सान्निध्यात

**– सौ. वासंती नांदे**

'भक्तिसंगम प्रकाशन'ने याच काळात म्हणजे ऑगस्ट १९८७ मध्ये गाडगेबाबांविषयीचे दुसरे पुस्तकही प्रकाशित केले आहे. ते पुस्तक म्हण 'गाडगेबाबांच्या सान्निध्यात.'

या प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठसंख्या एकशे सहासष्ट असून, त्याचे लेखक आहेत, श्री गुणवंतराव चराटे. पुस्तकाच्या शिर्षकाप्रमाणे श्री. चराटे यांनी आयुष्यातली दोन 'गाडगेबाबांच्या सान्निध्यात' घालविली आहेत. त्यामुळेच या पुस्तकाचे अनुभवविश्व अतिशय उत्कट आहे.

श्री. गुणवंतरावांनी स्वतः कथन केलेला, श्री. विजयानंद गावडे आणि श्री. सुधाक सामंत यांच्या सहकार्याने शब्दबद्ध झालेला हा अनुभव विश्वाचा खजिना, वाचका नक्कीच प्रेरणादायी ठरावा. ही सुखद आठवणींची भक्तिफुले सुगंधित तर आहेतच पण महाराष्ट्रातील प्रत्येक घरा-घरात जाऊन, हा मानवसेवेचा सुगंध कलश प्रत्ये माणसाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन प्रसारीत व्हावा, त्यासाठी हे पुस्तक एक प्रभा साधन ठरावे आणि संत गाडगेबाबांच्या मानवसेवेचे आसिधारा व्रत साध्य झाल्या अंशतः समाधान मिळावे.

या पुस्तकात साकार झालेले, मानवसेवेचे प्रेरणादायी स्फुल्लींग जनसामान्यापर्य पोचावे आणि प्रत्येक मानवाच्या मनात – दुसऱ्या मानवाबद्दल आपलेपणाची जाणी निर्माण व्हावी, आपण सारे एकमेकांचे बांधव आहोत, ही जाण यावी. इतके पुस्तकातले अनुभव जिवंतपणे प्रकट झाले आहेत. घरातील स्त्री-पुरुष, मुले-मुली तरुण-म्हातारे, शेजारी-सोयरे या सर्वांना उपयुक्त असे हे संग्राह्य पुस्तक आहे

या पुस्तकाची मांडणी सव्वीस प्रकरणात विभागली आहे. याची छपाई उत्कृ असून 'देवकीनंदन गोपाला' या गाडगेबाबांच्या आवडत्या जप-नामात मुखपृष्ठावरती त्यांची छबी वेष्टीली आहे.

या पुस्तकाद्वारे संत गाडगेबाबांच्या हृदयात अखंड जागणारा करुणेचा हुंका प्रत्येक मानवी हृदयात घुमला पाहिजे, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर प्रत्येकाच्या घरच्य ग्रंथसंग्रहालयात या अनमोल ग्रंथाची भर पडली पाहिजे.

लेखक - गुणवंतराव चराटे, शब्दांकन - संपादन - सुधाकर सामंत, प्रकाशन भक्तिसंगम

# मचे श्रीसाईबाबांविषयक सामान्य ज्ञान किती आहे?

ढीलपैकी पाच प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, तांची बरोबर उत्तरे देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्तम जावे.)

श्रीसाई साधुच्या वेषात दोन लहान मुलांना घेऊन .... गावी देव मामलेदार यांचेकडे ऊन भोजन करुन आले.

अ) पालघर ब) डहाणू क) नालासोपारा ड) नाशिक.

२) रामदासीच्या पोथीतून .... पोथी काढून बाबांनी ती शामांला बक्षिस दिली.

अ) विष्णूसहस्त्रनामाची ब) गीतेची क)हरीपाठाची ड)मारुती स्तोस्त्राची

३) ब्ऱ्हाणपूरच्या बाईजवळ बाबांनी ..... जेवण मागितले होते.

अ) आंबरस पुरीचे ब) झुणकाभाकरीचे क) पुरीभाजीचे ड) खिचडीचे.

४) बाबांच्या महानिर्वाणाच्या वेळी त्यांच्या मुखात गंगोदक .... यांनी घातले.

अ) बुटीं ब) काकासाहेब महाजनीं क) लक्ष्मण भट्ट ड) नानासाहेब नेमोणकर

५) शिरडीला साईबाबांचे वेळी .... हे ग्राम पाटील होते.

अ) हनुमानप्रसाद जोशी ब) बापाजी देशपांडे क) रामचंद्र दादा ड) देव मामलेदार.

६) मेघाने बाबांना .... या दिवशी सचैल स्नान घातले.

अ) आषाढी एकादशी ब) मकरसंक्रांत क) गुरुपौर्णिमा ड) भाऊबीज.

७) .... या दिवशी बाबांनी आपले सर्व कपडे काढून धूनीला अर्पण केले.

अ) गुढी पाडवा ब) बलिप्रतिपदा क) विजयादशमी ड) रामनवमी.

८) ...... हा बाबांच्या स्नानाचे केवळ पाणी पिऊन रहात असे.

अ) रामदासी ब) रघू पाटील क) नेवासकर ड) बाळा शिंपी.

९) पुणे स्थानकावर बाबा कुणब्याच्या वेषात ..... यांना भेटले.

अ) मानकर ब) रामलाल क) विजयानंद ड) भाटे.

१०) "अपना तकीया छोड़ना नही" असे बाबा .... यांना म्हणाले.

अ) पंत ब) दासगणू क) मेघा ड) नूलकर.

११) 'चिंधी चोर' असे बाबा ...... म्हणाले.

अ) बुटींना ब) दीक्षितांना क) देवांना ड) रामलालला.

१२) बाबांच्या सहवासकालातील शिर्डी दैनंदिनी ..... यांनी लिहिली आहे.

अ) खापर्डे ब) चांदोरकर क) दाभोलकर ड) धरमसी.

**— सदानंद चेंदवणकर**

उत्तरे

१)-ब २)-अ ३)-ड ४)-ड ५)-क ६)-ब ७)-क ८)-क ९)-अ
१०)-अ ११)-क १२)-अ.

# शिरडी वृत्त

# नोव्हेंबर १९८७

या महिन्यात श्री साईबाबांच्या दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी बरीच आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे–

**कीर्तनः–** १) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान, पुजारी, गवई-कीर्तनकार-प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.
२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.
३) ह.भ.प. सौ. सुमनताई वसंतराव पाठक, वैळापूर.
४) ह.भ.प. रामराव महाराज ढुकरे, पेठ.

**प्रवचनः–** १) ह.भ.प. वासुदेव महाराज रामदासी, गंगाखेड.
२) ह.भ.प. सिताराम महाराज जगताप, आळंदी.
३) ह.भ.प. जनार्दनबुवा तांबे, पुणे.
४) ह.भ.प. विठ्ठल महाराज, हैद्राबाद.

**भजन, गायन, वादन इ.** १) श्री हनुमान भजनी मंडळ, मोरा कोळीवाडा २) कु. अनुराग श्रीवास्तव, गोरेगाव ३) श्रीमती शकुंतला श्रीवास्तव, गोरेगाव ४) श्री. अनुराग श्रीवास्तव ५) सौ. तितीक्षा पी. बलसारी ६) सौ. आसावरी वायकुळ, घाटकोपर ७) श्री. निनाद वायकुळ ८) श्री. योगेशकुमार सक्सेना, दिल्ली ९) श्री. सुरेंद्रकुमार सक्सेना १०) श्री. तरसेन कपूर ११) श्री. जयप्रकाश १२) देवी चक्रवर्ती १३) श्री. उल्हास गजानन कुलकर्णी १४) श्री. हरीशकुमार जोशी, जबलपूर १५) श्री. अवनीशकुमार जोशी १६) श्री. वसंत कृष्णा पोकम, परेल १७) कु. अर्चना जोशी १८) श्री. शिवप्रसाद आश्रय पटेल १९) श्री. रास्ताराम दिनकर एडवणकर, विरार, २०) श्री. साईगुरुदत्त शिराळे, मुंबई २१) बाल शिवशाहीर विजय सखाराम तनपुरे, राहुरी २२) श्री. जितेंद्र यादव प्रधान २३) श्री. बाळकृष्ण तनपुरे २४) श्री. चंद्रकांत शिराळे २५) श्री. अविनाश डहाळे २६) श्री. बन्टी बीवाल २७) श्री. कैलास उंडे २८) श्री. सुरेश तनपुरे २९) सौ. आशा गुलाणे, लंडन.

**कार्तिकी एकादशी–** सालाबादप्रमाणे कार्तिकी एकादशी निमित्त सोमवार, दि. २. ११. १९८७ रोजी रात्रौ ७ ते ९ कीर्तन झाले. रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून मिरवून आल्यानंतर रात्री ११ वा. शेजारती झाली.

**तुळशी विवाह–** मंगळवार, दि. ३. ११. १९८७ रोजी सालाबादप्रमाणे श्रींच्या द्वारकामाईत तुळशी विवाह कार्यक्रम संपन्न झाला. साईभक्त व संस्थान कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांनी फटाके, भुईनळे वाजवून आनंद व्यक्त केला.

# डिसेंबर – ८७

या महिन्यात नाताळची सुट्टी असल्याने श्री. साईबाबांच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती. शाळा, कॉलेजच्या बऱ्याचशा सहली आल्या होत्या.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे –

**कीर्तन :**

१) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी (गवई), कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाच्या दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**प्रवचन :**

१) ह.भ.प. गणपत बाबूराव भावे, दादर.

**भजन, गायन, वादन इ.** – १) श्री दत्तगुरु भजनी मंडळ, काटे, पिंपळगाव २) कु. कल्पना विश्वनाथ, सिकंदराबाद ३) कु. एस. साईनाथ ४) श्री. शैलेंद्रकुमार ५) पी. अंजय्या ६) सौ. चंदाताई तिवाडी ७) एकवीरा महिला भजनी मंडळ, पंढरपूर, ८) श्री. कीसन कस्तुरे ९) श्री. सतीश नागेश राव, मुंबई १०) श्री. अरुण करंगुटकर ११) श्री. वसंत जोशी १२) श्री. विलास पावसकर १३) श्री. यशवंत नाईक १४) श्री. नामदेव बेलणेकर १५) श्री. सुनील चव्हाण १६) श्री. बाळकृष्ण हिर्लेकर १७) श्री. बारकुशेठ मांडवकर १८) श्री. शशीकांत दळवी १९) श्री. सुरेश आंजर्लेकर २०) श्री. पं. विनायकराव लोंढे, इंदोर २१) श्री. पुरणमल अग्रवाल, इंदोर २२) श्री. कीशोर श्रोत्रीय, भोपाळ २३) श्री. संजय परळकर, मुंबई २४) श्री. मिलींद दत्ताराम मोहीते, परेल २५) श्री. खंडेराव गंगाधरराव कांबळे, सुरत २६) सौ. डी. विजयलक्ष्मी भागवत, विजयवाडा २७) जादुगार श्री. श्रीधर कीर २८) सौ. शिल्पा श्रीधर कीर २९) कु. प्रसाद श्रीधर कीर ३०) श्री. कमलाकर सुकरु वाफेकर, विक्रोळी ३१) श्री. बाळकृष्ण मा. शिरके, बडोदा ३२) श्री. वसंत लक्ष्मण दाते ३३) श्री. पांडुरंग भगवंतराव वाघमारे ३४) श्री. भरत एच. जोशी ३५) श्री. मनोहर कदम, कल्याण ३६) श्री. रमेश दुबे ३७) कु. निनाद कल्याण ३८) श्री. रतनलाल शर्मा ३९) श्री. ईश्वरचंद्र चव्हाण ४०) श्री. दत्ताराम लक्ष्मण साटले, मुंबई ४१) श्री. पुरुषोत्तमराव गांवकर.

**दत्तजयंती कार्यक्रम :–**

सालाबादप्रमाणे शुक्रवार, दि. ४-१२-८७ रोजी दत्तजयंती साजरी करण्यात आली. दुपारी ४.३० ते ६.०० पर्यंत संस्थान पुजारी (गवई) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, यांचे दत्तजन्म आख्यान कीर्तन झाले. ६.०० वा. दत्तजन्म कार्यक्रम झाला. त्यानंतर धुपारती झाली.

रात्रौ ९.१५ वा. "श्री"च्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक परत आल्यानंतर ११.०० वाजता शेजारती झाली.

# जानेवारी – ८८

या महिन्यात श्रींच्या दर्शनाला साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे--

**कीर्तन:–** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी, गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**प्रवचन :–** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी,

**भजन, गायन, वादन इ.–** १) प्रतिबिंब थिएटर्स, मुंबई २) श्री. सुरेंद्रकुमार लाडे ३) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर पटेल ४) श्री. नरसेम. कपूर, दिल्ली ५) श्री. रघुवीर शांताराम मिराणे, शिरडी ६) श्री. भोलानाथ समेळ, गिरगाव, ७) श्री साईधाम मित्र मंडळ, मुंबई ८) श्री. अनिरुद्ध सुहास चित्रे, पुणे ९) कु. ऋषिकेश चित्रे १०) श्री. गजानन केरनाथ कदंम, बसगडे ११) श्रीमती वेदावती, हैद्राबाद १२) श्री. सत्यदेव महाराज, इंदौर १३) सौ. आरती टिकेकर, मुंबई १४) श्री. उदय टिकेकर, ओम साईकृपा भजन मंडळ, वडाळा १५) नवयुग भजनी मंडळ, कुरुळ १६) श्रीमती शुक्ला प्राणसंकट, खार १७) श्री. पोपटराव गो. दुधवडे, सावळीविहीर १८) श्री. शांतीलाल मनीशंकर भट, मुंबई १९) पंडीत महेश प्रकाश जोशी, इंदौर २०) श्री दत्तगुरु प्रासादिक भजनी मंडळ, जोगेश्वरी २१) सौ. अनुराधा अरुण कुलकर्णी, पुणे २२) श्री. पांडुरंग मुरडे, पुणे, २३) श्री. पारस पोरबाल, शिरडी २४) श्री. विजय पवार, लक्ष्मीवाडी २५) श्री. विजय कनगुटकर, बोरीवली २६) श्री. अशोक बेल्हारे २७) श्री. पिटर फिजोवाला २८) कु. रक्षा देसाई, मुंबई २९) श्री. शंकर यशवंत खर्डेकर, बोरीवली ३०) श्री. नरेश राजन्ना पोगर्ला, वरळी ३१) श्री. संभाजी भाले, इ.

**प्रजासत्ताक दिन –**

दि. २६ जानेवारी १९८८, मंगळवार रोजी सकाळी ७.३० वाजता संस्थानमध्ये संरजाम बागेत मा. कार्यकारी अधिकारीसाहेब श्री. रा. द. बन्नेसाहेब, यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठीत नागरिक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षकवर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी, संस्थान कर्मचारी बॅण्डपथक, होमगार्डस्, पोलीस इ. उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

**बक्षीस समारंभ –**

सन १९८७ सालाकरिता उत्कृष्ठ स्वच्छता कामगारासाठी ठेवलेले सौ. सुशीलाबाई शंकरराव गोडाखंडी पारितोषिक (चांदीचे पदक) श्री. छबू शाहू अडांगळे, कायम स्वच्छता कामगार, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांना देण्यात आले.

तसेच सन १९८७ सालाकरिता साईनाथ रुग्णालयातील उत्कृष्ठ कामगारांसाठी ठेवलेले श्री. अशोक शंकरराव गोडाखंडी पारितोषिक (चांदीचे पदक) श्रीमती विमल मोदर गोंदकर, कायम आया, साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा संस्थान, शिरडी देण्यात आले.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |